साळजाखेर " १८
किरकोळ अंकास ....................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

Six monthly............ 8 as.
Single copy..............................4as.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over10... 4 as.
Repetition per line 3as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XXVII AKOLA MONDAY 2 OCTOBER 1893 NO 39

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २ माहे आक्टोबर सन १८९२ इ० अंक ३९

## जाहिरात

संस्थान सोंडूर, जिल्हा बळारी इलाखा मद्रास एथे श्री कार्तिक स्वामींचें महास्थान आहे तेथें चालू सालांत ह्मणजे कार्तिक शु० पौर्णिमेस महापात्रा भरणार आहे तर यात्रेस येऊं इच्छिणाऱ्या मुमुक्षु लोकांच्या सोयी करितां खालीं लिहिल्या प्रमाणें टिकीटांचे दर ठेविले आहेत.

| | रुपये |
|---|---|
| पंचामृताभिषेक | २५ |
| सर्वांगाभिषेक | १५ |
| पादाभिषेक | १० |
| पादस्पर्श | ५ |
| दर्शन टिकीट | २ |
| बारावर्षांचे आंतील मुलांस दर्शन टिकीट | १ |

कार्तिक शुद्ध १४ रोजीं अभिषेक वगैरे बाबत टिकिटें देण्यास सुरुवात होईल शु० १५ चे दिवशीं सकाळीं ७ वाजता दर्शनास सुरवात होईल. सदर टिकिटें श्री कार्तिक स्वामीचे डोंगरावर विकत मिळतील. ब्राह्मणा वांचून इतर लोकांनीं अभिषेक व पादस्पर्श वगैरे ब्राह्मणद्वारें करवावे.

यंदा देशकाल सुभिक्ष आहे. संस्थान सोंडूर येथें येण्यास हॉसपेट स्टेशन ६ कोस, गादिनूर स्टेशन ४ कोस, तारणगल्ल स्टेशन ४ कोस याप्रमाणें सोंडुरा पासून रेल्वे स्टेशनें आहेत. सोंडूराहून कार्तिक स्वामीचा डोंगर ९ कोस आहे स्टेशनाहून सोंडुरास येण्यास गाड्या वगैरे मिळतात. यात्रेकरू लोकांस कोणत्याही गोष्टीची तसदी नाहीं. श्री स्वामींचें दर्शन घेण्यास योग कार्तिक शु० १५ दिवशीं संपूर्ण आहे.

भिमराव पोळ म्यानेजर.

नोटीस

रा. रा. खंडेरावकृष्ण उर्फ बाबा बऱ्हाणपुरकर राहणार जळगांव तालुके जळगांव जि. अकोले. यांसः—

नोटीस देणार बेंकट प्रसाद रामप्रसाद तिव्हारी राहणार जळगांव. नोटीशीनें असें कळविलें जातें कीं, तुम्ही व आह्मी मिळून संमत १९४७।१९४८ सालांत भागीदारी मध्यें मुंबईहून किराणा वगैरे माल आणविला व तो माल तुह्मी व आह्मी मिळून विकला एकंदर माल विकून त्यांत तोटा रुपये (१४२०११) एकशे बचाळीस आकरा आणे आला. त्यांत तुमचे वाटणीचा तोटा रुपये (७१०५०६) एकाहत्तर रुपये पांच आणे सहा पै यांचें व्याज वर्षें दीडचें दर शेकडा ०८ आणे प्रमाणें व्याज रुपये (६०३) अजमासें असें मिळून रुपये (७७०८०६) सत्याहत्तर रुपये आठ आणे ६ पै झाले. हें तुह्मास आज पावेतों आह्मी स्वतः व दलालां मार्फत बहुत वेळां मागितले परंतु तुह्मी कांहीं एक निकाल करीत नाहीं. याज करितां तुह्मास ही नोटीस देऊन असें कळवितों कीं, नोटीस पावल्या पासून १५ पंधरा दिवसामध्यें रुपये (७७०८०६) व ह्या नोटीशीचा खर्च असे आणून निकाल करून पावती घ्यावी. असें झालें नाहीं तर रिती प्रमाणें फिर्याद करूं. ह्या नोटीशीच्या खर्चासह अखेर निकाल होई पर्यंत जो खर्च व नुकसान वगैरे होईल तें सर्व भरून घेतलें जाईल. ह्मणून दिली नोटीस सही तारीख २० माहे सपटंबर सन १८९३ इसवी.

(सही.)
बेंकट प्रसाद रामप्रसाद विवारी जळगांव द० खु०

## शिक्षण पद्धति.

### (इतिहास)

(मागील अं. व. पुढें चालूं)

गु०—एका कर्नेराल्यांत मिती श्रावण शुद्ध १० शके १८१४ असें लिहिलें आहे त्याचा अर्थ काय, तो तुला ठाऊक आहे?

वि०— नाहीं गुरुजी.

गु०—प्रत्येक महिन्याला दोन पंधरवाडे असतात. पहिल्या पंधरवाड्यांत सूर्यास्त झाल्याबरोबर चांदणें पडतें. चंद्राची कोर लहान असते. ती वाढत जाते आणि चांदणें अधिक वेळ टिकतें. पंधराव्या दिवशीं किंवा पहिल्या पंधरवाड्याच्या अखेरच्या दिवशीं चंद्र पूर्णगोलाकृती होतो व त्याचें चांदणें सर्व रात्रभर असतें या पहिल्या पंधरवाड्यास शुद्धपक्ष असें ह्मणतात. दुसऱ्या पंधरवाड्यांत पहिल्या रात्रीस काळोख असतो, व हा काळोख रोज अधिक वेळ पावेतों टिकतो. चंद्राचा आकार रोज कमी होत जातो. शेवटीं ह्मणजे दुसऱ्या पंधरवाड्याच्या अखेरच्या दिवशीं सर्व रात्र काळोख असतो व चंद्र मुळींच दिसत नाहीं. या पंधरवाड्यास वद्यपक्ष ह्मणतात.

गु०— शुद्धपक्ष आणि वद्यपक्ष यांचे अर्थ आतां मला चांगले समजले.

गु०— वद्य ५ ह्मणजे काय तें सांगू पाहूं.

वि०—वद्य ५ ह्मणजे दुसऱ्या पंधरवाड्यांतला ५ वा दिवस किंवा महिन्यांतला २० वा दिवस.

गु०—ठीक. आतां चैत्र वद्य १२ याचा अर्थ सांग.

वि०—चैत्र वद्य १२ ह्मणजे चैत्र महिन्यांतल्या दुसऱ्या पंधरवाड्यांतला १२ वा दिवस किंवा चैत्र महिन्यांतला २७ वा दिवस.

गु०— श्रावण शुद्ध १० शके १८१४ ह्मणजे काय?

वि०— श्रावण महिना १८१३ वेळां होऊन गेला. १८१४ व्या श्रावण महिन्यांतल्या पहिल्या पंधरवाड्यांतला १० वा दिवस पण शके ह्मणजे काय, तें समजलें नाहीं गुरुजी.

गु०— शक ह्मणजे कालगणणा किंवा वेळ मोजणें. आपल्या देशांत युधिष्ठिर, विक्रम, शालिवाहन या नांवाचे मोठ मोठाले पराक्रमी राजे होऊन गेले- त्यांच्या वेळे पासून वेळ मोजण्याची चाल पडून गेली. युधिष्ठिराच्या पूर्वींची गणना युधिष्ठिरा पर्यंत होती. युधिष्ठिरा पासून पुन्हां एक दोन अशीं मोजूं लागले. दुसरा शककर्ता पराक्रमी राजा होई पर्यंत युधिष्ठिराची गणना चालली. असें होतां होतां पुढें विक्रमराजा उज्जनी येथें होऊन गेला. तेव्हां पासून विक्रमसंवत चालूं झाला. ही विक्रमा पासून गणना किंवा विक्रम संवत अद्यापि उत्तर हिंदुस्थानांत ह्मणजे नर्मदेच्या उत्तरेस चालू आहे. पैठण येथें शालिवाहन नांवाचा एक पराक्रमी राजा होऊन गेला, त्या वेळेपासून शालिवाहनाची गणना किंवा शालिवाहन शक नर्मदेच्या दक्षिणेस चालत आहे. शके १८१४, ह्मणजे शालिवाहना पासून १८१४ वें वर्ष. संवत १९३४ ह्मणजे विक्रमापासून १९३४ वें वर्ष

वि०— संवत आणि शक यांचे अर्थ आतां मला चांगले समजले. इंग्रज लोक आपल्या देशांत आले तेव्हांपासून इसवी सन अशी गणना होऊं लागली आहे, त्याचा अर्थ काय?

गु०— मुला, तुला मागील खेपेस विक्रम संवत्, शालिवाहन शक, आणि इसवी सन यांचे अर्थ सांगितले. याच संबंधानें आज मी कांहीं बोलणार आहे. आज शालिवाहन शक १८१५, विक्रम संवत् १९४९ आणि इ० स० १८९३ आहे. तर आतां पाहू, सर्वांत आधींची गणना कोणाची? व त्या मागून किती वर्षांनीं दुसरी, व दुसरीच्या मागून किती वर्षांनीं तिसरी गणना सुरू झाली?

वि०— विक्रमाचीं वर्षें १९४९ झालीं ह्मणून विक्रम संवद सर्वां आधीं सुरू झाला. त्या मागून ५६ वर्षांनीं इसवी सन सुरू झाला. आणि इसवी सना मागून ७८ वर्षांनीं शालिवाहन शक सुरू झाला.

गु०— या तिन्ही काल-गणना समजण्या करितां मी फळ्यावर एक कोष्टक लिहून दाखवितो, तें पाहून प्रत्येकींतील अंतर चांगलें लक्षांत येईल.

| विक्रम संवत | इसवी सन | शालिवाहन |
|---|---|---|
| ० | ० | ० |
| १ | [illegible] | [illegible] |
| ० | ० | ० |
| २० | ० | ० |
| ४० | ० | ० |
| ५० | ० | ० |
| ५६ | १ | ० |
| १०० | ४४ | ० |
| १३४ | ७८ | १ |
| २०० | १४४ | ६६ |
| १००० | ९४४ | ८६६ |
| १९४९ | १८९३ | १८१५ |

वि०— गुरुजी, विक्रम, इसवी आणि शालिवाहन या तिन्ही गणना आतां मला समजल्या.

गु०— विक्रमाचें वर्ष कार्तिक शुद्ध १ पासून इसवी वर्ष जानेवारी तारीख १ पासून आणि शालिवाहनाचें वर्ष चैत्र शुद्ध १ पासून सुरू होतें. असो. मुला, आपल्या गांवच्या गढीच्या मुख्य-वेशीच्या दरवाज्यावर एक मोठी शिला आहे, तिच्यावर लिहिलें आहे तें तुला माहित आहे?

वि०— नाहीं, गुरुजी.

गु०— चल तुला दाखवितो. (दोघे वेशीच्या दरवाजा पाशीं येऊन शिला वाचून वाचितात.) ही गढी जेष्ठ वद्य १२ शके १०३४ या वर्षीं त्रिविक्रम वल्लद गंभीरजी पाटील यांणें बांधिली.

वि०— तर मग, गुरुजी, ही गढी बांधून ७८१ वर्षें झालीं! अद्याप ही किती तरी मजबूत आहे! गुदस्तां आमच्या शेजारीं शिवप्पा वाण्यानें घराची भिंत बांधिली ती एक वर्षाच्या आंत किती झुकली आहे. आणखी एक पाऊस पडू द्या कीं ती पडलीच समजा.

गु०— अरे, पूर्वींची सर्वच कामें अशीं मजबूत होत असत. देवळें पहा बरें, शेंकडों वर्षें होऊन गेलीं तरी दुरस्ती न करितां अद्याप जशींची तशींच आहेत. इंग्रज सरकारानें एकदा ही गढी पाडण्याचा विचार केला होता. परंतु ४१५ मनुष्यांनीं एका दिवसांत एक गाडी भर देखील माती खणिली नाहीं- तेव्हां खर्च फार येईल ह्मणून तें काम तसेंच राहिलें.

गु०— इंग्रज लोक आपल्या देशांत आल्यापासून इसवी सन सुरूं झाला नाहीं. इसवी सन त्या पूर्वीं दीड हजार वर्षांपासून च सुरूं होता. तुर्कस्थानांत पालेस्टाईन ह्मणून एक प्रांत आहे. तेथें जीसस क्राईस्ट नामें एक सत्पुरुष होऊन गेला. त्याला युरोपिअन लोक ईश्वराचा पुत्र असून त्यानें सर्व जगांतील लोकांस पापापासून मुक्त केलें असें मानितात. त्याच्या वेळेपासून इसवी सनास आरंभ झाला. इसवी सनाची १८९२ वर्षें होऊन गेलीं, ह्मणजे येथून क्रिस्तास १८९३ वें वर्ष चालू आहे.

वऱ्हाडसमाचार

मित्ती भाद्रपद वद्य ८ शक १८१५

# वऱ्हाड फौजदारी रिपोर्ट

(सन १८९२.)

मामुली प्रमाणें यंदाही वऱ्हाड फौजदारी खात्याच्या सन १८९२ सालच्या रिपोर्टाची एक प्रत आमचे कडेस आली आहे तिचा आह्मी आभार पूर्वक स्वीकार करितों.

यंदाचे रिपोर्टांत निजाम सरकारचे हद्दीतील औरंगाबाद, जालना, हिंगोली व मोमिनाबाद या ठिकाणीं छावणी करितां ब्रिटिश फौजदारी कोर्टें स्थापन करण्यांत आलीं त्या बद्दल आकडे व तपशील आलाहिदा जोडला आहे.

१८९२ सालांत वऱ्हाडांत एकंदर माजिस्त्रेटांची संख्या ७६ होती ह्मणजे १८९१ पेक्षां ९ माजिस्त्रेट जास्त होते. यांत ६ जिल्हा माजिस्त्रेट, २१ पहिला वर्ग, २२ दुसरा वर्ग, १० तिसरा वर्ग, १९ तिसरा वर्ग स्पेशल माजिस्त्रेट व २ बेंच माजिस्त्रेट होते. सर्व जिल्ह्या पेक्षां आकोला जिल्ह्यांत माजिस्त्रेटांची संख्या जास्त आहे. सन १८९२ सालांत गुन्ह्याची एकंदर संख्या १९१३७ होती सदर्हु प्रमाण १८९१ साला पेक्षां शेंकडा ३.२ जास्त आहे. एलिचपूर व वाशीम जिल्हा खेरीज करून बाकींच्या सर्व जिल्ह्यांत गुन्ह्यांचें प्रमाण जास्त आहे. उमरावती व वणी जिल्ह्यांत गुन्हे जास्त होण्याचें कारण धान्याची अती महर्गता हें आहे. जास्त वाढलेल्या गुन्ह्यां पैकीं बहुतेक माला विरुद्ध व किरकोळ चोरींचेच अपराध बद्दल आहेत. १९१३७ गुन्ह्यापैकीं क्रिमिनल प्रोसिजर कलम २०३ प्रमाणें २९८६ गुन्हे डिसमिस करण्यांत आले. योग्य चौकशी न करितां माजिस्त्रेट आपल्या खुषी प्रमाणें गुन्हे डिसमिस करितात ह्मणून मे. आबर्ड साहेब यांणीं आपलें मत गुदस्त सालीं दिलें होतें तें मे. बुलक साहेब जुडिशियल कमिशनर यांस पूर्ण संमत आहे. २०३ प्रमाणें गुन्हे डिसमिस करितांना योग्य चवकशी करण्यांत येत आहे असें डिस्ट्रिक्ट माजिस्त्रेट यांच्या रिपोर्टा वरून दिसत आहे, तरी उमरावती जिल्ह्यांतील डिसमिसिलचा आकडा ९१८ आहे तो अगदी असमाधान कारक आहे व त्याबद्दल लवकरच योग्य तजवीज केली जावी ह्मणून मे. रेसिडेंट साहेब यांणीं शिफारस केली आहे. १९१३७ गुन्ह्यापैकीं डिसमिस व इतर कारणामुळें काढून टाकलेले गुन्हे वजा जाता निव्वळ चौकशी करितां फायलावर घेतलेले गुन्ह्यांची संख्या १५१८७ आहे ह्मणजे सन १८९१ सालापेक्षां ५१५ नें जास्त आहे. त्यांत मनुष्याच्या शारिराच्या विरुद्ध व माला विरुद्ध झालेले अपराध खेरीज करून बाकी अपराध ९७२ आहेत म्हणजे सन १८९१ सालापेक्षां ८६ नें कमी आहेत. यांत मुख्यत्वेंकरून ध्यानांत ठेवण्या सारखी गोष्ट ह्मटली ह्मणजे लोकांच्या स्वस्थपणा विरुद्ध सरकारी नौकरांच्या अधिकाराच्या अपमानाविषयींचे वजनें व मापें ह्यांच्या संबंधाचे व तसेंच धर्मसंबंधीं अपराध बऱ्याच प्रमाणानें कमी झाले आहेत हें समाधान वाटण्या सारखें आहे. मनुष्यांच्या शारिराच्या विरुद्ध व माला विरुद्ध व इतर कायद्या अन्वयें झालेले अपराध मिळून १४१२९ आहेत सन १८९१ सालीं अशा प्रकारच्या अपराधांची संख्या १३९९४ फक्त होती. ९१७ वाढलेले अपराध केवळ धान्याच्या महर्गतेमुळें झाले आहेत व असे अपराध करणारे लोक मुख्यत्वें करून बंजारी गोंड, कोळंब, व इतर केवळ चोरीचा धंदा करून हे राहणारे आहेत. भयंकर प्रकारच्या गुन्ह्या संबंधानें पाहिलें असतां खुनाचे व तसेच मोठ्या दुखापतींचे गुन्हे अनुक्रमें ३० व ७४ झाले सन १८९१ पेक्षां दहा खून, १७ मोठ्या दुखापतीचे अपराध कमी झाले. जबरीच्या संभोगाचे अपराध १८९१ सालीं ८ होते ते १८९२ सालीं १० झाले. सृष्टीच्या रीतीच्या विरुद्ध संभोगाचे अपराध ११ चे ८ ह्मणजे ३ नें कमी झाले. खुनाच्या ३० अपराधापैकीं फक्त ११—उमरावती जिल्ह्यांतील आहेत. उमरावती जिल्हा खुनाकरितां प्रसिद्धच आहे. सन १८९२ सालींही उमरावती जिल्ह्यांत १० खून झाले होते. खुनाचे अपराध त्या जिल्ह्यांत जास्त होतात याचें कारण निव्वळ विश्वयोषिता संबंधानें खानगी द्वेष, मत्सर, व चुरस हें होय. मुलांचे अंगावरील दागिन्यांच्या अभिलाषानेंही कांहीं खून झाले आहेत. जबरीच्या चोरीचे (रॉबरी) व दरवड्याचे (Dekaiti) चे अपराध अनुक्रमें ६१ व ३६ आहेत. सन १८९१ पेक्षां सदरहु प्रमाण अनुक्रमें ९ व ८ नें जास्त आहे. दरवड्याचे अपराध बहुतेक वाशिम जिल्ह्यांतील आहेत. वाशिम जिल्हा मोगलाईचे हद्दीवर असल्या कारणानें मोगलाई हद्दीतील लोक सदरहु दरवडे घालतात. सरकारानें सदर्हु बद्दल लवकरच योग्य बंदोबस्त करून आपल्या प्रजेच्या स्वास्थ्याचें व जीवित्वाचें रक्षण करणें फार जरूरीचें आहे. वारंवार मोठ मोठ्या राजमार्गावर अशा प्रकारचे दरोडे पडणें व त्या बद्दल बंदोबस्त न होणें ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. अशा प्रकारच्या रस्त्यावर सरकारानें कांहीं घोडे स्वार ठेवून बंदोबस्त करण्यास बिलकुल दिरंगाई करूं नये अशा आमची सूचना आहे, फौजदारी मुकदम्यांतील साक्षिदार हजर राहण्या संबंधानें वऱ्हाडांत फार त्रास पडत नाहीं ही एक समाधानकारक गोष्ट आहे.

पोलीस रिपोर्टांत मे. लेन साहेब इन्स्पेक्टर जनरल आफ पोलीस यांणीं असें दाखविलें आहे कीं वऱ्हाडात अलिकडेस दहा वर्षांत इतर प्रांतातील पुष्कळ लोक येऊन राहत आहेत व मे. बुलक साहेब जुडिशियल कमिशनर यांणींही असें ह्मटलें आहे कीं केवळ गुन्हे करून आपला उदरनिर्वाह करणारे पुष्कळ लोक वऱ्हाडांत आहेत असें असतां जिल्हा माजिस्त्रेट हे क्रिमिनल प्रोसिजर कायद्याचे कलम १०९ व ११० प्रमाणें अशा लोकां पासून चांगल्या वर्तणुकी बद्दल उडाणटपू व इतर बेबंद लोकां पासून जामीन घेण्याचें बाबतींत बरीच कसूर करीत आहेत. मे. रेसिडेंट साहेब यांणींह्या रिपोर्टा वरील आपल्या टिकेंत याबद्दल माजिस्त्रेट लोकांस फारच कडक रीतीनें दोष दिला आहे ते ह्मणतात कीं ज्या अर्थी कलम १०९ व ११० यांचा उपयोग केला जात नाहीं त्या अर्थी दोन तर्क काढतां येतात. एकतर माजिस्त्रेट लोकांस आपलें काम करितां येत नाहीं किंवा दुसरा ते आपल्या कामाची काळजी घेत नाहींत हें दोन्ही तर्क अगदीं बरोबर आहेत असें आह्मांस वाटतें. वऱ्हाडांत कित्येक माजिस्त्रेट असे आहेत कीं त्यांस कायद्याचे अक्टो पासून विक्टो पर्यंतचें असतें अनुभवाचे नांवानें तर शून्यच. त्यांच्या नेमणुका शिफारसी व इतर कारणें यावरून केल्या जातात किंवा दुसरा कांहीं तरी लग्गा लावून त्यांस जागा मिळतात. जागा मिळाल्या बरोबर लवकरच थोड्याच अवकाशांतच त्यांस देश भाषेचें ज्ञान पूर्णपणें प्राप्त होतें व ते मोठे कायदे पंडीत बनून त्यांस माजिस्त्रेट सारखें फार महत्वाचे अधिकार देण्यांत येतात. त्यांचे करितां लुटपुटोची डिपार्टमेंटल परीक्षा असते परंतु तीही पसार होण्या पूर्वींच त्यांस दिवाणी व फौजदारी अधिकार चालविता येतात! सुधारणेच्या इतर बाबतींत हा आमचा चिमुकला मागसलेला प्रांत उत्तरोत्तर आपलें पाय पुढें ढकलीत आहे परंतु आमच्या न्याय खात्यानें आपलें पूर्वाभिष्टाण न सोडण्या विषयीं जणू काय प्रातिज्ञाच केली आहे कोण जाणे! चौकशी करितां आलेल्या खटल्या पैकीं शेंकडा ५४-८ खटल्यातील आरोपी दोषमुक्त झाले. या संबंधानें रेसिडेंट साहेब यांणीं असें ह्मटलें आहे कीं वऱ्हाडांत बरेच माजिस्त्रेटांस अनुभव नसल्यामुळें व समोर आलेला पुरावा बरोबर ताडून पाहण्याचें ज्ञान नसल्या कारणानें पुष्कळ खटल्यातील आरोपी दोष मुक्त करण्यांत आले तसेच उमरावती व आकोला जिल्ह्यांत जे खटले सुटले ते मुख्यत्वेंकरून वकील लोकांच्या अनुभवामुळें कायदे पटूत्वानें व हुशारीनें सुटले आहेत. यावरून ही एक गोष्ट तरी उघड दिसत आहे कीं वऱ्हाडांतील बऱ्याच माजस्ट्रेटास अनुभव व कायद्याचें ज्ञान नाहीं. त्यांचे पुढें जे खटले येतात ते बहुतेक पोलिसानें तयार करून आणलेले असतात. पोलिसांनीं आणलेले खटले कितपत खरे असतात ही गोष्ट जग जाहिरच आहे. बनावट पुरावा तयार करण्या संबंधानें पोलीसांची तर शिकस्तच असते व तसे करण्यास त्यांस साधनीभूत अधिकारही अयोग्य लोकांच्याच हातांत असतात मग काय विचारावें! अशा रीतीनें सजवून आणलेले खटले एक वर्षाचे आंत सर्व कायदे पारंगत झालेल्या माजिस्त्रेट पुढें आल्यावर मे० रेसिडेंट साहेब म्हणतात त्या प्रमाणें खटले सुटण्याची तर आशा नाहींच परंतु उलट पुष्कळ हतभागी व निरापराधी लोकांस तुरुंगाचाच मार्ग पत्करणें भाग पडत आहे. कोणाच्या नशिबानें वकिलांची गाट पडल्यावर पोलिसांचे सगळे पाताळ यंत्र बाहेर पडतें व निरापराधी लोकांची सुटका पोलिसांचे कचाटातून वकिलांच्या कायदापटुत्वानें माजिस्त्रेटांची चालोचाल खात्री करून देतां येते. वऱ्हाडांत हल्लीं वकिलांचा वर्ग फार चांगला होत चालला आहे हें तरी आमचें एक नशीबच समजावयाचें. वऱ्हाडांतील सिव्हिल जडज्य व माजिस्त्रेटें यांस वकिलाच्या पासंगासही न लागणारी फुसकी परीक्षा दिली ह्मणजे बस्स होते. काय न्याय हा! वऱ्हाडांतील न्यायविशास वकिलीच्या परिक्षेचे नियम लागू केले असतां हल्लीं जी उणेव आहे ती बहुतक नाहींशी होऊन चांगले न्यायाधीशी प्रांतांत होतील व प्रजेस उत्तम न्याय मिळून तिचें कोट कल्याण होईल जों पर्यंत ही गोष्ट होत नाहीं तों पर्यंत वऱ्हाडांतील अधिकाऱ्यांनीं घणाघोर मेहनत करून कायद्याचे ज्ञान संपादन करणाऱ्या आमच्या वकिलाबद्दल रूणी असणें अगदीं जरूर आहे. या प्रसंगींच सरकारास आह्मास एक मोठी महत्वाची गोष्ट सुचविणें आहे ती ही कीं न्याय खात्यांतील जागा मुंबई वगैरे इतर सुधारलेल्या प्रांता प्रमाणें ब्यारिस्टर अगर वकिलीचा धंदा ज्यानें उत्तम प्रकारें तीन वर्षें चांगला केला आहे त्यांसच देण्यांत याव्या ह्मणजे हल्लीं चालूं असलेली हडकहप्पी समूळ नाहींशी होईल व एक मोठा महत्वाच्या कामांत सरकारानें उत्तम पाया घातला याबद्दल सर्व प्रजा त्यांची आभारी होईल.

सन १८९२ सालांत जिल्हा माजिस्त्रेटांचें काम फारच कमी झालें आहे. डेपुटी कमिशनर व असिस्टंट कमिशनर यांणीं महत्वाचे बहुतेक खटले घेतले पाहिजेत व स्मालकाज कोर्टाचे जडज्यास फक्त दिवाणी काम ठेवावें व किरकोळ खटले फक्त तहासिललोकांकडेस दिले जावें अशा बद्दल मे. बुलक साहेब यांणीं रिपोर्टांत शिफारस केली आहे ती मे. रेसिडेंट साहेब यास पूर्ण संमत असून फौजदारी कामाची वाटणी लवकर चांगल्या प्रकारें लागण्याची बरीच आशा आहे.

स्पेशल माजिस्त्रेट व स्पेशल बेंच माजिस्त्रेट यांणीं आपलें काम बरें केलें ह्मणून त्यांची पाठ थोपटण्यांत आली आहे. फुकट काम करित असलेल्या या वर्गास आणखी अधिक बक्षीस काय द्यावयाचें? प्रांताच्या क्षेत्रफळाच्या मानानें वऱ्हाडांत स्पेशल माजिस्त्रेट यांची संख्या वाजवी पेक्षां फाजील आहे. शिवाय ज्यास हे अधिकार दिले जात आहेत अशा पुष्कळांस कायद्याचे ज्ञानाचें वारें ह्मणूनें काय तें माहितच नसते. अशा लोकांस माजिस्त्रेट सारखे अधिकार देणें फार धोक्याचें आहे. निदान अशा माजिस्त्रेटांस फौजदारी कायद्यांची हायर व लोअर सारखी परीक्षा पास झालीच पाहिजे अशा प्रकारचे नियम सरकारानें केले पाहिजेत व असें केल्यानें बरीच सुधारणा होऊन चांगले लोक नेहमीं पुढें येण्यास संभव आहे.

सन १८९२ सालांत सेशन कमिट १०० खटले करण्यांत आले. १८९१ साली अशा प्रकारच्या खटल्यांची संख्या ८० होते. गुदस्त पेक्षां १८९२ सालांत सेशन जडज्या समोर साक्ष देण्या करितां आलेल्या साक्षीदारांची संख्या दुप्पट होती व पक्षकार लोकांची संख्या ११९ नें जास्त होती सेशन जडज्याचें काम फार वाढत आहे येतांचें व चांगले काम होण्यास दोन सिव्हिल व सेशन आफिसरांची फार जरूरी आहे. पश्चिम वऱ्हाड करितां एक स्वतंत्र जडज्य आकोले येथें व पूर्व वऱ्हाड करितां एक उमरावतीस नेमले गेले असतां लोकांस व सरकारासही फार

सुखावह व हितकारक होणार आहे वऱ्हाडांत न्यायासनास शोभणार फक्त दोनच आफिसर ह्मणजे मे. आवर्ड साहेब व मे. हेअर साहेब हे आहेत.

सन १८९२ सालांत ८ इसमास फक्त फांशीची शिक्षा ठरविण्यांत आली पैकीं ६ वर शिक्षेची अमलबजावणी केली गेली व बाकी च्या दोघांस त्या शिक्षे ऐवजी काळे पाण्याची सजा देण्यांत आली एकंदर ३६ आरोपीस जन्मठेपेची सजा देण्यांत आली बाकीच्या कडक शिक्षेचें प्रमाण कमी आहे. दंडाची रक्कम मागील बाकी व चालूं सालांत ठरविलेली रक्कम मिळून रुपये ९२२३३।≡।१ पैकीं ६१४८० ।।।≡६ वसूल करण्यांत आले व न येतां बाकी ह्मणुन रुपये २९०४ आहेत. दंड परत करावा लागला ती रकम ४९३७ आहे व वसूल करणें राहिलेल्या रकमे चा आकडा रुपये २२७१३।।९ आहे.

एकंदर अपिलांची संख्या ७४६ होती पैकीं ७०९ निकाल होऊन वर्ष अखेर फक्त १८ अपिलें शिल्लक होती.

रिपोर्टांत कॅनटॉनमेंट माजिस्त्रेटांनीं जे खटले चालविले त्या बद्दल एक पत्रक जोडले आहे. त्यांचे पुढें चौकशी करितां आलेल्या खटल्यांची संख्या १३८ होती. हिंगोली येथील कोर्टास बाकीचे तिन्ही कोर्टें एकत्र करून जें काम आहे त्या पेक्षांही जास्त आहे.

कर्नेल स्पानस्की, गनथार्प, क्याप्टन हेस्टिंग व मे. इलिअट साहेब यांणीं आपलें काम चांगले केल्या बद्दल व मे. बुलक साहेब यांणीं आपलें काम फार दक्षतेनें व काळजीनें केल्याबद्दल मे. ह्लोडन साहेब रेसिडेंट यांणीं त्यांची फार स्तुती केली आहे.

The Berar Samachar

MONDAY OCTOBER, 2, 1893

## SIDE REFLECTIONS FROM SIR HENRY NORMAN'S WITHDRAWal.

Sir Henry Norman has declined the Viceroyalty of India. He is one of those few fortunate ones who have in their lifetime a full account of whatever grasp they have on public mind. Of course an official is often judged from various points of view. When in office, he has from policy or weakness or often from both to displease one or other class of people. Sir Henry Norman had no such thing to do. Yet the numerous adverse criticisms on him in influential and important journals will at one and the same time show that inspite of all the wonder achieved during the present century distinctions of birth and rank however accidental weigh powerfully on the minds of men. They may be reasoned into morbid sluggishness or excited to tremendous activity. But to a certain degree they will ever exist. The volley of criticisms against this would—be Viceroy were both great and ungenerous. No great fault was noticed in him, nor any anticipations of a miserable failure except in so far that he was found guilty of having no descent from an illustrious pedigree of a heriditary nobility! This awakened all the bitterness of criticism and the appointment was consequently judged the most unworthy. This is not however the first time that we have manifestations of European prejudice. Edmund Burke was by far the ablest man of his time. In all his writings we see the subjective mood expressed. The highest honour a British Subject can look to is the Premiership of the United Kingdom. But this was never shared by that political philosopher. The conspicuous services he rendered to his country availed nim of nothing towards that step.

India is a country slowly emerging out of the darkness the natural out—come of a foreign yoke of fierce and barbarous rulers. In all the vicissitudes of such ferocious invaders, the caste system of India alone upheld the nationality of the country and led to its perpetutation. We perfectly understand that the modern attempts at the suppression of the caste—system do not necessarily mean an annihilation. Far from it. Yet the attempt is towards assimilating all castes into one. Is it then possible that such an event will come about at least at this stage of Indian civilization. The great Indian Social contract by a sort of divine political instinct has by a special compromise brought into existence an institution which is never old and useless. We are far from asserting that a certain thing is good or bad according as it exists or does not exist in England. But what we mean is that even in England—the country of every material progress and civilization, the prototype for all other social and moral advance—ment the bigotry of rank and birth can not be shaken off by the combined exertions of a popular opinion and a popular representation. Much less therefore is it possible that the conservative tendencies of the people should be loth to shake off tendencies which have survived violent convulsions of rude times. Among the Egyp—tians all gods are brutes. It is not strange that they should have. All great discoveries the stepping stones, the germs of numerous others were made from observing these and their manners. Of all honours which a society can confer on others, the highest is that of deification. All ancient Rishis who have by their labour contrived to add to the stock of human comfort and knowledge were given this honour. This very honour is due to the man who first invented the idea of caste—system.

In the present state of society, the institution need not exist. But consider what it has achieved of old! Give it the tribute it is worth and then rest content that you ought nowise try tooth and nail to demolish it. If you cannot understand its real worth the fault is of your week head. We may tread insects to death while it required a Supreme Being to give them life.

We may destroy old institutions. For if we do not destroy we live to no purpose. To construct is divine, to destroy human. All are not endowed with a power to construct. Let us then forego divine nature and assume the human one. This is the doctrine of the Reformer, be he who he will of the present day. But if you can not penetrate the veil and propound a mystery we would wish you to let it take care of itself. Several things have now gradually and smoothly crept into use that only a score of years ago would have shocked even the so—called reformer of that time. Girls are now scarcely married before at least ten. This reform sets aside several popular prejudices. It is our belief that every thing as it exists conduces to human happiness. Add to it. Enlarge upon it. But do not destroy it. We end this with the happiest lines of Wordsworth:—

"If this belief from Heaven be sent,
If such be Nature's Holy plan,
Have I not reason to lament,
What man has made of man?"

## वऱ्हाड.

हवामान — शुक्रवार सायंकाळीं हचीच पाहिला पाऊस सपाटून झाला. एकदोन इसम मेले ते कालव्यानेंच मेले असें लोक बोलतात.

म्युनसिपाल शिपायास मारून खोटी फिर्याद करणाऱ्या पोलीस कानस्टेबलावर आगळीकी बद्दल फौजदारी करण्यांत यऊन त्यांत त्यास गेल्या मंगळवारीं १० रुपये दंड अथवा एक आठवड्याची सक्त मजूरीची कैद अशी सजा झाली.

मंगरूळ प्रगण्यांतील एका गोंडाच्या बायकोनें स्वगृहीच्या भिकार दशेला कंटाळून सुखाच्या लालचीनें एका बाळाजी नावा च्या इसमांशीं बळकट स्नेह केला. त्यांचा स्नेह रतिसुख पर्यंत पोंचला. व्यभिचारपणांतलें खोटें वर्तन नवऱ्याच्या नजरेस आलें. त्यानें त्यांच्यावर पाळत ठेविली. एकदा शेतराखणीच्या मिषानें पूर्व रात्रीं बाहेर निघून गेला आणि उत्तररात्रीं परतला तो त्याच्याच बिछान्यावर गाढ निद्रेंत त्या जारासहित बायकोला पाहून त्यानें त्या दोघांस वार करून घायाळ केलें आणि पुन्हा शेताचा रस्ता धरिला! पुढील हकीकत अजून कळली नाहीं.

### NOTICE

To

The Superintendent of Police, Akola District Akola

In compliance with the provisions of Section 42 of the Police act V of 1861 I beg to inform you and give notice that after the expiry of one month enjoined by the above act I shall institute criminal proceedings before a proper magistrate, against Head Constable Dhondi wd Umaji attached to the Town Police Station Akola, for the offence of wrongful confinement. The charge which I wish to prefer arises out of the following circumstances:—that on the night of the 22nd instant the said Head constable Dhondi wd Umaji came to my house at about 10-30 P. M., roused me out of my sleep by calling aloud, and said that he wished to arrest me on a charge of keeping a conveyance on the public road near my house and leaving it there in such a manner as to cause inconvenence and danger to the pubic and punishable under Section 34 sub-sections 3 of the said Police act. I replied that I had nothing to do with the keeping of the carriage on the public road and leaving it there; that my servant Antu had done so, against my express orders. Then the said servant Antu was sent for and asked in the presence of the said Head constable Dhondi wd Umaji and a number of respectable gentlemen, and the said servant Antu admitted that he had kept the conveyance on the public road and left it there against my express orders. Notwithstanding all this the said Head constable Dhondi wd Umaji wrongfully and without any reasonable or probable cause, arrsted me and took me to the town Police station where I was released on my signing a personal recognizance to appear the next day before the magistrate mentioned therein.

I also beg to give you notice that as I have reason to believe that the said Head constable Dhondi wd Umaji acted at the insigation of Chief Constable BiseswarSing in wrongfully arresting me I shall also after the expiry of one month as required by law institute criminal proceedings against the said Chief Constable for abetment of wrongful confinement. Dated 25th September 1893

V. K. Desai
Pleader.

### NOTICE

To

The Superintendent of Police Akola District Akola

In compliance with the provisions of Section 42 of the Police act V of 1861 I beg to inform you and give notice that after the expiry of one month enjoined by the above act I shall com—mence, against Chief Constable Biseswar Sing and Head Constable Dhondi wd. Umaji both attached to the Town Police station Akola, a civil action to recover an amount of Rs. 1100 in the proper court for false and malicious prosecution against myself, based on the following cause of action viz that they the said C. C. and Head Constable Dhondi wd. Umaji, jointly, severally or in the alternative, prosecuted me, falsely, maliciously, and without any reasonable or probable cause, before Mr. Walsh, Extra Assistant Commissioner and 3rd class Magistrate Akola, on the 23rd instant, to the injury of my person, property and reputation on a charge of keeping a conveyance on the public road near my house and leaving it there in such a manner as to cause inconvenience and danger to the public, punishable under see 34 subsection 3 of the said Police Act. The said prosecution ended in the case being dismissed and I acquitted; and the Chief Constable and Head Constable have thus become liable jointly, severally or in the alternative. Dated 25th Septembber 1893

V. K. Desai
Pleader

## जाहिरात

सर्वत्र लोकांस विनय पूर्वक कळविण्यांत येतें कीं बक्तु वल्लद संभाजी पाटील राहणार मौजे घिरणी तालुके मलकापुर हा आलिकडे व्यवस्थेशीर वागत नाहीं. त्यामुळें यास आपलें हित अनहित कांहीच समजत नाही. गणपतराव संभाजी पाटील याचे स्वसंपादित केलेल्या स्थावर जंगम इष्टेटींत याचा कोणते ही प्रकारचा वारसा अगर हक्क नाहीं. करितां याजला कोणीही गणपतराव संभाजी यांचे इष्टेटी पैकीं कोणताही स्थावर व जंगम माल खरेदी घेऊन अगर गाहाण ठेऊन पैसा देऊं नये. दिल्यास त्यांचा हक्क वरील जिनगीवर लागू पडणार नाहीं.

मानेगांवकर पाटील हा मनुष्य पुर्वी गुन्ह्यांत सजा पावलेला असून सदरहु बक्तु याजला फंदाफितूर देत आहे. करितां सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें कळविलें आहे. इतके ही असून याच्याशीं कोणी देण्या घेण्याचे संबंधानें कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास नफा नुकसानीचा जबाबदार ज्याचा तोच राहील कळावें तारीख ३० सप्टेंबर १८९३ इ.

(सही) राऊ रामजी पाटील मुखत्यार
निजबत. रखमाबाई मर्द गणपत
राव संभाजी पाटील दुका
न मलकापूर द. खु.

### जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येतेकीं वऱ्हाडसमाचार पत्राचे सालमजकूरचे २७ सावें अंकांत वर्तमानसारच्या हेडिंग खालीं अती आनंद कारक जाहीर खबर कीं,, गणपतराव संभाजी पाटील यांस मुलगा झाला वगैरे" ती खोटी आहे हा मुलगा कोणाचा व कोणास झाला हें व्यवहारीक मनुष्यवर्गास समजण्याचें मार्ग बाहेरचें आहे. जाहीर असावें तारीख ३०।९।९३

(सही) भाऊरामजी पाटील मु० नी.
रखमाबाई मर्द गणपतराव संभाजी
पाटील दु. मलकापूर द. खुद.

## वर्तमानसार

लार्ड लिटण काय म्हणतात? हे गृहस्थ थोड्यां दिवसांपूर्वी हिंदुस्थानचे गव्हरनरजनरल होते हें प्रसिद्धच आहे. त्यांणीं त्या वेळीं त्या वेळच्या स्टेट सेक्रेटरीस एक खासगी पत्र पाठविलें असून तें आतां बहेर आलें आहे. ...तें आपल्या त्या पत्रांत म्हणतात कीं,....''हिंदुस्थानच्या लोकांस आम्हीं हक्क देऊं केले आहेत ते आमच्या हातून कधींही पुरे होण्यासारखे नाहींत''....''पुरे होण्या सारखे नाहींत ह्मणून आम्ही ते त्यांच्यापासून परत घेतले पाहिजेत अगर त्यांस फसविलें तरी पाहिजे''....''ते हक्क त्यांच्या पासून उघड पणें काढून घेणें जास्त सरळपणाचें झालें असतें, पण तसें न करितां आह्मी त्यांस वचनें देवून फसवूं लागल्यामुळें आमचा सरळपणाही नाहींसा झाला आहे''....''हिंदुस्थानच्या लोकानीं विशापतेस च आलें पाहिजे, अमुक वयाच्या आंतच पास झालें पाहिजे हे ठराव शुद्ध लबाडीचें आहेत''....हल्लींचा इंग्रजीकारभार व इंग्रजीकारभाराचें वळण हें चांगलें आहे कीं नाहीं याचा निर्णय करण्याची वेळ जेव्हां कधीं येईल तेव्हां लार्ड लिटण सारखे साक्षीच्या पिंजऱ्यांत उभे राहून काय सांगतील व त्याचा परिणाम न्यायाधीशाच्या मनावर कसा होईल याचा इंग्रजानींच विचार करावयास पाहिजे आहे. या गोष्टीचा आज जर ते विचार करणार नाहींत तर त्या न्यायाच्यावेळीं त्या इंग्रजांच्या विरुद्ध हुकूमनामा होईल हें त्यांणीं पक्कें समजून असावें.

इंग्रजलोक जर नेटिवाशीं मिळून मिसळून वागतील, त्यांच्यापासून वेगळे व तोऱ्यांत राहाणार नाहींत, तर मुंबईसारखे दंगे होणार नाहींत; तसेंच सरकारी कारभारांत जर नेटिवांची जास्त भरती होईल तर असले प्रसंग सहजच कमी होतील; नेटीव लोकांनीं एकमेकांशीं भांडत असावें असें तुम्ही इंग्रजलोक करीत नाहीं हें मला माहित आहे, तरी गेल्या शंभर वर्षां पासून तुम्ही आमच्या बरोबर आहा, पण हिंदुस्थान हा देश शेकडो वर्षांच्या पूर्वीचा असून तेव्हां पासून त्याचा राज्यकारभारही चालूच आहे, असें मुंबईच्या दंग्याचें कारण विचारणाऱ्या एका इंग्रजास मि. दादाभाई नौरोजी यांणीं उत्तर दिलें असें सांगतात. यावर एक विलायती पत्रकर्ता ह्मणतो कीं, हिंदुस्थानचा कारभार करण्याकरितां जाणाऱ्या इंग्रज कामदारांनीं मि. दादाभाई यांचे हे शद्ब चांगले ध्यानांत ठेवावे, इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानच्या कारभारात नेटिवांचा हात नसावा असें ह्मणणाऱ्या व करणाऱ्या इंग्रजांनीं मि. दादाभाईचे हे शद्ब विशेषें करून ध्यानांत ठेवले पाहिजेत.

पार्लमेंन्टमेम्बर मि. हीटन हे पार्लमेन्ट तहकूब झाल्यावर हिंदुस्थानांत येणार आहेत.

पोष्टाच्या टिकिटांत कांहीं फेरफार करण्याचा विचार चालू आहे असें सांगतात. दरांत मसून रंग आकृती वगैरेंत होणार आहे.

ब्राझिलच्या ताज्या बातमीवरून समजतें कीं दंगेखोरांनीं रीडीजनरो किल्यावर सहा तास तोफांचा भडीमार केला व पुष्कळ इमारतींचा नाश झाला. कांहीं माणसेंही ठार झालीं. किल्यावरचे बहूतेक पहारेकरीच वियरले आहेत. प्रेसिडेन्ट हा कांहीं लोकांसह सांताअना येथें जाऊन राहिला आहे

भूमध्यसमुद्रांत रशिया आपल्या आरमाराचें एक ठाणें स्थापन करणार आहे अशी जी बातमी आहे ती किती खरी आहे याचा खुलासा करण्यास रशियन दरबारच्या आपल्या वाकिलास टर्कीनें हुकूम केला आहे व रशियास तसें करण्यास मनाई करण्याचा टर्कीचा इरादा आहे, कारण रशियास ती मोकळीक मिळाली कीं तो लार्डनल्समधून लढाऊ गलबतें नेण्याचाही हक्क मागूं लागला असें टर्कीचे म्हणणें आहे.

चीनच्या बादशाहास प्रत्येक दिवशीं अस्वलाचे पंजे, काळींवटाच्या शपट्या, बदकांच्या जिभा, बाममाशाचीं अंडीं, उंटाचें, मदार, माकडांचे आंट, राहीमाशाच्या शेपट्या, चरबी आणि हाडें इतर पदार्थ खावयास लागतात.

खानदेशांत शहादे येथें ता० १० रोजीं सुमारें पांच पन्नास दरोडखोरांनीं पांच चार घरें लुटलीं. दरोडखोर सशस्त्र असून त्यांच्या बरोबर घोडेही होते व दगडमार करण्याकरितां दगडानी लादलेलीं कांहीं गाढवेंही होतीं असें प्रसिद्ध झालें आहे. हा प्रकार चांगला नव्हे. ठा. अ.

उदेपूरमध्यें ६० मैल लांब आगगाडीचा रस्ता करण्याकरितां गव्हरनर जनरल यांनीं संमती दिली आहे.

कलकत्यांत २१४ बाया शिक्षणी आहेत.

येत्या नवंबरमध्यें कदाचित व्हेसराय साहेबांची स्वारी ब्रम्हदेशांत जाईल.

तिबेटांत परदेशीय लोकांस जाऊं देत नाहींत.

ब्रेझिल मधील दंगा वाढत चालला आहे.

बडोद्यास गायकवाडा वतनदार मंडळ नांवाची सभा स्थापन झाली आहे व या बद्दल जे नियम झाले आहेत त्याचा पुनः विचार करण्या बदल महाराजांस विनंती करण्यांत येणार आहे. सु. प

कलबुर्ग्यांस हल्लीं तापाची भयंकर सांत आली असून बरींच माणसें दगावत असल्यामुळें लोक घाबरून गेले आहेत, व कित्येक गांव सोडूनही जाऊं लागले आहेत.

बार्शी येथें एका कसबीणीच्या बंद असलेल्या घरांतून अतिशय दुर्गंध येऊं लागल्यामुळें घर उघडून पाहतां आंत त्या कसबिणीचें प्रेत सडत चाललेलें दृष्टीस पडलें तिचा गळा कापलेला असून अंगावरील दागदागीनेही नाहींसे झाले आहेत. गुन्हेगाराचा पत्ता नाहीं. थोडे दिवसांपूर्वी येथेंही भररस्त्यावर फौजदारचावडीनजीक असाच एकखून झालेला जिरला. असें गुन्हे जिरणें पोलिसास लाजिरवाणें आहे.

अमृतबझार पत्रकर्ते ह्मणतात कीं, श्री क्षेत्र काशी येथें ता० १० मिनहू रोजीं हिंदु मुसलमानांचा भयंकर दंगा व्हावयाचा होता. मुसलमानांनीं श्रीविश्वेश्वराच्या देवळांत वाजणाऱ्या घाटा व शंख याऊपर शुक्रवारीं वाजवू द्यावयाचे नाहींत असा निर्धार केला आहे. कारण, श्री विश्वेश्वराचें देऊळ व मशीद हीं दोन्ही एकमेकां पासून जवळ असल्या कारणानें शंख व घाटा यांच्या नादानें आपणास निमाजाचे वेळीं त्रास होतो असें ते ह्मणतात. परंतु या ह्मणण्यास तेथील कलक्टर आड येत असून आह्मी तुमची नवीन वहिवाट सुरूं करीत नाहीं असें त्यांनीं मुसलमानांस निक्षून सांगितल्यामुळें आणि पोलिसच्या विशेष बंदोवस्तामुळें मुसलमान लोक तूर्त दबून आहेत असें जरी आहे तथापि ते कांहींतरी कुरापत काढण्याचे विचारांत आहेत. श्री विश्वेश्वराचे देवळाजवळ असलेला विशाल अश्वत्थ वृक्ष आपण तोडतो असें त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. व खेदाची गोष्ट ही आहे कीं, हायकोर्टानें त्यांना तो तोडण्यास परवानगी दिली आहे यामुळें कदाचित् मोठा दंगा होण्याची भीति आहे. मग पहावें काय होतें तें.

मुंबईतील कुलाब्यापासून मलबारपर्यंत समुद्रास धक्का घालावा, व त्याला उच्छवास ठेवावे, ह्मणजे भरती ओहटीपासून उत्पन्न होणारी गति त्यातून आंत घेऊन त्याचा गिरणीच्या कारखान्यांस वगैरे मोठा उपयोग करून घेतां येईल, अशी कल्पना मि० आर्चिबल्ड ए. क्राफर्ड नांवाच्या मुंबईत आले ल्या एका इंजिनियरानें काढली आहे.

काशीस एकही हिंदु कामगार किंवा माजिस्त्रेट नाहीं. सर्व मुसलमान आहेत. एक हिंदु जातीचा आहे, पण त्याला हिंदु ह्मणण्यापेक्षां मुसलमान ह्मणणें जास्त शोभेल असें आहे, असें तिकडील पत्रावरून समजतें असें कां?

यंदां ग्रेटब्रिटनमध्यें चांगलें पीक न आल्यामुळें १२ लक्ष खंडी गहूं बाहेर देशांतून आणावा लागेल. क० त०

ब्राह्मण सोसैटी— बंगाल्यातील हिंदु लोक धर्म मंडळीच्या देखरखी खालीं ''ब्राह्मण रक्षक'' नांवाची एक संस्था स्थापन करण्याचे उद्योगास लागले आहेत असें स्टेट्समन वरून समजतें. ब्राह्मण लोकांत संस्कृत ज्ञान कमी होऊं लागलें आहे, तें वाढविण्या करितां संस्कृत पंडितांस व त्यांच्या शिष्य वर्गास वर्गणीनें द्रव्याची मदत द्यावी हा ह्या संस्थेचा मनोदय आहे. उद्देश स्तुत्य आहे. स० शो०

मनरो नांवाच्या साहेबांनीं समुद्राची खोली मोजण्याची योजना केली आहे. पाण्यांत दगड टाकण्या ऐवजीं एक शिशाची गोळी टाकावी. तिला बार होणारे दारूची योजना करून तळाशी बार झालेला ऐकतां येईल अशी योजना केली असल्यामुळें पाण्यांत पडल्यापासून किती वेळानें गोळी खाल पोंचली हें पाहून त्यावरून पाण्याची खोली बरोबर काढतां येते.

---

दिवाणी नमुना नंबर ४४

हुकूम—भागीदारी मोडण्याविषयीं

आक्ट नंबर १० सन १८७७ इसवी

यांतील कलम २१५ प्रमाणें

दिवाणी दावा नंबर४९ सन१८९१

विद्य० सिविल ज्यडज्य साहेब बहादूर

जि. आकोला

यांचे कोर्टांत

रामप्रताप पोकरदास मारवाडी वस्ती हात तालुके बाळापूर. } वादी

नारायणदास दयाराम व लक्ष्मणदास रामचंद्र मारवाडी वस्ती लालपाडी जि० नाशीक. } प्रतीवादी

दावा रु. ९०००

असें ठरविण्यांत येतें आहे कीं, वादी प्रतीवादीचें दरम्यान भागीदारी असल्याचें फिर्याद अर्जांत लिहिलें आहे ती २९ माहे सपटंबर सन १८९१ पासून मोडली असें समजलें पाहिजे व असा हुकूम होत आहे कीं, त्या दिवसां पासून ती भागीदारी मोडली ह्मणून वऱ्हाडसमाचारपत्रांत जाहिरात द्यावी.

आणखी असा हुकूम होत आहे कीं, या दाव्यांतील भागीदारीची इस्टेट व चीजवस्त यांची राव साहेब देवराव विनायक वकील वा॥ अकोलें रिसिव्हर याणें वहिवाट करावी. व विकत दिलेले मालांचे किंमती बद्दल भागीदारीच्या हिशेबी मांडून ठेवलेलीं कर्जें वसुल करावयाची असतील तीं व लोकांकडेस येणें असेल तें सर्व वसूल करावें.

व असा हुकूम होत आहे कीं, खालीं लिहिल्या प्रमाणें हिशेब द्यावे.

१ सदरहू भागीदारीचा हल्लीं जो पैका येणें असेल, मिळत असेल व चीज वस्त असेल त्याचा हिशेब.

२ सदरहू भागीदारीचे कर्जाबदल व जबाबदाऱ्यांचा हिशेब.

३ पुरा झालेला हिशेब या दाव्यांत दाखल केला असल्यास त्याच्या शेवटा पासून व पुढील एखादे हिशेब पुरे झाले असतील त्यांत गडबड न करितां वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान जे सर्व देवघेव व व्यवहार याचा हिशेब.

आणि असा हुकूम देण्यांत येत आहे कीं, फिर्याद अर्जांत लिहिल्याप्रमाणें वादी व प्रतीवादी हे आज पर्यंत जो धंदा चालवीत आहेत त्या धंद्याची गुडवुईल व व्यापाराचें भांडवल व्यापाराचे जागीच विकावें. व पक्षकारा पैकीं कोणी पक्षकारानें अर्ज केल्यावर सदरहू विक्रीच्या वेळीं गटा पैकीं सर्व किंवा कोणतें ही गटाची कमींत कमी घ्यावयाची किंमत रजिष्टरानें ठरवावी व त्या विक्रींत विकत मागण्याची पक्षकारा पैकीं कोणासही परवानगी आहे.

आणि असा हुकूम करण्यांत येत आहे कीं, तारीख १५ माहे नोवेंबर सन १८९३ इ० चे पूर्वी सदरहू हिशेब द्यावे व जीं दुसरीं कामें केलीं पाहिजेत तीं पुरीं करावीं व हिशेबांत काय निष्पन्न होईल तें लिहून बाकी सर्व कृत्य पुरीं झालीं ह्मणून रिसिव्हरनें दाखल्यांत कळवावें. व या कामाचा हा दाखला तारीख १५ माहे नवेंबर सन १८९३ रोजीं पक्षकारास पहाण्या साठीं तयार ठेवावा.

व शेवटचा असा हुकूम होत आहे कीं, अखेर हुकूमनामा करण्या साठीं तारीख १६ माहे नवंबर सन १८९३ पर्यंत हा दावा तहकूब व्हावा. रिसिवर याच्या दुकानच्या माल मिळकतीची वहिवाट करण्याबद्दल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें फी मिळेल.

आज तारीख १५ माहे सप्टेंबर सन १८९३ रोजीं आमचे सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशी दिला.

V. N. Dandekar

शिक्का सिव्हिल ज्यडज्य.

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर ,, ७ ,, १८

किरकोळ अंकास .............................. ४

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०।०६

दुसरे छपेस ......०।

Six monthly............3 " 8 as

Single copy.................................4a.

Advertisement Below 10 lines...2 Rs per line over10 .. 4 as Repetition per line 3as.

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL. XXVII — AKOLA MONDAY 9 OCTOBER 1893 — NO 40

वर्ष २७ — आकोला सोमवार तारीख ९ माहे आक्टोबर सन १८९३ इ० — अंक ४०



## जाहिरात

संस्थान सोंडूर, जिल्हा बळारी इलाखा मद्रास येथें श्री कार्तिक स्वामीचें महास्थान आहे तेथें चालू साली ह्मणजे कार्तिक शु० पौर्णिमेस महायात्रा भरणार आहे तर यात्रेस येऊं इच्छिणाऱ्या मुमुक्षु लोकांच्या सोयी करितां खालीं लिहिल्या प्रमाणें टिकीटांचे दर ठेविले आहेत.

| | रुपये |
|---|---|
| पंचामृताभिषेक | २५ |
| सर्वांगाभिषेक | १५ |
| पादाभिषेक | १० |
| पादस्पर्श | ५ |
| दर्शन टिकीट | २ |
| बारावर्षांचे आंतील मुलांस दर्शन टिकीट | १ |

कार्तिक शुद्ध १४ रोजीं अभिषेक वगैरे बाबत टिकिटें देण्यास सुरुवात होईल शु० १५चे दिवशीं सकाळीं ७ वाजता दर्शनास सुरवात होईल. सदर टिकीटें श्री कार्तिक स्वामीचे डोंगरावर विकत मिळतील. ब्राह्मणा वांचुन इतर लोकांनीं अभिषेक व पादस्पर्श वगैरे ब्राह्मणद्वारें करवावे.

यंदा देशकाल सुभिक्ष आहे. संस्थान सोंडूर येथें येण्यास हासपेट स्टेशन ६ कोस, गादिनूर स्टेशन ४ कोस, तारणगल्ल स्टेशन ४ कोस याप्रमाणें सोंडुरा पासून रेल्वे स्टेशनें आहेत. सोंडूराहून कार्तीक स्वामीचा डोंगर २ कोस आहे स्टेशनाहून सोंडुरास येण्यास गाड्या वगैरे मिळतात. यात्रेकरू लोकास कोणत्याही गोष्टीचो तसदी नाहीं. श्री स्वामींचे दर्शन घेण्यास योग कार्तीक शु० १५ दिवशीं संपूर्ण आहे.

भिमराव पोळ म्यानेजर.

---

नोटीस

नोटीस वेशमी सिवरामजी वल्दद रघुनाथजी केष्टी अडनाव मंडळीक राहणार अंजनगांव पैकीं पेठ शनवारा यासी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तू माझा साक्षांत बाप असून तुझी व माझी मिळविलेली इस्टेट रुपये चार हजारची आहे. हल्लीं तुमचे व माझें आपसांत बनत नसल्यामुळें तुह्मीं त्या मालाची आफरातफर करण्याचे बेतांत आहा करितां नोटीस देतो कीं सदरहू इस्टेटीची आफरातफर करणार नहीं याजबद्दल योग्य जामीन द्यावा नाहीं तर तुमचेवर फिर्याद करून आपला हिस्सा निराळा करून घेईन कळावें ता० २९।९।९३ इ०

सही.

भगवान वल्दद सिवरामजी

दस्तूर

खुद्द


## शिक्षण पद्धति.

### ( इतिहास )

( मागील अं. व. पुढें चालूं )

वि०— गुरुजी, ही गढी अमक्यानें अमुक वेळीं बांधिली, असा लेख दगडावर लिहून ठेवण्यापेक्षां कागदावर असतां तर काय हरकत होती; लिहिण्याच्या कामीं दगडाचा उपयोग करण्यांत हेतु काय!

गु०—मुला, गढी देऊळ, पूल, धर्मशाळा, तलाव, विहीर इत्यादि सार्वजनिक उपयोगाचीं कामें चिरकाल टिकावीं असा तीं काम करणाराचा हेतु असतो. व "देह त्यागितां कीर्ति मागें उरावी" या साधूक्ती प्रमाणें आपलें नांव आपल्या मागें प्रसिद्ध राहावें या हेतूनें वरील प्रकारचीं कामें लोक पुष्कळ पैसा खर्चून तयार करितात. बांधणाराचें नांव वगैरे शक कागदावर लिहून जर तो कागद इमारतीवर चिकटविला, तर कागद लवकर नाश पावणारा पदार्थ असल्यामुळें, इमारत बांधणाराचें नांव लोकांसमोर नेहमीं राहणार नाहीं.

वि०—त्या कामांचा लोकांस उपयोग होतो, ह्मणून तीं कामें करणाराचे उपकार होतात परोपकारा सारखें पुण्य नाहीं असें ह्मणतात त्या प्रमाणें पुण्य गांठीं पडलें ह्मणजे झालें, नांवाशीं काय करावयाचें आहे.

गु०—अमक्यानें अमुक चांगलें काम केलें, असें वारंवार पाहिल्यानें तसें आपण करावें अशी स्फूर्ति होते. सद्गृहस्थांचीं चरित्रें वाचून व पोथ्या पुराणें ऐकून जो फायदा करून घ्यावयाचा तो हाच कीं त्या गोष्टी क्रिया प्रमाणें पुढें ठेवून आपल्या वर्तनास तसें वळण लागेल असा उद्योग करावयाचा. अकोल्याच्या कायब्रीत प्रवेश करितांना, ती इमारत बांधणारे बाबूजी देशमुखांचें स्मरण होतें. या देशमुखांना ती इमारत बांधून देण्याला स्फुर्ति झाली, तिला तरी अन्य ठिकाणीं अशाच प्रकारच लोकोपयोगीं दुसऱ्या ठिकाणी केलेलें काम कारण असावें.

वि०—धर्मशाळा व अशा प्रकारच्या दुसऱ्या कामाच्या इमारतीवर प्रसिद्धी साठीं शिला-लेख असतात, त्याचा उपयोग आतां मला चांगला समजला, गुरुजी हल्लींचा एखादा बडा गृहस्थ पूर्वीं गरीब स्थितींत असतां, त्यानें कसा विद्याभ्यास केला व तो कसा लौकिकास चढला, या गोष्टी आमचे बाबा रिकामपणीं मला कधीं कधीं सांगतात त्यामुळें त्यांच्या प्रमाणें आपण ही उद्योग करून कीर्ति मिळवावी, असें माझ्या मनात येतें, व मला असें वाटावें, असाच बाबांचा हेतु असावा, यांत संशय नाहीं.

गु०—मुला, तुझे वडील सुज्ञ आणि सुशिक्षित आहेत. त्यांच्या शिक्षेनें तुझें कल्याणच व्हावयाचें. असो आपण बोलतां बोलतां बरेंच विषयान्तर केलें. या गढीवर जसा हा शिलालेख आहे, तसे लेख मुसलमानांच्या मशिदींवर, थडग्यावर देवळांवर पुष्कळ असतात. एखाद्या लढाईंत जय मिळाल्यावर विजयी सरदार त्या ठिकाणीं जयस्तंभ लोखंडाचा अथवा दगडी बांधितो त्यावर ती लढाई केव्हां कोणामध्यें झाली जय कोणी मिळविला, वगैरे लेख त्यावर असतो. आपल्या देशांत पुष्कळ ठिकाणीं असे लेख अद्यापि आढळतात मागल्या काळांत ज्या गोष्टी घडल्या, त्यांचे साक्षीभूत ते लेख होत.

वि०—पण असल्या लहानशा लेखाव रून मागल्या सर्व गोष्टी सविस्तर कळत नाहींत. त्या कशा कळतील?

गु०— फार प्राचीन काळच्या ह्मणजे दोन तीन हजार वर्षांपूर्वींच्या गोष्टी दंतकथा, पुराणें, धर्मशास्त्र, शिलालेख इत्यादिकांवरून अमुक तऱ्हेनें त्या घडल्या असतील असें ठरवितात. त्या नंतर या देशांत वायव्य दिसेकडून मुसलमान लोक येऊं लागले. या लोकांनां घडलेल्या गोष्टी लिहून ठेवण्याची मोठी आवड होती, व त्यात कित्येक प्रसिद्ध लेखक होऊन गेले. त्यांच्या लेखावरून अलिकडच्या काळचा वृत्तांत घेतला आहे. मुसलमानांच्या मागून युरोपिअन लोक ह्मणजे आपण ज्यांस साहेब लोक ह्मणतों, ते आपल्या देशांत आले. या लोकांमध्यें लेखनकला पूर्णतेस आली होती शिवाय ते मोठे शोधक व उद्योगी होत. त्यांनीं या देशांत ज्या ज्या गोष्टी पाहिल्या व ऐकल्या, त्यांचा फार बारकाईनें शोध लावून, त्यांचा वृत्तांत लिहून ठेविला आहे.

वि०— हिंदु लोकांत घडलेल्या गोष्टी लिहून ठेवणारे कोणीच नव्हते काय?

गु०— हिंदु लोकांस कवितेची फार गोडी होती. त्यांणीं प्रत्येक गोष्टीवर कविता केल्या आहेत. वैद्यशास्त्र, धर्मशास्त्र, शिल्पशास्त्र, व्याकरण या सर्व विषयांवरील आमचे ग्रंथ कवितावद्ध आहेत. कविता रसाळ होण्या करितां त्यात सत्यापेक्षां कल्पना फार असते. या मुद्यावर अलीकडील विद्वान लोक भारत भागवत व इतर पुराणें यांतील गोष्टी त्या काळीं खऱ्या घडल्या असतील असें मानत नाहींत.

वि०— गुरुजी, आज आपण मला इतिहास शिकविणार होतां, तो इतिहास ह्मणजे काय बरें?

गु.— एवढा वेळ आपण जें बोललों, तें सर्व इतिहासा संबंधेच बोललों इतिहास शद्बाचा तुला अर्थ सांगितला ह्मणजे तें तुला कळेल. इतिहास यांत तीन शद्ब आहेत, ते— इति, ह, आस. हे शद्ब संस्कृत आहत. इति ह्मणजे येणेंप्रमाणें, ह ह्मणजे खरें, आणि आस ह्मणजे होतें किंवा झालें. इतिहास ह्मणजे येणें प्रमाणें खरेंच घडलें. ज्या ग्रंथाला आपण इतिहास ह्मणतों त्यांत मागल्या काळीं खऱ्या घडलेल्या गोष्टी असतात. वऱ्हाडचा इतिहास ह्मणजे वऱ्हाडांत घडलेल्या मागील गोष्टी. महाराष्ट्र देशाचा इतिहास ह्मणजे महाराष्ट्रांवाऱ्या देशांत घडलेल्या गोष्टी. याच प्रमाणें एखाद्या पदार्थाचा किंवा स्थळाचा इतिहास याचा अर्थ त्या पदार्थाच्या किंवा स्थलाच्या संबंधानें झालेल्या गोष्टी किंवा वृत्तांत.

वि— गुरुजी, इतिहास शद्बाचा आतां आपण अर्थ सांगिला, त्यावरून एवढावेळ आपण ज्या ज्या गोष्टी सांगितल्या त्या सांगण्याचा हेतु मला कळला. (पु. चा.)

---

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ३० शके १८१५

---

## राजा प्रजा आणि तिचें शिक्षण

( ३७ अंकावरून पुढें चालूं)

पण प्रजेला शिक्षण देऊन शहाणी करणें, तिचीं मनें सुसंस्कृत करणें, तिला सन्मार्गाला लावणें व अशा तऱ्हेनें गुन्ह्यांचें मान कमी करण्याचा प्रयत्न सरकारानें करणें ह्मणजे त्यानें ईश्वराच्या घरीं मोठा थोरला गुन्हा केल्याप्रमाणें होतों. सरकारानें प्रजेला शिक्षण देणें ह्मणजें मोठें पाप आहे. असेल! आमच्या मतें हें पाप जरी सरकारच्या हातून घडलें तरी हरकत नाहीं. व त्या बद्दल ईश्वरी न्याया प्रमाणें सरकारला शिक्षा भोगावी लागली तरी हरकत नाहीं. पण ईश्वराच्या येथें असा उलटा न्याय असण्याचें संभवतें तरी काय! माझ्या सारखेच प्रत्येक मनुष्यानें शहाणें व्हावें, दयाळू व्हावें, नीतिमान व्हावें, असें त्या जगन्नियंत्याला रात्रंदिवस वाटत नसेल काय? त्याच्या एकंदर कृत्यावरून त्याला असें वाटत असेल असें प्रत्येकजण कबूल करील. आणि तो तर सर्व सरकारांचा सरकार सर्व राजांचा राजा! तो परमेश्वर सुद्धां जर आपलीं लेकरें शहाणीं व्हावीं ह्मणून खटपट करीत आहे तर मग प्रजेला शिक्षण देण्याचें काम सरकारानें कां पत्करूं नये, साखर गोड लागते. पण तिची गोडी जो खातो त्याच्या जिभेलाच व्यक्त कळते. एकानें साखर खाली ह्मणजे दुसरा काय गोड आहे बोवा साखर ही असें कांहीं ह्मणणार नाहीं. आतां ही साखर गोड ह्मणून सर्वांना हवीशी वाटते

व तो मिळण्यासाठीं प्रत्येकजण प्रयत्न करितो. पण ती साखर न खाल्ली तर मोठासा तोटा होतो असें नाहीं. पण ज्ञानाची गोष्ट तशी नाहीं. ज्ञान तर साखरे पेक्षां हजारों पटीनें गोड आहे. ज्ञान हें केवळ अमृतच आहे. पण त्याची चव एकानें जरी घेतली तरी पुष्कळांचा फायदा होतो. पण हें ज्ञान चाखण्याला फार श्रम लागतात, पुष्कळ अवधि लागतो व पुष्कळ पैसाही लागतो. आतां देशांतील जे श्रीमान् असतील त्यांनीं जर ह्या ज्ञानशर्करेची रुची चाखण्याचें मनावर घेतलें तर होण्या सारखें आहे. पण गरीब लोकांची वाट काय? कारण ही शर्करा तर प्रत्येकानें खालीच पाहिजे. त्या शिवाय ह्या पृथ्वीचें पाठीवर जगणें ह्मणजे कुचकामाचें आहे असो. श्रीमान् लोकांची सोय लागेल. पण गरिबाची तोड कशी काढणार? कोणी ह्मणतील कीं पैकेवाल्यांनींच तें काम पत्करावें. पण असे परोपकारी हरीचे लाल पृथ्वीवर होण्याकरितां मुळींच उत्तम ज्ञानाची प्राप्ति व्हावी लागते. तीच जर नाहीं तर परोपकारी पुरुष तरी कोठून उत्पन्न होणार? अ‍ांतच जर कांहीं नाहीं तर पोहोंऱ्यांत कोठून येणार. सारांश काय सांगावयाचा कीं प्रजेला शिक्षण देणें हें पुष्कळ अंशीं सरकारचेंच कर्तव्य आहे. वाचकहो नुसत्या शास्त्रांच्या कोटीवर बसण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. श्रीमान् व परोपकारी पुरुष प्रजेच्या शिक्षणाचें काम चालवितील या शुष्क आशेवर राहून फसूं नका. पैसा मिळविण्यासाठीं मनुष्य जितका झटतो तितका तो आपल्या स्वबांधवांना शिक्षण देण्यासाठीं झटण्याला पुष्कळ अवधि लागेल, व्यापारी लोकांमध्यें व्यापारा संबंधानें जी चढाओढ चालते तितकी चढाओढ "विश्वसौहृद" ज्यांच्या हृदयीं वसत आहे त्यांच्या मध्यें स्वबांधवांना शिक्षण देण्या संबंधीं मुळींच आढळावयाची नाहीं. याचा कांहीं विचार करा. असो. ह्या गोष्टी एकीकडे राहोत. प्रजेला शिक्षण देण्याचें काम जर सरकारचें नसलें तर मग देशाचें परचक्रा पासून रक्षण करण्याचें काम मात्र सरकार आपल्या हातांत कां बरें ठेवितें? हें पाहिजे मग तेंच तेवढें कां नको? या संबंधानें "डेविड् ह्यूम" यानें फारच चांगल्या तऱ्हेनें विवेचन केलेलें आहे. त्यामध्यें त्याचें सौजन्य व त्यांची सुबुद्धता हीं दोन्ही व्यक्त होत आहेत. तो असें ह्मणतो कीं या जगामध्यें असे कांहीं व्यापार आहेत व अशा कांहीं कला आहेत कीं त्या विशेष व्यक्तींनींच केल्या असतां त्यांचा त्यां पासून पुष्कळ फायदा होतो व त्या पासून त्यांना सुखही घडतें. ह्मणून सरकारनें त्यांच्यामध्यें हात घालूं नये हें उत्तम होय. परंतु असे कांहीं धंदे आहेत कीं ते फारच उपयोगी असतात व त्यांपासून समाजाचें सर्वस्वी कल्याण होतें व ह्मणून ते अत्यावश्यक होतात परंतु त्या पासून एखाद्या विशेष व्यक्तीचा कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं किंवा एखाद्या विशेष व्यक्तीला सुखही व्हावयाचें नाहीं. उदाहरणार्थ सैन्याची गोष्ट घेऊं. या संबंधानें सरकारनेंच व्यवस्था लावली पाहिजे असें ह्यूमचें ह्मणणें आहे. अशा ज्या गोष्टी आहेत त्याकडे सरकारनेंच बघितलें पाहिजे. व त्यामध्यें जे लोक गुंतले गेले असतील त्यांना पगार देऊन, त्यांना बक्षिसें वांटून नेहमीं त्या गोष्टी जागृतावस्थेंतच ठेविल्या पाहिजेत शिपाईगिरीकडे सरकारनें इतकें लक्ष्य पुरवावें, तिचा यथायोग्य मानमरातब राखावा, तिच्या प्रीत्यर्थ लागेल तितका पैसा खर्च करावा हें जर इष्ट आहे तर मग 'गुरुगिरी' संबंधानें पडणारा बोजा सरकारनेंच अंगावर घेणें हें इष्ट नाहीं काय? असो. या संबंधानें जितका उहापोह करावा तितका थोडाच आहे.

(पुढें चालू)

## हिंदुस्थान संबंधानें पार्लमेन्ट सभेंत खर्चाचा मसुदा.

थोड्या दिवसा पूर्वी हिंदुस्थानांतील खर्चाच्या मसुद्याच्या संबंधानें झालेला पार्लमेन्टांतील वाद आपणास पुष्कळ अंशीं संतोषप्रद झाला आहे असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं अशा वेळीं हिंदुस्थाना विषयीं कळकळ बाळगणारे जे आमचे स्नेही पार्लमेन्टांत आहेत त्यांना आपल्या हट्टवादी व स्वहिततत्वपर अशा विरुद्ध पक्षांतील लोकांवर पगडा बसविण्यास व आपल्या बाजूस होईल तितकी बळकटी आणण्यास अविश्रांत श्रम करावे लागतील हें निर्विवाद आहे. कांहीं वर्षांपूर्वी जेथें आह्मी कस्पटा समान मानले जात होतो तेथें आतां आमच्या संबंधानें चर्चा होऊन आह्मास ज्या दुःखास्पद गोष्टी आहेत त्यांचा पूर्ण विचार होऊन त्यांचा योग्य न्याय होईल अशी आश्वासनें तरी निदान मिळूं लागलीं आहेत ही कांहीं लहान सहान गोष्ट नव्हे. ज्या दिवशीं ही पूर्ण होतील तो दिवस आह्मा हिंदुस्थानवासी जनांस मोठा सुदिन होईल यांत कांहीं संशय नाहीं. धीरसो गंभीर ह्या ह्मणी प्रमाणें आपणास त्या गौरकाय न्यायमूर्ती विद्वज्जनसमूहा कडेसच अशाच रीतीनें अव्याहत प्रयत्न चालविले पाहिजेत.

आपल्या विशेष मागण्या पैकीं एकाही मागणीस पार्लमेन्टाची मान्यता मिळाली नाहीं.

हिंदुस्थान व इंग्लंड यांचे वसुलाबाबत जे परस्परांशीं संबंध आहेत त्यां विषयीं व हिंदुस्थानवासी जनाच्या काटकसरीच्या खर्चाच्या स्थिती संबंधीं विचार करण्या साठीं ह्मणून एक राजनियुक्त कमिशन नेमावें ह्मणून सुचना करण्यांत आली होती, परंतु त्या सुचनेचा विचारच करण्यांत आला नाहीं. ह्या सुचने विरुद्ध मत देणारे आमचे देशाचे खरे हितद्वेष्टे सर जॉर्ज चेसने व सर अन्ड्र्यू स्कोबल हे होत. ह्यांतील वरील विद्वान् गृहस्थानें असें प्रतिपादन केलें कीं हिंदुस्थानांतील लोकच आमच्याशीं नेहमीं शत्रुत्वानें वागणाऱ्या लोकांपेक्षां आंग्लदेश ज्याच्या जन्मानें विभूषित झालेला आहे अशा इंग्लिश लोकांस ते आपले अनुशास्ते असावेत ह्मणून पसंत करितात. हेच गृहस्थ राष्ट्रीय सभेस स्वार्थनिष्ठते बद्दल दोष देतात. न्यायी ह्मणविणाऱ्या लोकांस किती बरें हें उचित दिसतें! सुधारणेच्या उच्चतम पदवीस चढलेल्या राष्ट्रांतील विद्वान् लोकांनीं आपल्या हक्काची पायमल्ली होत असलेली पाहून पार्लमेन्ट सारख्या जगन्मान्य सभेंत लहान पोरा सारखी लढा लढी देखील करावी. परंतु जो देश ज्याचे सर्व हक्क हिरावून घेतल्यामुळें निकृष्टावस्थेस पोंचला आहे अशा हिंदुस्थानांतील लोकांनीं आपल्या हक्का विषयीं नुसता विचार करा असें ह्मटलें तरी पार्लमेन्टांत त्यास थपडा मिळतात. हें राजनीतीच्या कोणत्या नियमास अनुसरून होत असेल बरें! सर जॉर्ज चेसने व सर अन्ड्र्यू स्कोबल यांचे मतें जर इंग्लिश अधिकारी सर्वतोपरी न्याय्य तेंच करितात असें आहे तर त्यांनीं त्यांच्या अधिकाऱ्यांच्या कामाची चौकशी करण्या साठीं निष्पक्षपाती असें कमिशन नेमण्यास कां हरकत घ्यावी. ह्यांतील इंगित निराळें काय असेल? मि. रसेल यांनीं दुसरे एके ठिकाणीं मोठी आशा लावून ठेविली आहे कीं राजनियमप्रवर्तनाधिकारी न्यायदर्शन संबंधीं खातें निराळें करूं परंतु त्याला खर्चाची अडचण आहे. सरकारनें अनाथ प्रजेवर ओझें लादून जे एक कोटी रुपये सिव्हिल सर्व्हिसच्या इंग्लिश कामदारांच्या पगारासाठीं जमा केले ते जर इकडे लाविले तर ज्यांच्या पिशवींतून पैसे गेले ते किती संतोषित होतील बरें! हेंही येथें सांगितलें पाहिजे कीं आज एक वर्ष राष्ट्रीयसभा ज्या मागण्या करीत आहे त्यांतील एकही देण्यांत आली नाहीं! असो, एकंदरींत आपणास मिळालें असें ह्मणावयास कांहींच नाहीं! ज्या ज्या लोकांनीं आपणास आश्वासनें दिलीं आहेत त्या लोकांचें स्मरण त्या संबंधानें नेहमीं जागृत करावें व त्यापासूनच आपणास कधीं तरी फायदा होईल ह्यांत कांहीं संशय नाहीं.

हैदराबाद दरबारांत अलिकडे फार फेरफार होऊं लागले आहेत. दिवाण सर अस्मानजहा हे आपल्या दिवाणगिरीचा राजिनामा देणार असल्या विषयीं लोकवार्ता आहे. दुसरें वर्तमान असेंही पसरलें आहे कीं खुद्द निजाम सरकार सर अस्मानजहा यांस कमी करणार असून नवीन दिवाण निवडणार आहेत आणि तसें करण्यास व्हाईसराय साहेबांची मंजुरी आहे. खरा भाग कांहीं असो पण तात्पर्य एवढेंच कीं हल्लींचे निजाम दरबार थंडे नसून अनेक कारस्थानें चालली आहेत इतकेंच नसून टोपीवाल्यांचा पैराम राज्यकारभारांत जोरदारपणाचा व मजबूतीचा होत चालला आहे. हैदराबाद संस्थान इंडियांतलें पहिल्या नंबरचें आहे. तेथील राज्यव्यवस्थेंत दोषस्थळें बहुत असतील पण तीं जो पर्यंत राजनिष्ठपणाला व इंग्रजी राज्याला अपायकारक नाहींत तों पर्यंत त्याचें दूरीकरण करण्याचें श्रेय इंग्रज बहादुरांनीं घेऊं नये असें आह्मी ह्मणतों. निजाम सरकारानें इंडियांतील विद्याविभूषित मुत्सद्यांचें प्रधानमंडळ नेमावें, आपली राज्यव्यवस्था निर्दोष करावी. आणि असें केल्या वांचून मात्र रुष्यांच्या मनूंत दुसरा संस्थानचा तरणोपाय दिसत नाहीं.

गेल्या १ ले तारखेस येथील लायब्ररींत रा. रा. सखाराम गणेश सिरसाळकर वकील संस्थान इंदूर यांनीं इंदूर संस्थानच्या सांप्रत स्थितीवर सभाषण केलें. श्रीमत महाराज बाळासाहेब होळकर यांनीं गादीवर बसल्या पासून आज तागाईत जीं छळकारक, अमानुष व अंतःकरणें हालवून टाकणारीं कृत्यें केलीं व ज्यांचा गवगवा व्हाइसराय साहेबांच्या कानापर्यंत गेला आहे अशा कृत्यांचें कथानक नांवानिशीवार व तारीख मजकूरवार व्याख्यात्यांनीं निवेदन केलें. हें भाषण ऐकून श्रोत्यांचीं मनें उद्वेग, विषाद व निराशा यांनीं बदलून गेलीं पण अध्यक्ष रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांनीं त्या भाषणाचा मतलब, खराखोटा भाग, व तात्पर्य हीं आपल्या सरळ व गोड भाषणानें लोकांस कळविलें तेव्हां पुष्कळ अंशीं समाधान वाटलें. राजश्री सखारामपंत यांचें बोलणें खरें धरलें तर स्वर्गस्थ करवीरकर महाराजा प्रमाणें बाळा साहेबांस उन्मादाच्या ज्ञानशून्यते मुळें कारागृहवास मिळतो, किंवा मल्हारराव गायकवाडा प्रमाणें स्थानभ्रष्ट व हद्दपार व्हावे लागतें, किंवा मणिपूरच्या महाराजा प्रमाणें काळे पाण्यावर अगर सुळावर जावें लागतें याचाच कायतो निर्णय होणें आहे असें भासेल. परंतु अध्यक्षांनीं ह्मटल्या प्रमाणें हें व्याख्यान अरण्यरुदितच आहे तथापिही मराठेशाईचा बाणा जोरदार रीतीनें व्यक्त करिते वेळीं अध्यक्षांनीं व्याख्यात्यांच्या गोष्टी इंग्रज सरकारापाशीं खोट्या ठरोत ह्मणून उद्गार काढिला तोच प्रत्येक जणाचा असेल असें आह्मी खात्रीनें ह्मणतों. राजश्री सखारामपंतांनीं पुन्हा असलें व्याख्यान देऊं नये असें आह्मी त्यांस मोठ्या कळकळीनें सुचवितो. अध्यक्षांच्या भाषणामध्यें नेटीव संस्थानचा कारभार कसा चालला पाहिजे निदान होळकरशाईंतल्या दरबारांत कशा सुधारणा होत गेल्या पाहिजेत याचा विचार होईल अशी लोकांस मोठी आशा होती पण राजश्री आण्णा साहेब यांनीं व्याख्यात्याची आरती करण्या पलिकडे मंडळीचा वेळ घेतला नाहीं. बाकी हें खरें कीं मूळ व्याख्याना पेक्षां त्यांचें भाषण सर्वजनास अत्यंत बोधपर व आनंदकारक वाटलें.

The Berar Samachar

MONDAY OCTOBER, 9, 1893

### A LESSON

It is a trite thing now to say that the Home Rule Bill has been rejected by the House of Heriditary Peers at its second reading. The Irish have been fast struggling for centuries to have their wrongs redressed and no satisfactory concessions have yet been made to the people. That ever busy, generous and sprightly nation has long suffered their grievances to be smothered and they only wanted time and leaders to espouse their cause. Men in every respect equal to their rulers, often represented as part and parcel of the United Kingdom and boasted of being vigorous neighbours are subjected to a series of coercions and contumelies! If such be the holy plan of our rulers, we have little ground to complain of the wrongs we are smarting under. We expected the fury of the whole nation would be justly roused. We expected to read in the journals of the week ending with the 15th. Ultimo a solemn manifestation of the outraged feelings of the people. But the rejection is followed by a lull almost surprising. The Grand Old man is no doubt busy. He has seized the earliest opportunity to visit the North. He has given clear notice that the rejection of the Bill no more concerns the nation for which it was introduced than House of Lords itself. A few manifestos here and there of no considerable importance were issued and circulated. But the general attitude is one of indifference. The National Liberal Federation has issued a manifesto but even that has been passed

by with little comment. The House of Commons itself was occupied with the Estimates. The people of America are perhaps even more interested in the Bill than the people of England themselves. A manifesto has been issued by the Irish National League of America complaining that Mr. Gladstone's Home Rule Bill has been rendered practically worthless, and declaring that Home Rule will never be given to Ireland by the whole Nation. The decision of the Peers at all events seems to have been acquiesced in.

The Liberal papers on the morning after the great division must have been a far greater disappointment to many ardent Gladstonians. The Daily Chronicle, no doubt, gave vent to its due sense of the fast and loose treatment of the hereditary chamber, but the Daily News was singularly mild in its comments on the nobles. All eyes are now naturally turned on the Prime Minister. He has not lost any activity of his, as we have said above. He has however not yet explained his view of the situation. The Gladstonian Liberals do not deny the absence of excitement, but they think it wise not to rouse political enthusiasm at this season of the year. The indecision of the Cabinet in the earlier stages of the Bill did them no little harm in the country, and their final determination to retain the Irish Members at Westminister not improbably damped the ardour of many of their followers. Another discouraging event is the attitude of the Liberal peers during the debate on the second reading of the Bill in the Upper house. The extreme bitterness in the Unionist cup is the irritating tone adopted by Lord Salisbury in his powerful speech never so powerful as when denouncing on the humble humanity over whom accident favours England to domineer! His Lordship refers to Irishmen as foreigners and enemies, dilates upon their perpetual differences and conflicts, holds them up as a people unfit for representative government, says that they want nothing so much as undoing the English people, and dwells upon the incurable quarrelsomeness of the race as His Lordship is pleased to term their indomitable spirit! Such speeches will, it is fondly hoped by all true statesmen, at once bring about the much desired peace and will smooth the way for the adoption by Ireland of a measure of local self Government. We trust even the most ardent admirers of this powerful peer ought to be ashamed of the words and tone of this oration. There is hardly any doubt, that, Home Rule, in some form or other, is absolutely inevitable whether England likes it or not. For better or for worse England is tacked together with Ireland and with her other dependencies. But if such be the respect which Englishmen have for their immediate neighbours, if such be their feelings towards their subjects the only thing open to India is to keep dunning her demands in the ears of her most benign rulers till at length they may be overheard.

Discouraging as the whole proceeding is nothing can be more discouraging than the speech of Lord Salisbury. If this be his contempt for the white man we are not surprised to see him making at one time an eloquent capital out of a "Black Man." This and similar instances are given not to expose the English politics, be it as it may, but to cheer up our men, to enable them to pluck courage and not to be daunted by the bitter and rancorous sarcasms of English statesmen and Anglo Indian officers. India withal her defects is prospersing and sooner or later will be as highly civilised as our rulers themselves if she only keeps within proper limits the true and real use of knowledge, the only unmixed good we are getting at a tremendous cost from them.

---

"Weldone your Excellency Lord Harris", is an ejaculation from every Indian literary mind on hearing the final appointment of Dr. Bhandarkar to the Vice Chancellorship of the University of Bombay. The distinction is both very great and honorable and we had fears, looking to Dr. Bhandarkar's not great a pecuniary status, that he might be suffered to lie in abeyance. But H. E. Lord Harris has shown his capacity to distinguish merit and worth in whatever rank or society. As regards the capacities of the learned Doctor there can be but one opinion. As we have for the first time in Berars and Bombay given an outsketch of his life and career in one of our August issues of 1885, we do not like to repeat what we have once placed before our readers. We are glad our hopes and anticipations have been realized.

---

When we look to the selection of right men to right posts on one side and to men of third rate abilities to second rate posts on the other when we see worthless juniors superseding their seniors without any abilities real or presumptive to the detriment of the whole service the comparative merits of men making proper selections naturally strike themselves most forcibly upon our minds! H. E. Lord Harris would have perhaps better pleased the Indian mind if he had selected from among two or three other equally illustrious Hindu gentlemen. But this selection is still more gratifying to us and glorfying to His Lordship. An old retired antiquarian, with an illustrious service in the field of education crowns his service with a brilliant close! Mr. G. C. Aitken the Head master of the local Governmet High School is now nearly fifty and we earnestly wish the Government of India will grant him an honorable retirement thinking of what he has done for Education in this province against all odds during the last twenty six years. At the great Delhi Durbar of 1877 Mr. Aitken has been awarded under the Queen Empress' signature a parchment for meritorious service in the Educational Department. It is evident his services have been appreciated and recognised till 1877. The further recognition now rests with the Government of India. The Berar public—of course such as is just and self—thinking—will hail with general satisfaction the heitherto—long—looked—for appointment if on the retirement of our revered Raobahadur Jatar the present Director of P. I. Mr. Aitken were not passed over and conferred the post.

---

Let us hope for the best and further wish our present vigorous and astute Resident at Hydrabad to consider the claims of Mr. Krishnaro Purshottam Bhat B. A., the son of the late lamented Purshottamrao Bhat, demised while ardently discharging his public duties without any burden on Government in the shape of pensions. Mr. K. P. Bhat it is hoped will pass his Bombay—L. L. B this year and will thus eminently qualify himself for a substantial Government appointment both by an illustrious pedigree and by highest available self—compentency.

To pass over Mr. Gopal Waman Bapat B. A. L. L. B. the son of an equally worthy native officer RaoBahadur Wamanrao Baput of Amraoti, now on the eve of retirement after an eminent and vigorous service like that of the late lamented Mr. Bhat would be like withholding a stimulus to honest work and to an idea of a hereditary interest in public Service.

The three cases suggested today are all very hard. But the hardest of all is that of Mr. Aitken, now on the verge of retirement himself. If Government do not avail themselves of his long experience of the province, of his exemplary character to which we have often boldly and almost singly referred, and lastly of the chance of an honorable retirement, the only chance left, not only that people will feel for the injustice, but a vigorous working of the Department will be impossible if those serving in the Department were repeatedly ignored and passed over. With the present administrator as the Resident and with Raobahadur Jatar as the Director of Public Instructions we have little doubt Mr. Aitkin's claims cannot be passed over.

---

Cow-protection and riots have been connected as cause and effect by some scheming and mischievous people. Both these facts are linked in no other common relation than the relation of time and space. Gorakhan Societies and riots exist in the same places and times. But it is a very narrow and misguiding view of this casual link in regard to time and space. If it were so any thing may be said to be cause or effect of any other thing. The Bombay Gazette has ably pointed out the gist of the ill—founded argument. The daily paper observes thus:—

"A rumour seems to have gained wide currency in the disturbed districts of Upper India, says the *Hindu Patriot*, to the effect that the Government has determined to suppress the cow-protection societies and that the animals sheltered and owned by those societies will shortly be sold away by public auction. We do not know what foundation there may be for this rumour, but the fact that such rumours should be rife, only shows that the Hindus have learnt by bitter experience to be prepared for anything and to be surprised at nothing. We, however, venture to think that even the Government of Sir Charles Crosthwaite who appears to have surpassed Sir Auckland Colvin in his harsh and unsympathetic treatment of the Hindus, may well pause before proceeding to make such an inquisitorial proposal. And if, as we believe, the rumour is devoid of foundation, the authorities can do worse than take, and promptly take such steps as will lead to the dissipation of a mistaken and mischievous impression which, if left uncontradicted, will assuredly destroy that small remnant of confidence which the Hindus still repose in the integrity and impartiality of their rulers."

---

We give below the remarks of the Judicial Commissioner in connection with the high duration of civil suits in some of the districts. The comments are indeed recommendtions to remodel the judicial system in vogue Mr. Bullock obrerves:—

"It is exceedingly difficult to bring home a fault of this kind, when the time officers have for disposal of cases is so much subject to interruption by miscellaneous and varien duties. When the officers presiding over civil courts are liable to be called on to perform the duties of a magistrate disposing of urgent criminal work, or the peremptory demands of a treasury, or the exigencies of a revenue enquiry, it is impossible to lay down a hard-and-fast rule, but it should be our aim, I think, to provide at least one principal civil court and one court of small causes in each district which is not liable to such interruptions. Another cause of high duration is of course frequent transfers of officers. This is at times unavoidable; but whenever necessary it should be carried out with due regard to the work in hand. It will be seen at once that the lowest duration in contested cases is in Buldana and Bassim, where there have been the fewest changes, while in Ellichpur the high duration of both contested and uncontested cases is no doubt due to the constant change of officers to which that district has been subjected during the past yer. In Amraoti the high duration is due to the heavy pending file at the close of last year. A good deal of the delay in diciding cases is no doubt to a want of firmness on the part of presiding officers shown by granting adjournment for insufficient reasons; and a want of system in preparing their calendar of cases for hearing. I hope that a effort will be made this year to improve this defect, to which I have called attention when inspecting offices and at other times. The district officers are, I think, alive to the necessity of avoiding unnecessary delay in the hearing of cases, but the tendency to increase in the duration is one that they should steadily resist by careful inspection of current work."

---

## वऱ्हाड.

आकोल्याचे डेपुटी कमिशनर क्याप्टन मारिस हे सहा महिन्यांच्या रजेवर येत्या २६ वे तारखे पासून जाणार आहेत.

यवतमाळ आणि बुलढाणा मुनसिपालिट्यांच्या हद्दींत देवी काढण्याचा कायदा लागूं करण्याचा आलिशान रेसिडेंट साहेबांचा विचार आहे तेव्हां त्याबद्दल ज्याची तक्रार असेल त्यांनें ती तिकडे लिहून कळवावी.

मि. शेख महमद इस्मायल एक्स्ट्रा असि. कमिशनर, दर्यापूर यांस माजिस्ट्रेट वर्गरचे फौजदारी, असि. कमिशनरचे मुलकी आणि तीन हजार रुपया पर्यंतचे दिवाणी असे तिन्ही प्रकारचे अधिकार देण्यांत आले.

बुलढाणा जिल्ह्यांतील पहिले वर्ग माजिस्ट्रेट मि. सफदर अलीबेग आणि मि. शापूरजी वीरजी यांस गैरचालीच्या लोकांकडून चांगली वर्तणूक ठेवण्या बद्दलचे जामीन घेण्याचा अधिकार मिळाला.

आकोल्याचे तहासिलदार मि. अनवर अली यांस तहसिलदारीचे पूर्ण मुलकी अधिकार मिळाले.

गेल्या जुलई महिन्यांत या प्रांतांत ८३०२ मनुष्यें जन्मलीं व ५८५८ मरण पावलीं.

रा. रा. बंधूजी जनार्दन एक्स्ट्रा असि. कमिशनर उमरावती व रा. रा. गणेश बापूजी एक्स्ट्रा असि. कमिशनर अकोला हे तीन तीन महिन्यांच्या रजेवर जाणार असल्याविषयीं कळतें.

रा. रा. बळवंत बापुजी तहशिलदार, मंगरूळपीर यांनीं चालूं महिन्या पासून पेनशन घेतलें. हल्लीं अक्टींग तहसिलदारीवर तेथील नायब तहसिलदार रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे हे काम पहात आहेत.

आकोला हायस्कूलांतून यंदा म्याट्रीक्युलेशन साठीं १० उमेदवार धाडले जाणार आहेत.

---

## वर्तमानसार

आमच्या मुलखांत शेतकीचें काम करण्या करितां जर्मनींतून कांहीं बैल कलकत्यास आले आहेत! आमच्या कडील बैलां पेक्षां ते चपळ व सशक्त असून लवकर शिकविले जातात असें कळतें. आमची सर्व शेतकी बैलांवरच चालत असून विलायत प्रमाणें ह्या मुलखांत वाफेवर किंवा घोड्यावर आमची शेतकी मुळींच होत नाहीं असें ठरल्यावरून आमच्या कडील पुष्कळ बैल वांद्र्याच्या यंत्रांतून बचावले होते. पण आतां जर्मनींतील बैल इकडे येऊन जर आमच्या बैलां बरोबर चढ ओढ लावतील तर आमच्या बैलांवर पुन्हा संक्रांत बसेल असें धोरण दिसत आहे हल्लीं जर्मनींतून बैलाचा जो तांडा आला आहे तो महाग तर आहेच, पण त्यांतील बैलांस खाणें फार लागतें असें ऐकण्यांत येतें. असो. परकी लोक आह्मांस आमच्यावर अमल करणारे अंमलदार, आह्मास शिकविणारे प्रोफेसर, आह्मास धर्मोपदेश करणारे धर्मोपदेशक आणि आह्मास लागणारे सर्व जिन्नस पुरवितातच, पण ते लोक आह्मास गायबैलही पुरवूं लागले ह्मणजे आमची पूर्ण उन्नति झाली असें ठरेल! मग त्यांनीं पुरविण्याची काय ती एकच गोष्ट राहिली. ती एवढीच कीं, इकडील नवऱ्यास तिकडील बायको व इकडील बायकोस तिकडील नवरा ! एवढा पुरवठा झाला ह्मणजे मात्र आह्मी पुरे सरदार बनलों ! !

एका इंग्रजी पत्रास एक युरोपियन गृहस्थ हिंदु मुसलमानांच्या दंग्या संबधानें लिहीत असतां गोरक्षणाच्या संबधानें ह्मणतो कीं, रानावनांत राहून रानांतील फळमुळावर निर्वाह करणारे रानटी कोळी कातडी लोकां पासून तों तहत कुळंबी माळी ब्राह्मण लोकांपर्यंत जेवढे ह्मणून हिंदु ह्मणविणारे आहेत त्या सर्वांची गायीच्या संबधानें अतीशय पूज्यबुद्धि आहे. ते लोक गायांस ते आपली माता समजतात आणि खुद्द मातोश्रीच्या अंगावरून तुटल्या दिवसापासून त्याचें पोषण गायीच्या दुधावर होत असल्यामुळें ते लोक जन्मदात्या मातेपेक्षां हीं ह्या गोमातेस जास्त मानतात ह्यांत देखील ते आपली कृतज्ञता पूर्णपणें दाखवितात एवढेंच ह्मणावयाचें. गायास ते आपली माता समजतां ह्यांत त्यांचा दोष मानतां येत नाहीं. कदाचित परकीय दृष्टीनें थोडा बहुत दोष मानला तरी ज्या अर्थी हिंदु लोकांच्या अति अडाणी व रानटी जाती पासून तों तहत अति सुधारलेल्या आणि शहाण्या जाती पर्यंत जर गायांच्या संबधानें अशी पूज्यबुद्धि असेल तर इतक्या लोकांची नाखुषी करून व त्यांचीं मनें दुखावून सरकारानें गोवध कायम ठेवणें शहाणपणाचें दिसत नाहीं. तशांत ह्या लोकांची अन्य रीतीनें समजून होण्यासारखी असती तर गोष्ट वेगळी होती, पण त्यांची तशी कालत्रयींही समजूत पटणार नसून सर्व जातींचा ह्या बाबतींत एकच मुद्दा असल्यामुळें त्यांच्या देशांत गोवध करणें हें घातुकपणाचें आहे ह्यांत संदेह नाहीं असें उद्गार काढणारे हे युरोपियन गृहस्थ पाद्री असून त्यांचें रहाणें ह्या देशांत आज २९ वर्षें झालेलें आहे. आणि ह्या २९ वर्षांचा अनुभव घेऊनच ते वरील हितकारक गोष्ट सांगत आहेत ह्याचा आमेंचें सूज्ञ सरकार विचार करून आपलें व आपल्या गरीब प्रजेचें हित साधतील अशी आमची उमेद आहे. पु० वै०

मुंबईचीं वस्ती-- कुलाबा १७९५७, फोर्ट ६३७९८ एस्प्लनेड १००६४, मांडवी ३७२९५. चकला ३२१०८, उमरखाडी ५२४६६ डोंगरी ३०३१७, मार्केट ४४७५१, धोबीतलाव ३९९४५. फणसवाडी २४०६९, भलेश्वर ३८३६३, खारतळीं २७०३५ कुंभारवाडा ३२२०९, खेतवाडी २८८१४ गिरगांव २६९९९, चौपाटी ११५१२, वाळुकेश्वर १२९९०, महालक्ष्मी १७०१४, माजगांव ३३६४०, ताडवाडी २१२९८, कामाठीपुरा २६९५१, भायखळा ५८५३६, परळ २८७४०, सिवरी ६०६३, माहिम १८५०५ वरळी २५४९३, बंदरांतील होड्या जहाजें यांतील वस्ती २२१४२ एकंदर मुंबईची वस्ती ८२१७६४ यांत जैन २५२२५, ब्राह्मण १७९८२, लिंगायत ७८४. भाट्ये ७८९१ महार भंगी इत्यादि ४५१६९, इतर जातीचे हिंदु ४५१४६५ मुसलमान १५५५०१ पारशी ४७४५८, यहुदी ५०२१ नेटिव्ह ख्रिस्ती १९७१२, युरेशियन ४३३०, युरोपियन ११२९० सिद्दी १४६ बौद्ध १९०.

कांपरडौन नांवाची लढाऊ आगबोट माल्टाच्या बंदरांत बुडाली.

हैद्राबाद संस्थानांत कांहीं फेरफार होणार अशी वदंता आहे सर अस्मानच्या जागेवर दुसरा कोणी तरी नेमला जाणार असें सरकारच्या वर्तनावरून दिसतें सर आस्मानजा हे चाकरी सोडण्यास तयार आहेत परंतु सध्यांच्या हैद्राबादच्या स्थितींत त्यांनीं आपला कारभार सोडावा हें संस्थानाच्या हिताचें नाहीं. सु० प.

मि. जहागीर रेडीमनी ह्यांनीं विलायतेंतील सार्वभौमिक संस्थला मुंबईस येण्या पूर्वी दोन लाखांची देणगी दिली. ह्या उदार देणगी बद्दल तिकडील लोकांनीं त्यास फार वाखाणले.

नोव्हेंबर दोन तारीख पर्यंत पार्लमेंट बंद ठेवण्यांत आली फ्रान्सि जोसेफ बादशाहा ह्याहीं ड्यूक ऑफ क्यानॉट ह्यास आस्ट्रीयन हजार्स मध्यें कर्नल नेमिलें आहे.

जोहारचे सुलतानांनीं सिंगापुरास येण्या साठीं इंग्लंद सोडिलें. ब्रायटन येथील एक स्त्री महाराजा विरुद्ध लग्न करण्याचें वचन मोडण्या बद्दल नुकसानीचा दावा आणीत आहे. नुकसानीचा आंकडा १०००० पौंड ह्मणजे सरासरी १,५०,००० रुपये फार थोडे!!

बाबा खेमासिंग बेदी सि. आय. इ ह्यांची कलकत्याच्या कौंसिलांत अधिक मेंबर ह्मणून पंजाबच्या ले. गव्हरनराच्या शिफारसीनें नेमणूक झाली आहे.

रेलवेकडून नुकसानी—सन १८९१ च्या नवेंबर महिन्यांत नागपुरा नजीक कांप्री येथें जी. आय. पी. रेलवे लाईनवर जो मोठा अपघात होऊन कित्येक युरोपियन शिपाई व नेटीव जखमी झाले, व मेले, त्यांस व त्यांच्या आप्तांस हिंदुस्थानांत ९७२३ रुपये व इंग्लंडांत ११९० पौंड नुकसानी जी. आय. पी रेलवेनें दिली, असें समजतें.

चोर पोलिस—झेलम येथील जंगल खात्यांतली लांकडें दोघां पोलिसांनीं चोरलीं, व चोऱ्या करण्याकरितां त्यांच्या फळ्या ते कापीत होते. त्यांचा गुन्हा उघडकीस येऊन त्यांच्यावर खटले झाले. चोरी केल्याबद्दल त्यांच्यावर शाबित झाल्यामुळें माजिस्त्रेटानें प्रत्येकास सहा महिने कैद व ५० रुपये दंड अशी शिक्षा दिली.

अति वृष्टि—अबू पहाडावर चार दिवसांत मिळून ४४ इंच पाऊस पडला. पैकीं एका दिवसांत १५ इंच पडला. सार्वत्रिक मेघांकडे ह्या चार दिवसांचा चार्ज होता कीं काय?

इजिप्त आणि युनायटेडस्टेटस मधील व्यापार फार झपाट्यानें वाढत चालला असून युनायटेडस्टेटसच्या सरकाराकडून आपले तर्फे प्रति निधी इजिप्त येथें पाठविण्यांत आला आहे. अमेरिकन लोक इजिप्त मधील कापूस खरेदी करतात व त्याच्या मोबदला केरोसिन तेल, यंत्रे व शेतकीची हत्यारें इजिप्तकडे पाठवितात. शु. सू.

डोसा येथें भयंकर वादळ झालें. चौदा इंच पाऊस पडला. शहरांतील मालमत्तेची फार नासाडी झाली. बांबे येथें क्यॉव्हलरीचे कर्नल स्टीव्हन हे ज्या बंगाल्यांत राहत होते तो बंगला मोडून पडला. गांवांत २५० घरें मोडून पडलीं. उत्तम झाडें उपटून गेलीं. तुफान अजून सुरू आहे. बॅरस नदीचें पाणी १८ फूट वाढलें आहे. दोन दिवस पोष्ट मार्ग बंद पडला आहे. बाजारचा बाजार वाहून जातो कीं काय अशी भिती उत्पन्न झाली आहे.

पृथ्वीवर एकंदर १,४५,००,००,००० मनुष्यें आहेत. व पृथ्वीचे कोणत्याही मोठ्या भागावर हल्लीं मनुष्यांची वस्ती नाहीं असें नाहीं. एशिआखंडांत एकंदर ८०,००,००,००० वस्ती आहे, व क्षेत्रफळाचे मानानें पाहतां दर चौरस मैलांत १२० लोक हें प्रमाण पडतें. युरोप खंडांतील वस्ती ३२,००,००,००० असून दर चौरस मैलाला १०० असें प्रमाण बसतें. परंतु वस्ती चोहोंकडे सारखी पसरली नसल्यामुळें आहे तेथें दाट व कांहीं ठिकाणीं तर अत्यंतच दाट आहे. आफ्रिका खंडांतील लोकसंख्या सरासरी २१,००,००,००० आहे व उत्तर, दक्षिण अमेरिकेंत मिळून ११,००,००,००० लोक संख्या आहे. व लहान मोठ्या सर्व बेटांतून सरासरी १,००,००,००० पेक्षा जास्तच वस्ती आहे जगांतील १,४५,००,००,००० मनुष्यांपैकीं ५,००,००,००० मनुष्यांनां चांगलें वस्त्राचा वर्ण मिळत आहे, २५,००,००,००० नेहमीं अगदीं उघडे असतात व ७०,००,००,००० लोक झोंपड्या गुहा वगैरे ठिकाणांतून राहतात व बाकी २२,००,००,००० लोकांनां रात्रीं आडवे होण्यापुरती सुद्धां बांधलेली जागा नाहीं.

हैदराबाद प्रकर्ण—हैदराबाद येथील खरी हकीकत अशी आहे कीं, निजाम सरकारनें हिंदुस्थान सरकारास लिहिलें कीं, आह्मांस आमचे हल्लीचे प्रधानास काढून दुसरे प्रधानास नेमणें आहे' त्याचे जबाबीं गव्हरनर जनरल साहेबांनीं नुसतें कळविलें कीं 'असें करण्याचा तुमचा निश्चय झाला असेल तर तुह्मीं तसें करावें' ह्यावरून हैदराबाद येथें तिखटमीठ लावून अशी बातमी प्रसिद्ध करण्यांत आली आहे कीं, 'जो प्रधान तुह्मी निवडून काढाल त्याची नेमणूक हिंदुस्थान सरकार कायम करील' असें व्हाइसरॉयांनीं सांगितलें. परंतु व्हाइसरॉयांनीं वर लिहिल्या पेक्षां असें 'अभिवचक' कांहीं सांगितलें नाहीं. दि. बं.

कैदी लोक उमगण्यासाठीं त्यांचें मोजमाप घेण्याचीं यंत्रें मद्रास इलाख्यांत आणिलीं असून त्याचें शिक्षण तिकडील पोलिसास हल्लीं देण्यांत येत आहे. व ही पद्धत मुंबई इलाख्यांत ही लौकरच सुरू होईल असें बाबेग्याझेट कर्त्यांनीं लिहिलें आहे.

स्वामिभक्त कुत्रा—झेलम येथील एका मनुष्याला कैदेची शिक्षा होऊन त्याला थोडे दिवसापूर्वीं तेथील तुरुंगांत नेऊन घातलें. त्या मनुष्या बरोबर त्याचा इमानी कुत्रा होता. तोही आपल्या यजमाना बरोबर तुरुंगांत गेला यजमानास कोठडींत घालून त्या कुत्र्याला तेथून हाकलून देऊं लागले; परंतु तो कांहीं केल्या तेथून हालेना! त्यानें कोठडीच्या द्वाराशीं एकसारखी ५।६ दिवस बैठक मारली त्याला तुरुंगाकडील लोक अन्न घालण्यास येत; परंतु तो कुत्रा अन्नास स्पर्श करीना अशा स्थितींत त्याणें आपल्या अन्नदात्याचे संन्निध उपवासी राहून ६ व्या दिवशीं प्राणत्याग केला!! कुत्र्यासारखें इमानीं व शहाणें जनावर खरोखर फार विरळा !! सत्य.

पुणें येथें एका कुणब्याचे पांच सहा वर्षांचें मूल एका मोठ्याशा पण अंकुचित तोंडाच्या तपेल्याशीं खेळत असतां त्यात पडलें आंत पडतांना मुलाला फारशी दुखापत वगैरे झाली नाहीं, पण त्याला बाहेर निघतां येईना पुष्कळ खटपट केली, पण व्यर्थ शेवटीं ते तपेलें तांबटाच्या येथें नेऊन कातलें, तेव्हां मूल बाहेर पडलें!

अशी एक बातमी पसरली आहे कीं, मुंबई आणि मद्रास इलाख्यांच्या गव्हरनरांच्या जागा कमी करून त्याऐवजीं बंगाल आणि पंजाब या इलाख्यांप्रमाणें ले० गव्हरनरांच्या जागा कराव्यात.

मुंबई येथील विश्राम इब्राइम आणि कंपनी यांची 'स्वॉहॅस्मन' नांवाची आगबोट मारिशस बेटात जात असतां टक्कर होऊन बुडाली. ६० मनुष्यें बचावलीं; ६ मात्र बुडाली. ह्या आगबोटीवर गव्हांच्या पिठीचे ४९०० गोण, १५०० गोण मसुरा; ३०० गोण तांदुळ ;१२०० गोण डाळ; व ३६०० गोण धान्याचे होते त्या सर्वांचा नाश झाला असें कळतें.

गायकवाड महाराजांनीं आपले राज्यांत सक्तीचें शिक्षण सुरू केलें असें 'गुजराथी' पत्रावरून कळतें. ७ पासून १२ वर्षें पर्यंत वयाचे मुलगे, व ७ पासून १० वर्षें पर्यंतच्या मुलींनीं शाळेंत गेलेच पाहिजे असा निर्बंध करण्यांत आला आहे.

उत्तर हिंदुस्थानांत सर्व गोरक्षक सभा सरकार बंद करणार. व गोशाळांतील गायीचें उघड रीतीनें लिलांव करून टाकणार, अशा हिंदु लोकांचे मनांत डिवचण्याच्या गप्पा उठल्याचे हिंदुपेट्रिअटमध्यें लिहिलें आहे. क.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर ॥ ० ॥ १८
किरकोळ अंकास ..............................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१८६
दुसरे खेपेस ........०१

Six monthly............3 " 8 as.
Single copy....................................4 as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over10... 4 as.
Repetition per line 3as.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII AKOLA MONDAY 16 OCTOBER 1893 NO 41

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख १६ माहे आक्टोबर सन १८९३ इ० अंक ४१

मिती आश्विन शुद्ध ६ शके १८१५

## पुनः पण तेंच.

दोन आठवड्यापूर्वी आह्मी येथील ट्रेनिंग कालेज संबधानें थोडेसें लिहिलें आहे. आजही आह्मी त्याच संबधानें लिहून ट्रेनिंग कालेजाचा तरी तूर्त निरोप घेणार. परंतु मुख्य भागास लागण्यापूर्वी आह्मा आपल्या पत्रांत शाळाखात्या बद्दलच नेहमीं कां लिहित असतो असा कदाचित् कोणी असमंजस मनुष्य आमचे इतर व्यवसायबंधूंचें ताटस्थ्य पाहून आह्मावर आक्षेप आणील तर त्यास उत्तरादाखल ह्मणून थोडेंतें लिहून मग मुख्य विषयाकडे वळण्याचा आमचा विचार आहे. विद्याखात्यावर विशेष लक्ष असण्याचीं आमचीं कारणें तीन आहेत. पहिलें आमच्या मतें या खात्या इतकें महत्वाचें दुसरें खातें कोणतेंच नाहीं. वऱ्हाडांत व मुख्यत्वेंकरून उमरावती व अकोला या दोन ठिकाणीं वकिलांस व द्रव्याधिक्यास फाजील महत्व आल्या कारणानें या प्राथमिक, सर्वसुखाच्या, सर्व सुधारणेच्या व सर्व जीवनस्तंभाच्या खात्याकडे लोकांचें लक्ष जात नाहीं हा आमचा दोष नसून विपरीत—रसांच्या लोकांचा सन्निकर्ष हाच दोषमूळ आहे. समंजसांची, ज्ञात्यांची, सज्जनांचीच संख्या कमी; दुसऱ्याच्या नादीं लागणारांची, मोठ्यांच्या सहवासानेंच केवळ आपण मोठे आहोंत असें मानणारांची व भासवणारांची, व एकंदर मूर्ख लोकांची संख्या नेहमीं अधीकच असणार. अशांचें कर्तृत्व तेंच आमचें कर्तृत्व असें आह्मी समजत नसून आह्मांस ईश्वर कृपेनें स्वावलंबनाचा सुदिवस अनेक दुःसह व क्लेशदायक संवत्सरांनीं प्राप्त झाला असून आह्मास जें योग्य दिसतें तें आह्मी न लिहूं तर आमच्या कर्तव्यपराङ्मुखते बद्दल आह्मी आपणास अत्यंत निंद्यच समजलें पाहिजे.

दुसरें कारण हें कीं इंग्लंड वगैरे कांहीं ठिकाणीं ज्या प्रमाणें सक्तीचें प्राथमिक शिक्षण आहे, व कांहीं वर्षापूर्वी पुण्यासही म्युनिसिपालिटीचा तें तेथें तरी असावें असा ग्रह होता. व तद्वतच आमचें हा मत आहे. शिक्षणाच्या योगानें मन विकसित होतें. त्याच्याच योगानें मनुष्यास अनपायमूलक सुखें उपभोगतां येतात. त्याच्याच योगानें तो नेहमीं दुसऱ्याचे गुणावगुण पाहून आपली एक सारखी सुधारणाच करीत असतो वाङ्मुद्रीच्या अगर अन्य सुसेवनानें किंवा दुसरी कोणतीही इंद्रियजन्य भोगेच्छा तृप्त झाल्यानें केव्हांना केव्हांना तरी मनुष्यास विट येतोच. पण ज्ञान हेंच काय तें अविट सुख आहे सदसद्विचारशक्ती तरी ज्ञानानेंच वाढते. मात्र अशा प्रकारचें ज्ञान नियमित शिक्षणानें प्राप्त होत नसून मनुष्य सुविचारानें व पुष्कळ माहितीनेंच संस्कृत असल्या शिवाय प्राप्त होणारही नाहीं. तर असें ज्ञान सर्वांस असावें ही आमची उत्कट इच्छा असून तें ज्या रास्त आणि न्याय्य साधनांनीं सर्वांस मिळेल तीं सार्वजनिक लोकांपुढें मांडणें हें आमचें कर्तव्य आहे.

तिसरें कारण आमची हल्लीचे शाळाखात्याधिपति रावबहादूर श्रीराम भिकाजी जठार यांच्या ठिकाणची निःसीम भक्ति, त्यांच्यावरील पूर्ण भरंवसा आणि त्यांच्या हातून नेहमीं आमचें व आमच्या होतकरू बटुवर्गाचें चिरस्थ कल्याणच होईल अशी आमची पक्की खात्री आहे हें. पैकीं निःसीम भक्ति असण्याचीं कारणें बरींच आहेत. त्यांचा पूर्ण उल्लेख करण्यास आह्मी तयार असलों तरी रावबहादूरांस तो रुचणार नाहीं ह्मणूनच आह्मी स्वस्थ बसतों. इतकेंच सांगणें पुरें आहे कीं या पत्रावर त्यांचे कांहीं वर्षापूर्वी पितृप्रेम होतें. त्यांच्याच वात्सल्यामुळें हें पत्र आज हे दिवस बघत आहे. मध्यंतरीं अनेक घोर व प्राणिनाशीच्या क्रान्तीं मधून या पत्रावर दुसऱ्या विद्वानांचे उपकार झालेले आहेत. परंतु आज जोव एकाव व्यक्ती संबंधाचा आल्यामुळें आमचें कृतज्ञताऋण फार थोडक्यांत लोकांस कळविलें आहे. कांहीं अधम लोकांस खरी भक्ती, स्पष्ट वक्तेपणा व खऱ्या भक्तीचाच विषय सूक्ष्मपरीक्षणाचा विषय असतो हा विरोधच समजत नाहीं ह्मणून ते आमच्यावर अतिनिंद्य वाग्बाण सोडिल्या शिवाय रहात नाहींत, हें आह्मी समजून आहों. पण "न्याय्यात्पथः प्रविचलन्ति पदं न धीराः" हेंच आमचें समाधान आहे. ही गर्वोक्ति नव्हे. आतां रावबहादूर यांच्या ठिकाणीं जरी आमचा अत्यंत पूज्यभाव आहे तरी प्रसंग विशेषीं मतवैचित्र्यामुळें व विद्याप्रसराच्या उत्कट इच्छे मुळें जर कदाचित् आमच्या मतें त्यांजकडून नजर चुकी झाली दर ती त्यांच्या लक्षांत आणण्यास ते सर्वथैव योग्य गृहस्थ आहेत हाही आमचा पूर्ण भरंवसा. सरकारी कामें आपण कैक द्विपाद प्राण्यांकडून योग्य रितीनें बजाविलीं जात आहेत असें पहातो. तीं कधींही अडन राहिलीं आहेत असें नाहीं. परंतु आजपर्यंत जे एतद्देशीय मोठ्या अधिकाराचे अंमलदार झाले त्या सर्वांमध्यें व रावबहादूरांमध्यें जो विविक्षीत फरक आहे तो आह्मी वारंवार मोठ्या पूज्यभावानें, आदरानें, वन्द्यतेनें आणि उत्साहानें कबूल केलेला आहे. वारंवार मनुष्य दुसऱ्याचे दुर्गुण पाहून ते सुधारण्याची खटपट करीत नाहीं इतकेंच नाहीं तर ते पाहून त्याच्या असंबद्धपणानें आपली अनेक प्रकारें करमणूक करून घेतो पण तेच जर आपल्या अंतःकरणतत्वनिर्मित पूज्यजनाचे ठिकाणीं आढळतील तर मनुष्यास त्यांबद्दल एका प्रकारचा विषाद वाटून तो आपले ठिकाणीं फार खिन्न होऊन तन्निवारणार्थ यथामति उपाय योजतो. शाळाखात्यांत व इतर सर्व कामगारांमध्यें अनेक दोषयुक्त कैक लोक आहेत. परंतु जसे ते गुणाधिक्यानें जास्त पूज्य असतील त्याच प्रमाणानें त्यांच्यांत जर क्वचित् प्रसंगीं एकादी उणीव दिसली तर ती विषयीं स्पष्ट बोलणें आमच्या मतें फार जरूर आहे. रावबहादूर यांच्या ठिकाणीं आमची पूज्यबुद्धि आहे ह्मणूनच आह्मी त्यांच्या कारभारावर इतकी सूक्ष्म प्रेमपूर्वक नजर ठेवतों. एकाद्या आडदांड आडमुठ्या, अल्पाधिकारतुष्ट क्षुद्र पेषकारानें चूक केली असतां आपल्या पुढें येणारे पन्नास रुपड्यांच्या दाव्यांतील पक्षकार मारवाडी यांवर तो नळफडेल परंतु तीच चूक एकाद्या मोठ्या अंमलदारानें केली असतां ती व्यक्त केल्यावर ती पुन्हां तो अधिकारी न होऊ देईल तर आम्ही आमचें एक प्रकारें कर्तव्यच केलें असें आम्ही समजतों. आमची कृतज्ञता या तत्वाची आहे. शिवाय शाळाखात्यांतील बहुतेक मंडळी विद्वान असल्यामुळें त्यांच्या बद्दल बरें वाईट जें योग्य दिसेल तें लिहून त्यांचा परिचय वाचकांस आह्मी करून देतों. खोट्या भुलथापांनीं सार्वजनिक संस्थांस मिथ्यावचनांनीं फसवणाऱ्या दांभिकांची स्तुती मुंबईच्या प्रसिद्ध इंग्रजी प्रत्याहिक पत्रांत कधी कधीं प्रचुर लेखानें व कधीं कधीं विद्युत्संदर्शानें आम्ही करीत नाहीं या बद्दल आम्हास विषाद वाटत नाहीं. मि० नारायण राव हरकरे यांनीं यज्ञोपवीत काढून टाकलें तरी किंवा त्यांचें पुनरुद्धारण केलें तरी त्या बद्दल आम्ही विचार न करितां ज्यांच्या कच्छपी ते आहेत ते जर विद्वान असून त्यांच्या उदाहरणानें कांहीं तरी जनसेवा अगर जनलाभ होत असल किंवा होण्याचा संभव असेल तर त्यांचा मात्र समाचार वऱ्हाडसमाचार घेण्यास मागें पुढें पहात नाहीं याचें तत्व तरी हेंच. रावबहादूरांचा वऱ्हाडातील प्रत्येक मनुष्याशी परोक्ष व अपरोक्ष संबंध असून त्यांच्या गुणां बदल त्यांचें अभिनंदन न करणारे आमच्या मतें फारच थोडे सापडतील. त्यांचें खाजगी आचरण तर गुणेकमार्गी असून अनुकरणीयच आहे. त्याच प्रमाणें उत्कृष्ठ विवेकशक्ती, समतोल मन, अतिसूक्ष्मपरीक्षण, शेक्स्पिअर प्रमाणेंच मानवी प्राण्यांच्या स्वभावाचें ज्ञान, मार्मिकता, असाधारण तारतम्यभाव, बहुतेक अंशीं दैविकच प्रसंगावधान इत्यादि खऱ्या ज्ञानमूलक गोष्टींमुळें त्यांच्या इतपत सर्व महाराष्ट्रांतही मनुष्य सांपडणें दुर्मिळ हें आह्मी वारंवार व्यक्त केलें आहे. पण वऱ्हाडांत कांहीं अवदृष्टीचे व मंद मेंदूचे वाचक आहेत त्यां करितां हे पुन्हां एकवार लिहिलें आहे.

या प्रमाणें वरील तीन कारणें आमची विद्याखात्यावर इतकी नैसर्गिक प्रीति कां आहे याचीं झालीं

---

## आतां पुनः पण तेंच

अकोला येथील ट्रेनिंग कालेज आजचा विषय मूळ आहे. हा हातीं घेण्यास वरील मुख्य कारणाशिवाय दुसरीं अन्य कारणें आहेत तीं पुढें येतीलच.

" वरिष्ठांचे दोष दाखविण्यास कांहीं हरकत नाहीं. आपले दोष लोकांनीं दाखविल्या खेरीज आपणास ते कधीं कधीं कळत नाहींत. व मी आपणास कळवितों की, कितीही हलक्या पगाराच्या मास्तरानें योग्य सूचना केलेली असली तरी ती विषयी मी पुरा विचार करीन. अमुक गोष्ट करूं नये अशा विषयीं आमचा कधीं हा दुराग्रह नसतो. जेव्हां आह्मांस ती मान्य करितांच येत नाहीं तेव्हां आमचा निरुपाय असतो."

मे० रा० ब० जठार यांचें भाषण—
(सन १८९१ साळचा शिक्षकसमाज
रिपोर्ट पान २०)

या वरील अभिवचना वरून आह्मास काय सूचना करणें आहेत त्या आज आह्मी करण्याचें योजिलें आहे. तसेंच याच साळच्या रिपोर्टांत रा. ब. यांणीं समाजविसर्जनाचे वेळीं पान २१ मध्यें दुसऱ्या कालमाच्या पहिल्या पारिग्राफामध्यें शिक्षकांस उपदेश केला आहे त्यावरून राव बहादूर यांना शिक्षक कसे असावेत याची उत्कृष्ट कल्पना आहे व त्यांच्या उन्नत्यर्थ रात्रंदिवस त्यांच्या मनांत विचार घोळत असतात असेंही दिसतें. रा. ब. यांचीं आजपर्यंत अनेक भाषणें झालीं असतील व आह्मी बरींच ऐकलींही आहेत पण इतकें कळकळीचें, जोरदार, व खुबीदार क्वचित्च दुसरें एखादें वठलें असेल. रा. ब. यांनीं शिक्षकांच्या गुणां संबंधानें सांगितलेंच आहे. आमचा विचार त्यांच्या कर्तबगारीबद्दल लिहिण्याचा आहे. शिक्षक समाजांत जीं शिक्षकांचीं भाषणें झालेलीं छापून प्रसिद्ध आहेत त्या वरून बऱ्याच शिक्षकांस आपल्या कारागिरीची कल्पनाही नाहीं असें दिसून येतें.— शिक्षक हा अतिशय श्रेष्ठ कारागीर आहे. सुतारास लांकूड लागतें; कवीस मनःसूचित आकार व विषय लागतो; चितार्‍यास उत्तम आकृति पुढें ठेवावी लागते; या प्रमाणें प्रत्येक कारागिरास कांहीं धातु अगर उपधातु किंवा दुसरीं साधनें लागतात.

त्याच प्रमाण शिक्षक हा फारच श्रेष्ठ कारागीर आहे. त्याचा सर्व रोख कोमल मनें उत्तम प्रकारें बनविण्याकडे असतो. हल्लींचे शिक्षणानें मुलें मोडावत असतील तर तो दोष शिक्षकांचाच. आपल्या डोयीवरील ओझें कित्येक नावुंवत शिक्षकांनीं पालकांवर अगर आपल्या वरिष्ठांवर ढकललेलें नेहमीं आढळेल. वास्तविक “ ज्यांचीं पाउलें त्यांस ” समजत नसलेले लोक असा उद्गार काढतील. जे वरिष्ठ प्रकारचे शिक्षक असतात, ह्मणजे ज्यांना दुसऱ्या सात, आठ, किंबहुना दहा कारागिरांनीं निरनिराळे प्रसंगीं व भिन्न वेळीं आपल्या हातोटीनें बिघडवुन टाकलेलीं अगर सुबक बनविलेलीं साधनें मिळतील त्यांच्या कुरकुरी व तक्रारी कांहीं तरी मननीय होतील. परंतु प्राथमिक शिक्षकांची जबाबदारी ज्यांवर असेल त्यांस अशा उक्ति मुळींच शोभत नाहींत. मुखांत वाटतील ते पदार्थ टाकले असतां केशादि अपायमूलक पदार्थ फेकून देणें ज्या प्रमाणें जिव्हेचें काम आहे त्या प्रमाणें आपल्या ताब्यांत आणून दिलेल्या अर्भकांच्या मनांची अभ्यासाकडे प्रवृत्ति करणें, त्यांस सुमार्ग दाखविणें, कृषिकर्मपटु कारागिराप्रमाणें भूमींतील अपायकारक रोपें उपटून उत्तमफलदच रोपें उगवूं देणें इतकें नच होईल तर बीं टाकण्यास तरी तयार होई अशी मनोभू तयार करून देणें हें प्रत्येक प्राथमिक शिक्षणाध्यापकाचें कर्तव्यच आहे. पण हें समजणारा सर्व शाळाखात्यांत एक तरी प्राथमिक शिक्षक असेल किंवा नाहीं याबद्दल आह्मास सखेद संशय आहे. बरें अशा शिक्षकांच्या समुदायांत मुलांचें मन सुधारण्याची उमेद बाळगणें किती गैरवाजवी होईल याचें ठोकळ अनुमान पाहूं. कोठेंही ट्रेनिंग कालेजांच्या संस्था, निव्वळ शिक्षकांचें काम करितां यावें अशा करितां काढलेल्या असतात. त्यांमध्यें शिकण्यास आलेल्या विद्यार्थ्यांच्या योग्यतेनुरूप विषय असतात. मद्रास, पंजाब व अलिकडे नागपूर या प्रांतात शिक्षकांच्या करितां मुद्दाम वेगळे वर्ग काढलेले आहेत. सर्व शिक्षकांस खाजगी रीतीनें शिकून अगर त्या त्या वर्गांत राहून शिकून शिक्षकांच्या परीक्षेंत पास व्हावेंच लागतें. बि. ए. अगर एम. ए. परीक्षा झालेल्या शिक्षक वर्गाच्या परीक्षेचे विषय व निवळ म्याट्रिक्युलेशन झालेल्यांच्या परीक्षांचे विषय अर्थात वेगळे असतात व त्या प्रमाणावर निरनिराळ्या दर्जांचीं सरटीफिकेटें मिळतात. फिच्, लपान्डन, रोसो, स्पेन्सर, वगैरे ग्रंथकारांनीं श्रम करून शिक्षणमार्गोपदेश ज्या ग्रंथांच्या द्वारानें केला आहे ते ग्रंथ जाणणारे तर दूरच परंतु हे ग्रंथकार तरी शाळाखात्यांत असणाऱ्या ग्राजुएटांपैकींही कांहीं जणांस माहीत असतील याचा संशयच आहे! अर्थातच ज्या धंद्यांत आपण पडलों आहों तेथें जर आपल्या गुणाची, विद्वत्तेची, व श्रमाची योग्य मापानें नुसती परीक्षा ही होत नाहीं, तर परीक्षा होऊन त्या प्रमाणानें संभावना तर दूरच राहिली, तर विनाकारण श्रम करून आपणास शिणवून घेणारे स्वकार्यदक्ष थोडेच सांपडतील. येथील दोन्ही हायस्कुलांतील ग्रंथसंग्रहांत निदान १८९१ साल पर्यंत तरी शिक्षणविषयावर एकही पुस्तक नव्हतें.

अशा स्थितींत मुख्य मुख्य शिक्षक मंडळी मध्यें निवळ म्याट्रिक्युलेशन पास होऊन नट्टी पट्टी करणारे व दीड वीट स्वर्ग मानणारे शिक्षक आपल्या कर्तव्याची जबाबदारी न समजतां पगाराच्या व अधिकाराच्या आढ्यतेंत मोठ्या लोकांत मिसळून अडाणी लोकांत आपलें महत्त्व वाढविणारे आपणास आढळतात यांत चमत्कार तो कोणता! व अशानीं खाजगी वाचनास कांहीं पुस्तकें घेतलींही तरी तीं त्यांस समजावीं कशीं! सबब अशा शिक्षक वर्गास आह्मी नांवेंही ठेवूं इच्छीत नाहीं. शिक्षकांच्या बऱ्या वाईट गुणांवर विद्यार्थ्यांचें व विशेषें करून कोमल अर्भकांचें सर्व पुढील आयुष्य अवलंबून असतें. सर्व मोठमोठाल्या पुरुषांच्या चरित्रांत प्राथमिक शिक्षकांचे गुण व त्या गुणांचे चरित्रनायकाच्या वर्तनावर आणि मनावर घडलेले परिणाम स्पष्टपणें दिलेले असतात. लहानपणीं, प्लेटो वगैरे सर्व तत्वज्ञांचें ह्मणणें असें आहे कीं, मुलें माकडां प्रमाणें अनुकरण करीत असतात. अनुकरण क्रियांपासून मनुष्य पक्का होऊन ठाम बनतो. मग तो दुसऱ्यास अनुकरणीय होतो. आपला प्रत्याहिक अनुभव ही आपणास हेंच व्यक्त करून दाखवितो. अदांभिकपणा, जे गुण आपणांत नाहींत त्यांचा मिथ्या आविर्भाव न करणें, परोपकार करून त्यांत मुग्ध समाधान मानणें, आपल्या पेक्षां जो श्रेष्ट असेल त्याचें परीक्षण करून त्यास योग्य मान देणें, निवळ अधिकाऱ्यास मान न देतां त्यांच्या गादीची योग्यता मानणें, हेड मास्तरानें विनाकारण फेऱ्या मारून आपलें वैभव हताश मास्तरावर वारंवार दाखविल्यानें मास्तरांमध्यें जो हांजी हांजी करण्याचा दुर्गुण आलेला असतो तसा विद्यार्थ्यांत न येऊं देणें इ० व अशा प्रकारचे हजारों गुण ज्यांचें वर्णन कधींही करितां येणार नाहीं, अगर कितीही केलें तर थोडेंच होणार असे गुण शिक्षकांत जरूर असले पाहिजेत. खरें स्वावलंबन, परगुणादर, परगुणपरीक्षण, निरहंकार, सत्याभिमान इ० गुण आह्मी फारच श्रेष्ठ समजतो. मे० रा० बहादूर नुसत्या खरें बोलण्यावर फार जोर देतात. सत्यप्रीती नसणारे अलीकडे तरी फारच कमी लोक आढळून येतील. जाणून बुजून खोटें बोलणारा क्वचितच आढळेल परंतु सर्व संस्थानी व्यवस्था असल्यामुळें न जाणो आपली आगळीक वरिष्ठांच्या कानांवर जाऊन आपली कुजी होऊन आपणास जागच्या जागीं सडत बसावें लागेल या धाकामुळें आपले खरे विचार आपल्या परिचितांपासून देखील छपवणारे मात्र सांपडतील! हा दोष वास्तविक पाहू गेलें असतां वरिष्ठांचा नसून या लोकांच्याच कमी समजुतीचा आहे. हे आह्मी जितक्या खात्रीनें हा लेख लिहीत आहों असें ह्मणूं शकूं तितक्याच खात्रीनें सांगू शकतों. “ सर्वच वरिष्ठ अंमलदार अनुकरणीय नसतात. व कांहीं दीर्घद्वेषी, आपस्वार्थी, व फारच अल्पदोषयुक्त असतील तर मूर्ख व आत्मस्तुतिप्रिय असतात. या क्षुद्र पोटाकरितां अशाचे आर्जव करणें भाग आहे. व आर्जव करितांना सत्य पराङ्मुख व्हावें लागतें”—असें अनेक शिक्षक आमचे जवळ कित्येक प्रसंगीं बोलले आहेत. त्यावेळीं आह्मास निरुत्तरच व्हावें लागलेलें आहे. बरें खेड्यापाड्यानें गेलेल्या शिक्षकांस वर्षांतून एक वेळां काय ता सत्समागम घडणार. तो कोणाचा तर डेपुटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरचा अगर ज्या जिल्ह्यास सब डेप्युटी असतील त्या जिल्ह्यांत एका वर्षी आठ बडे साहेबांचा व छोटे साहेबांचा. हे तरी शिक्षकांस आपल्या जवळ कदाचित् ज्ञानभांडार असेल तर त्याचा अगर सुनीतीचा प्रत्यक्ष नसेल तर अप्रत्यक्ष गंध असेल तर तिचा तरी लाभ करून देतील किंवा उपयुक्त सुचना करून पुढील तपासणीच्या वेळीं त्या कितपत अंमलांत आल्या हें पहातील तर कित्येकांच्या ब्रीदास बट्टा लागेल. मुलांसमक्ष शिक्षकांचे बाप उद्धर, आईस शिव्या दे, अरे तुरे कर, अपमान कर, प्रसंग विशेषीं थापड्या मार, व सरबाई प्रतिषिद्ध असताही करून घे व आदळ आपट करीत शिकार करीत अगर मौजा मारीत जा दुसऱ्या ठिकाणीं, या प्रमाणें कृष्ण कायस्थ अंमलदाराची तपासणी झाली तर दरसाल शिक्षकास दुर्गुणांच्या पुटांचा सोनेरी चकचकीत मुलामा होईल यांत आश्चर्य तें कोणतें? अशा रितीनें वागविलें तर त्या शिक्षकांपासून कोमल बालकांच्या मनांवर ठसा कोणत्या भयंकर विकारांचा उमटेल बरें! प्रत्येक मूल पांच सहा वर्षांचें असतांना मनोराज्यांत शिक्षक होऊन खांबांस, झाडांस, अगर दुसऱ्या अचेतन वस्तूंस शिष्यवर्ग कल्पून एकसारखें ताडण करीत असतें! रात्रीं झोपेंत जागें केल्यास आपला धडा पाठ करूं लागतें! कित्येक वयातीत माणसांना आपल्या शिक्षकांच्या कोणत्या गुणावगुणांचे आपल्यावर कसकसे परिणाम घडले हें मोठ्या प्रेमानें व आस्थेनें सांगतांना आपण पहातों. या वरून शिक्षकांचा विद्यार्थ्यांच्या आचरणावर जबरदस्त परिणाम घडतो हें उघड झालें. त्याच प्रमाणें येथील शिक्षकवर्गास कधींकधीं तपासणी करणाऱ्या सांवत्सरीक यमस्वरूप अंमलदारां पासून किती शुष्कलाभ होईल हेंही कळविलें.

आतां त्यांच्या मुख्य ज्ञानखाजिन्याकडे म्हणजे ज्या विद्यालयांत हा शिक्षकसमूह तयार होतो त्यावर थोडें लक्ष पूर्णपणें देऊन हा लांबलचक लेख पुरा करूं. एकदां शिक्षण आटोपल्यावर शिक्षकाच्या आसपास सर्व अपायकारकच वायु असतात. यांचा नाश करण्या इतकें तरी शिक्षकाजवळ त्यास मिळालेल्या शिक्षणानें सामुग्री होते किंवा नाहीं हें पाहू.

येथील ट्रेनिंग कालेज इतर ठिकाणच्या संस्थांपेक्षां फार भिन्न आहे. इतर ठिकाणीं जितके हुषार व विद्वान आणि स्वकार्यदक्ष, स्वतंत्रविचाराचे व मार्मिक शिक्षक मिळतील तितके मिळवून मग त्यांच्या नौकरीच्या दिनाधिक्यावर नजर न देतां त्यांस नेमतात. नागपुरच्या नार्मल स्कूलावर पांचशे रुपये पगाराचा गैरकायस्थ एम्. ए. पद धारण करणारा कोरा बांड नेमण्यांत आला आहे. पंजाब व मद्रास येथें तर बरेच विद्वान लोक नेमलेले आहेत. कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या मागें मुंबई इलाख्यांतील ट्रेनिंग कालेज बरेंच खालवलें तरी रा. सा. पटवर्धन यांच्या वेळीं पुण्याच्या वक्तृत्वोत्तेजक सभेमध्यें मराठी भाषणें करून बक्षीस मिळवून नेणारे दरसाल एक दोन तरी उमेदवार आढळतच. पुढें १८८०।८१ साला पासून रा० सा० सोहोनी भूगोल शिक्षक हे कायम प्रिन्सिपाल झाले मात्र आणि ट्रेनिंग कालेज एक सारखें खालावतच चाललें. ट्रेनिंग कालेजचे बहुतेक प्रिन्सिपाल पुढें बढतीवर गेले. रा० सा० सोहोनी यांना त्याच अखेर मर्जी वरून पेन्शन मिळालें. पुण्याच्या ज्ञानचक्षूमध्यें · जीवन चरित्र · लेखमाला येते. व अशा चरित्रां बद्दल आमचें मत फार विरुद्ध आहे. सत्यापलाप व विवेकलोप हीं अशा चारित्रांचीं मुख्य न्यूनें आहेत! हीं नेहमीं स्तुतिप्रोत असतात; पण त्यांतही रावसाहेबांच्या मुळें ट्रेनिंग कालेज अधीक सुधारलें असें लिहिलें नाहीं हें वर्तमानपत्रकारांस भूषणावहच आहे. मराठी भाषेंत जे निबंध अगर छोटेखानीं ग्रंथ झाले आहेत त्यां मध्यें या बारा वर्षांत ट्रेनिंग कालेज मधून पार पडलेल्या विद्यार्थ्यां पैकीं एकाचाही नांव घेण्या सारखा नाहीं! मे० चाटफील्ड साहेब यांनीं कालेज खालावत चाललें आहे हें लक्षांत आणून सन्निपात झाला असतां ज्या प्रमाणें दंतमंजन देणें अयोग्य त्या प्रमाणें नवीन २००, १५० आणि १०० रुपये पगाराचे शिक्षक नेमले. ते बहुतेक ग्राज्वेटच आहेत. रा० सा० सोहोनींही अनायासें पेन्शनांत गेले व त्यांच्या रिकाम्या जागेवरही एका विद्वन संस्कृतज्ञ ग्राज्वेटाचीच नेमणूक झाली आहे. एकाद्या प्रियपात्रां पैकीं जुन्या खोडास नेमलें नाहीं. या उदार दूरदर्शित्वाचें फळही तसेंच मिळतें. कांहीं विविक्षित व्यक्तींचें बरें म्हणून घेण्या करितां अशा निवडुकींनीं किती नासाडी होते याचें उदाहरण फार दूर नाहीं. येथील ट्रेनिंग कालेजची स्थापना झाल्या पासून पण्यांत सुप्रसिद्ध ग्रंथकारांचे ग्रंथ प्रसिद्ध करून आपली विद्याभिरुची व्यक्त करणाऱ्या दाभोळकरां प्रमाणें, अगर सखाराम शेट दांडेकरां प्रमाणें शास्त्रीय ग्रंथ लिहिणाऱ्या प्रमाणें ग्रंथ लिहिणारा, अगर रानडे, पुरोहितां प्रमाणें मराठी वक्तृत्व करणारे, अगर लकीडवे, व कुळकर्णी आणि मंडळींतील बऱ्याच प्रमुख मंडळीं प्रमाणें धाडसानें स्वतंत्र धंदे करणारे, असे अगर अशा प्रकारचा एकही विद्यार्थी बाहेर पडला नाहीं. ही स्थिती किती शोचनीय आहे बरें! जर पुढें ह्मातारपणीं मातापित्रांस सर्व वार्धक्याधारस्तम्भ प्रिय पुत्रवर्ग अशा प्रकारच्या अशिक्षित शिक्षकांकडून तयार झालेला मिळणार तर त्यांची दशा काय व्हावी? त्यांस समाधान कसें मिळावें? या मुलांना तयार करणारे शिक्षकच जर अशिक्षित तर ज्या मुलांची मजल हायस्कुलांपर्यंत पोहोंचतच नाहीं त्यांच्यांत सुविचार येण्याचें साधन कोठून असणार? ट्रेनिंग कालेजांतील गुरुवर्य ह्मणजे भावी गुरूंचे गुरु कितपत योग्यतेचे आहेत अगर असतात हें पहाणें आमचें नाहीं. आह्मास इतकें समजतें खास कीं हल्लींच्या तेथील शिक्षकांपेक्षां आचरणानें, वर्तनानें, विद्येनें, अद्यापही चालू असलेल्या श्रमानें, आणि स्वभावानें निःसंशय

कडिवाळपणानें आमच्या बांधवास या पुढें मनसोक्त उच्छृंखलपणानें क्रीडा करून देणार आहो. तो पर्यंत यानें कसल्याही अपायकारक चेष्टा केल्यास आम्ही आजवर करीत आलों असेंच दुर्लक्ष करूं. कारण दुर्लक्ष असून जी अनियंत्रित व स्वैराचारी वृत्ति बनते ती कायमची व अनेक प्रसंगीं धीट असते.

शुद्धवऱ्हाडीचे ओळखीचे गृहस्थ शुद्धवऱ्हाडीकारां प्रमाणेंच तीव्र बुद्धिवान आहेत असें दिसतें. अशांस उत्तर आम्ही पुनः देत बसणार नाहीं व ते आमच्या कडून न मिळाल्यास त्यांनीं आमची चूक आमच्या पदरांत घातली म्हणून नव्हे तर त्यांचें लिहिणें उत्तराहि नसून त्यांच्या तोंडी लागण्याची आमची इच्छा नाहीं व त्यांच्या बरोबरीची आम्ही आपली योग्यता करून घेत नाहीं म्हणून. बाकी आमची चुकी त्यांनीं अगर त्यांच्या पेक्षांही फार कमी योग्यतेच्या मनुष्यानें आमच पदरांत घातल्यास आम्ही मोठ्या संतोषानें ती कबूल करू व ती पुनः होता होईल तो होऊं देणारही नाहीं.

मि० निळकंठरावभट हे ग्राज्युएट नसतां जर कालेज पुष्कळ सुधारलें, तर ग्राज्युएटा कडून तें वास्तव सुधारेल यांत संशय नाहीं. ट्रेनिंगकालेजमध्यें कनिष्ट प्रकारचे पाटलांच्या, कुणब्यांच्या, पोटार्थी भिक्षुकांच्या वगैरे मुलांचा भरणा फार असतो. अधिकाराचें वजन ज्यांच्यावर आपला अधिकार चालतो त्यांच्या मोठेपणावर अवलंबून असतें. धनगर मेंढरांचा अधिपति, शिपाई बंदिवानांचा अधिपति अगर कोतवाल कच्च्या कैदीचा अधिपति. ज्यांच्यावर अधिकार चालवावयाचा त्यांचे योग्यतेनें अधिकारी मानापमानास प्राप्त होतो. वर्डस्वर्थ, टेनिसन, मोरोपंत आदिकवीचें ते मृत झाले असतां ही आमच्यावर जें वजन आहे तें मानसिक आहे. तें सरकारनें निवडलेले अधिकारी म्हणून नव्हे. रावबहादूर जठार अगर रा. रा. आणासाहेब महाजनी व रा० सा० देवराव विनायक यांतील प्रत्येकाचे ठिकाणीं जी आमची निरनिराळी विशिष्ट पूज्य बुद्धि आहे ती तरी म्हणूनच. अर्थात ट्रेनिंग कालेजची असली योग्यता असल्या मुळें व तेथून डेप्युटी इन्स्पक्टरांच्या प्रतिष्ठित सरबराई मध्यें सांपडणारी मंडळी तयार होत असल्या मुळें व असणार या मुळें त्या जागेस ग्राज्युएट योग्य नाहीं हें आमचें व शुद्ध वऱ्हाडीचें आणि त्याच प्रमाणें शुद्धवऱ्हाडाच्या ओळखीच्याचें मत आहे. पुढील फरक परस्परांच्या ज्ञानस्थिती वरून व सामाजिक स्थितीवरून झालेला आहे. या बद्दल आम्हास वरील आश्रयाश्रितांची कींव येते. पण आमचा इलाज काय? म्याट्रिक्युलेशन परीक्षे पर्यंत सर्वांचें ज्ञान सारखेच, पुढें बि. ए. पर्यंत रोख रोख चार वर्षें व खालचा पाया चुकीचा व, कोता असल्यास————आणि व-ऱ्हाडांतील कांहीं अहंमन्य मास्तर व हल्लीं परोक्ष आणि अपरोक्ष रितीनें मि. वैद्य यांचीच नेमणूक योग्य असें म्हणणारे गजकर्णी शुद्धवऱ्हाडीच्या "ओळखीचे" व खुद्द महाराज अशांच्या शिक्षणाचा अगर सहवासाचा गंध इत्यादि कारणां मुळें——कधीं कधीं सहा सात वर्षें संस्कृतादि भाषाप्राप्तीच्या, इतिहास निबंधादि सुसाहितीच्या आणि विचार प्राप्तीच्या, काव्यादि मानवीस्वभावज्ञापकविषयांच्या, तर्कशास्त्रगणितशास्त्रादि सूक्ष्मविचारप्राप्तीच्या विषयांचा अभ्यास करणारे किती दुर्मिळ व पूज्य असतात हें शुद्धवऱ्हाडस्थास व अशा प्रिय थोरं समजूतदाराच्या ओळखीच्यास न समजणें वाजवीच आहे! त्यांत चमत्कार तो कोणता! बि. ए. नसणाऱ्या सर्वांस आपली व त्यांची योग्यता एकच वाटणें न्यायच आहे. म्हणूनच ओळखीचा प्रकापानें परोक्ष व अपरोक्ष रितीनें ती गोष्ट सिद्ध करू पहात आहे. जर न्याया पेक्षां भूतदया अधिक नसती तर सात; अगर आठ वर्षांपूर्वी योजलेल्या व्यवस्थेप्रमाणें जिकडे तिकडे ग्राज्युएटच झाले असते. मि. दाते यांस वकिलीचा मार्ग सुधारावा लागला नसता. मि. मुळे, मि. सावळे, मि. केळकर वगैरे तरुण बी. ए. मंडळीस खात्याशी फारकत करून घ्यावी लागली नसती. तसेंच सदाचरण म्हणजे आपल्या पेक्षां योग्यतेनें व विद्वत्तेनें अधीक अशांच्या कळपी लागणें, त्यांत मोठ्यानें खिदळणें, आपल्याच ताठ्यांत रहाणें, वृथाभिमान, वृथाढोंग इत्यादि गुणास शुद्धवऱ्हाडांत सदाचरण म्हणतात की काय हें शिकलेंच पाहिजे.

ट्रेनिंगांतील विद्यार्थी खेड्या पाड्यांचे मास्तर होतात. हायस्कुलांतील विद्यार्थी म्याट्रिक्युलेशन होऊन अगर न होऊन क्वचित्प्रसंगीं तहशिलदार, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर व नेहमी मोठ मोठाल्या कचेऱ्यांत कारकून वगैरे अंमलदार होतात. तेव्हां योग्यतेनें व वजनानें प्रिन्सिपाल अधीक कां हायस्कुलांतील शिक्षक अधीक हें शुद्धवऱ्हाडीस न समजणें यांत आश्चर्य तें कोणतें! दोन्ही ही हायस्कुलांचे हेडमास्तर, सरकारी अंमलदारच ते तेव्हां शहाणे असलेच पाहिजेत, ग्राज्युएट कां मागेत सुटतात कोण जाणे! सुनीती म्हणजे काय हें ज्यास कळत असेल तो सुनीतिमान आहे किंवा नाहीं हें पहावें लागतें.

आज उत्तरादाखल इतकें लिहिलें या बद्दल आम्ही आमच्या सुज्ञ वाचकांची व त्याच प्रमाणें अडाणी लोकामुळें रा. ब. जठार यांच्या कारकिर्दी बद्दल नाइलाज वास्तव कधीं कधीं लिहावें लागतें या बद्दल त्यांची मनःपूर्वक माफी मागून विनाधिक्य नौकरीतत्वानें लव्या गुणाची, योग्यतेची, विद्वत्तेची, व मेहेनत करणाऱ्या लोकांची नासाडी होऊन वेडगळ लोक कसे फुरफुरतात व आपले आपणास विसरतात हे दाखविणारा हा लेख कायमचा पुरा करितों.

———•◦•———

अखेर लार्ड एल्गिन या गृहस्थांस हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल नेमिलें. हे लाट साहेब ग्लाडस्टन साहेबांच्या प्रमाणें लिबरल विचाराचे आहेत आणि कांहीं आंग्लो-इंडियन पत्रकार या नेमणूका बद्दल नाखुष आहेत त्या अर्थी भावी गव्हरनर जनरलची कारकीर्द हिंदुस्थानास शुभदायक होईल असें चिन्ह दिसतें.

# The Berar Samachar

MONDAY OCTOBER, 16, 1893

## Mr. DADABHAI NAOROJI

Mr. Dadabhai Naoroji is achieving wonders in Parliament. After the date of the late lamented Hon. Justice Telang a Eupoean member of the Bombay bar had announced to the Bombay dailies that he was one of the warmest friends and admirers of the late judge. We have no reason to doubt the veracity of that gentleman. He further made bold to assure us that confidence of the people whom accident has placed to rule over us and their love would be secured not by a membership in the British House of representatives but by steady truthfulness. We simply laughed at the absurdity of the notion and we could do no further. Have all Hindus the same means to come into contact with the so—called refined ruling class as Justice Telang had? Does he mean that truthfulness was the only quality lurking in the bosom of our departed illustrious judge which required an English head to discover it? We simply treated the bragging comment with the contempt it deserved.

An Indian M. P. has not proclaimed himself only as a champion of the Hindus. He has given his mind and learning a practical Indian turn. He has accurately studied each Indian problem in finance, or the executive and judicial. He is opening the eyes of the English Parliament to what is being done here and how subjects are maltreated. The Bombay dailies are surprised to see him carrying division after division against the Conservatives. The Bombay dailies think it strange that all Liberals or the Gladstonians better and Irishmen as a rule should seem to like to vote with him! It is not strange. It is only strange that these men should not have yet banished from their minds a tendency to domineer over a ruled country. If the learned member of of the Bar passed such invidious criticisms upon an Indian Member of the Imperial Parliament he ought to have known that Mr. Dadabhai Naoroji is as well liked by far his betters as the Hon. Justice was by him. The occasion which called forth these remarks from us is the amendment moved by Mr. Dadabhoi Naoroji in connection with the Indian army Bill. The three armies of Bombay Madras, and Bengal are to be united under the control of one officer the Commender-in-Chief of the Indian forces. Mr. Dadabhai moved an amendment that the officer whether Commander-in-Chief or having sum such other desiguation should be excluded from sitting in the Council, in other words, from continuing to be an executive member of the Government. At first Mr. Russell who had charge of the measure resisted the proposal on the ground that it would necessitate the Bill being hung up for sometime, as the Lords have decided to do no more contentious work this session. Sir Richard Temple, as might be expected from him strongly backed the Under Secretary and finally moved that the progress be reported. This carried with the approval of Under

वेळीं मि. पिटके, व लवकरच मि. डांगे आणि मि. दाते असे तीन ग्राज्युएट आलेच. त्या वेळीं मि. वैद्य यांना पाउणशेही रुपये पगार नव्हता व पुढें १८९२ सालीं त्यांस पाउणशे रुपये झाले. मि. वैद्या संबंधानें आम्हास कांहीं लिहिणें नाहीं व नव्हतेंही. परंतु या प्रकरणांत ज्या प्रमाणें रावबहादूर विनाकारण ओढले जात आहेत त्याच प्रमाणें वैद्यही ओढले जात आहेत. जर ग्राज्युएटां करितां योजलेल्या सहा जागांवर ग्राज्युएट आले नाहींत व ते मिळेनात म्हणून त्या सहा जागा खात्यांतील खात्यांतच भरल्या तर ते वेळीं तरी मि. वैद्य यांस पाउणशे रुपये होणें जरूर होतें. तसेंच जर सर्व शाळा बिघडावेणें नाहीं तर थोडक्या काळाकरितां तेथल्या तेथेंच नेमणूक करून वेळ मारून नेणेंही रास्त आहे. परंतु या व्यवस्थेंत शेगांवच हेडमास्तर मि. वैद्य यांच्या इतक्याच परीक्षा पास झाले असतां व वैद्य यांचे अगोदर बरेच दिवस पाउणशे रुपये मिळवीत असतां शेगांवची शाळा बिघडवून आपल्या खालच्या दर्ज्याच्या नौकराच्या हाताखालीं त्यांस त्याच पगारावर आणिलें नाहीं काय? मि. नगरकर सहा महिन्या करितांच शेगांव येथें बदलले गेले नाहींत काय? दोन दोनच महिन्यां करितां आजपर्यंत मास्तर एक जागेहून दुसरे ठिकाणीं बदलले जात नाहीं आहेत काय?

हल्लीं शिक्षक चांगले चांगले उपलब्ध असून, अनायासें कोणाचें नुकसान न करितां जागा खालीं झाली असून व तीही बऱ्याच मोठ्या मुदती करितां खाली झाली असल्या मुळें, या वेळीं नेमणुकी संबंधानें गवगवा झाला व प्रत्येक मनुष्यास आश्चर्य वाटलें. सहा महिने पचवीस रुपये प्रमाणें बढती म्हणजे दिडशे रुपयांची प्राप्ती ज्यांना हजार हजार रुपये पगार मिळत असेल त्यांना फार न वाटली तरी आम्ही कथंचित द्रव्याचें महत्व जाणत असल्या मुळें आम्हांस ती फार वाटली. या बद्दल बऱ्याच मेहनती व योग्य लोकांच्या हक्कावर दुर्लक्ष झालें व तें होऊनही जो मोबदला मिळावा ो न मिळतां उलट असमाधानता झाली ं उघड करणें चुकीचें नसून रास्तच झालें शी आमची "शुद्ध" कल्पना आहे. बाकी ि. वैद्य यांचा हक्क नसतां त्यांस कायम ाऊणशे मिळाले व मध्यें मोठमोठाल्या ाग मिळाल्या यां बद्दल आमचे कडे ाच पत्रव्यवहार जमला होता त्यास ाम्ही स्थळ दिलें नाहीं इतकेंच नाहीं तर ा बद्दल अवाक्षरही काढलें नाहीं. एद्या लेखकगींचा शामकर्ण बनविण्याचा ाद्या पैसे खाऊ व लांचखाऊ नीतीचा ळ बाणा बाळगणाऱ्या प्रत्येक अधिप‍ ा अधिकार आहे हें आम्हास शुद्धडीनें शिकविण्यास नको होतें. आम्ही ाच आहो. वडील या नात्यानें अल्पजुतीनें आमची भलत्याच प्रसंगीं कानडणी हट्टानें केल्यास पूर्वीच्या काळ्यादोन मुखश्रींत देण्याचा आमचा अधिअमूनही इसाबनीतींतील गवानुकारी ा प्रमाणें मातृवात्सल्याच्या सन्निध ा फुटून आतां हा खास प्राणास मुकतो आम्हास धाक पडे पर्यंत आम्ही

☞ पुरवणी पहा

Secretary and against Mr. Dadabhai's friends by 57 to 37. In the interval between the Monday night and Tuesday those responsible for the Bill reconsidered the position, and to the astonishment of every one Mr. Russell got up to announce that Lord Kimberley accepted the amendment. Sir Richard was utterly bewildered. His tongue seemed to cleave to the roof. What more could he then do save pull himself together and implore the Government with all his earnestness to reconsider the position. Sir Richard was too late. He looked for support. The Conservative Benches were empty. Yet Mr. Tomlinson the member for Preston came to his rescue, gave him a helping hand though he obviously did not know much of the matter. The amendment was put from the chair. Sir Richard vigorously claimed for a division, but at the second time of asking he kept silent choked with baffled rage. Thus Mr. Dadabhai Naoroji carried his measure. His influenee has been established. He is looked upon as an able Parliamentarian skilful and wel-versed in dealing with all Indian abstruse problems.

Some papers are disposed to consider this exclusion of the military from the executive power a tremendous blunder. But it can not be looked upon as an error in the present constitution of the Indian Councils- The Budgets are now to be openly discussed and the Government exercises a right to select additional members. If this measure of exclusion were deemed inconvenient it can be easily obviated. Be it what—ever it may an Indian member has become the harbinger of an age of more independence and Liberty. By establisshing a fair understanding between the rulers and the ruled privileges which ought to have been long granted to us and which were so long denied only out of suspicious jealousies would be soon within our reach. One Indian M. P. therefore has achieved much among his countrymen and ruling people though he may have not gained any thing from English—men in India.

A correspondent writes to us from Amraoti the following:—

"Mr. Hashmatali Attachi to the Resident has been doing some excellent work for the Town Municipality of Amraoti. There were arrears to the extent of about Rs.22000 to be collected. Mr. Hashmatalli has been able to realize arrears to the extent of Rs.14000. He is a very hardworking officer. I have no doubt that he will be soon promoted to the grade of an Assistant Commissioner."

## वऱ्हाड.

हवामान — उष्मा फार होत होता, पण गेल्या शनिवारीं व रविवारीं पाऊस बराच पडल्यापासून हवा थंड झाली आहे. गांवांत मुदतीचे ज्वराची सांथ सुरू आहे आणि किरकोळ दुखणींही अधिक आहेत.

कमिशनर आफिसांतील १५० रुपयांचे क्लार्क मि. व्हान्डीपट यांची नेमणूक येथील इप्रांड रिकार्डचे आफिसचे हेड क्लार्कचे जाग्यावर झाली. याच जागीं आह्मीं पूर्वीं रा.रा. चिंतामण मोरेश्वर आपटे यांची नेमणूक होत असल्याचें लिहिलें होतें पण कोणत्या कारस्थाना मुळें त्यांची योजना रद्द झाली हें कळत नाहीं. राजश्री चिंतामणरावा सारखे हुशार अनुभवी व कार्यदक्ष गृहस्थ योग्य स्थळीं निवडले जात नाहींत या गोष्टी वरून कोठें तरी जाणून बुजून चूक करण्याची खटपट होत असावी असें दिसतें.

मे. कमिशनर साहेबांचे क्लार्क आफ कोर्टचे जागीं काम करीत असलेले गृहस्थ रा. रा. रघुपत मोहनराव यांची तेथील नेमणूक रद्द झाली पण त्यांस पूर्वींच्या चीफ कान्स्टेबलच्या जागीं परत न करितां कमिशनरच्या आफिसांतील मि. व्हान्डीपट यांच्या रिकाम्या झालेल्या जागीं १५० रुपये पगारावर नेमल्याचें कळतें.

कमिशनरचे क्लार्क आफ कोर्टचे जागीं रा.रा. विष्णु रंगनाथ शेंबेकर क्लार्क आफ दी कोर्ट- निसबत डेपुटी कमिशनर बुलढाणा यांस नेमल्या अन्वयें ते आपल्या जागीं रुजूं झाले.

आज तारखे पासून येथें सेशन मुकदम्यास सुरुवात होईल. या सेशनांत बरेच मुकदमे आहेत त्यामुळें मे. आबर्ड साहेबांचा मुक्काम येथेंच तारीख ९ नोवेंबर पर्यंत होईल

येत्या बुधवारी व शुक्रवारीं घोड्याच्या शर्यती येथें होणार आहेत आणि त्या निमित्त बऱ्याच गोऱ्या आफिसरांचा येथें मेळा जमणार आहे.

आह्मांस लिहिण्यास अतिशय दुःख वाटतें कीं रा. रा. तात्या बाळाजी कुंटे डायरेक्टर साहेबांचे कचेरीतील क्लार्क यांस गेल्या मंगळवारीं संध्याकाळीं विषमज्वराचे आजारानें देवाज्ञा झाली. रा. रा. कुंटे हे स्वभावानें फार सरळ, शांत व मनमिळाऊ असत. हे बुद्धिबळाचे खेळांत फार प्रवीण असत व अक्षरा बद्दल त्यांची बरीच ख्याती होती. त्याच्या अकालिक मृत्यूमुळें त्यांच्या वृद्ध मातापितरावर दुखाचा मोठा घालाच पडला! मि. कुंटे हे त्यांच्या कुटुंबांतील काय ते मोठें खांब होते तेव्हां त्यांच्या दुःखकारक मृत्यूमुळें एकंदर कुटुंबाची काय हानी झाली आहे हें सांगणें नलगे.

त्याच प्रमाणें दुसरा दुःखकारक मृत्यु रा. रा. बळवंत श्रीपत ढोके असि. मास्तर मलकापूर यांचा गेल्या ८ वे तारखेस झाला. हे गृहस्थ क्षयानें बरेच महिने आजारी होते. आणि त्यांच्या मरणामुळें त्यांच्या तरुण पत्नीवर व लहान चिल्यापिल्या वर मोठाच प्रसंग गुदरला! ईश्वरी नेमानेमच असा.

येथील हायस्कुलांत नवीन असिस्टंट मि. आठवले या नांवाचे ग्राज्युएट येणार असल्याचें लिहिलें होतें परंतु ती जागा त्यांनीं न स्वीकारल्यामुळें रा. रा. कृष्णराव रामचंद्र काळे असिस्टंट मास्तर मलकापूर यांस दिली. आणि ते त्या प्रमाणें आपल्या कामावर रुजू झाले.

रा. रा. गणेश बाबाजी एकबोटे बी. ए. यांस मलकापूर येथें ५० रुपयावर कायमचे फर्स्ट असिस्टंट नेमून त्यांच्या आकोटच्या ४० रु. च्या जागीं रा. रा. छण्णाजी रामचंद्र यांस कायम केलें आणि ५० रु. वर येथील हायस्कूलांत आक्टींग काम करण्यास नेमिलें आहे.

डायरेक्टरचे आफिसांतील सेकंड क्लार्कच्या जाग्यावर रा. रा. शिवराम रघुनाथ कुळकर्णी यांस नेमिलें आणि त्यांच्या ७६ रुपयावर रा० रा० विश्वनाथ मोहनीराज यांस कायम करून त्यांच्या ६० रुपयावर दर्यापूरचे हेडमास्तर रा० रा० गोविंदराव वुद्रूक यांस शेगांवास कायम केलें. आणि त्यांचे ५० चे जागीं रा० रा० बाळकृष्ण शिताराम जोशी यांस दर्यापूरास कायमचे हेडमास्तर नेमून आणि आकोला इंग्लिश- मराठी शाळेंत रा० रा० मनोहर नारायण मोहळकर यांस नेमिलें.

### नोटीस.

नोटीस वे० बाळंभट बिन विष्णुभट टेकाळे मुकाम उमरखेड यांस.

खाली सही करणार यांज कडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्हास आम्ही आमचे संस्थानांत देवाचे पुजे करितां नौकर ठेविले होते. परंतु हल्ली तुम्ही आमच्याशी सेव्यसेवकभाव ठेवित नसून बिनाकारण क्षुल्लक कामांत कलह करिता तसेंच आमचे संमती शिवाय तुम्हीं आमचे संस्थानची नौकरीण ( मयत पार्वती ) हीचे पासून तिचे ह्यातींत आम्हीं तिला नोकर या नात्यानें दिलेले हक्क वेतन ती वारल्या नंतर आपणास मिळावे म्हणून लेख करून घेतला व ते मिळण्या करितां आमच्याशी आपण तंटा करितां परंतु सदरहू दस्तऐवज आम्हास मंजूर नाहीं तर या नोटिशीनें आपणास कळविण्यात येतें कीं ता० १८।१०।९३ इसवी पासून आम्ही तुम्हास नौकरी वरून दूर केलें आहे. पुजेची उपकर्णी देवाचीं वस्त्रें डागिने वगैरे जें सामान तुमचे ताब्यांत आहे तें सर्व आमचे अगर आम्ही सांगू त्यांचे ताब्यांत द्यावें. आम्ही तुम्हांस व मयत पार्वतीस देवस्थानचें नोकर या नात्यानें जे जे हक्क दिले असतील ते सर्व या नोटीशीनें आम्ही काढून घेतले आहेत. या पुढें तुम्ही हक्का संबंधानें तंटा वगैरे केल्यास योग्य रितीनें तजवीज केली जाईल व त्याचा निकाल होई तो पर्यंत जें नुकसान होईल तें व या नोटिशीचा खर्च असें सर्व तुम्हा पासून भरून घेतलें जाईल कळावें ता० १९ माहे अक्टोबर सन १८९३ इ०

( सही. )

शिवराम अमृत व गणेश रंगराव म्यानेजरर्स श्री आईनाथ संस्थान उमरखेड जिल्हा बाशीम

## वर्तमानसार

श्रेष्ठ असे अनेक शिक्षक कमी पगारांवर असल्यामुळें या जागांस उपलब्ध असून त्यांच्या नेमणुका या जागेवर होत नाहींत. हें शिक्षकांच्या योग्यते संबंधानें झालें. आतां या संस्थेंत जे विषय शिकविले जातात ते मराठी सहावे इयत्तेचे पुढें नसतात. ट्रेनिंग कालेजांतून पगारी विद्यार्थी असतात. यामुळें जरी जरा जास्त अभ्यास वाढविले तरी विद्यार्थ्यांचें फारसें नुकसान होऊं शकत नाहीं. सेंट झेविअर कालेज मध्यें शेवटच्या वर्गापासून तों एम्. ए. च्या वर्गापर्यंत आठवड्यांतून दोनदां फिलासफी या विषयावर एक प्रोफेसर व्याख्यान देतात. या विषयास सर्व कालेज मधील विद्यार्थ्यांनीं अवश्य बसलेंच पाहिजे. हा विषय जरी कोणत्याही परीक्षेस उपयोगीं पडत नाहीं तरीं सर्व विद्यार्थ्यांवर या विषयाचा बोजाच असतो. व यांत दर महिन्यास परीक्षा खासगी द्यावी लागते. शिवाय दर आठवड्यांतून एकदां मनुष्यस्वभाव व मनुष्यवर्तन या विषयांवर निराळ्या प्रोफेसरांचें अजेंब जुलमाचें खासगी व्याख्यान मुंबई युनिवर्सिटीच्या परीक्षांस उपयोगी न पडणारें पण सर्वांवर सारख्या सक्तीचें व्याख्यान असतें. अशा प्रकारचें येथील ट्रेनिंग कालेजामध्यें Fowler's method च्या जुन्या मि. भटांनीं केलेल्या वही शिवाय शिक्षक वर्गास उपयोगी पडणारेंही शिकविलें जात नाहीं. मग आचरण, मनुष्यस्वभाव इत्यादि विषय तर दूरच राहिले. पण यांत शिक्षकवर्गाची योग्यता पाहू गेलें असतां आश्चर्य तें कोणतें? अभ्यास कमी, शिक्षक वर्ग निरुपयोगी, शिक्षणक्रमही दोन वर्षांचा: अशा वस्तु स्थिती मध्यें येथें कालेजचा झसोबा कशाकरितां स्थापिला आहे हेंही समजत नाहीं. शेंदूर लाऊन स्थापलेल्या मारुती पेक्षा स्वयंभू मारुतींची योग्यता फार मानली आहे. तद्वतच येथील नामधारी ट्रेनिंगांतून लोकांच्या मुलांवर वाईट परिणाम घडविणारे शिक्षक नेमण्या पेक्षां ट्रेनिंग कालेजच अजी बंद करून काटकसरीचें भूषण मिळवूनच्या मिळवून मुंबई इलाख्यांतील ट्रेनिंग कालेज मधून अगर नागपूरहून तयार झालेले तरी शिक्षक आणल्यास होत असणारी हानी तरी कमी होऊन यापुढें तरी लोकांचें नुकसान होणार नाहीं. ट्रेनिंग कालेज मध्यें दोन वर्षांचे अभ्यास ह्मणजे दोन वर्ग तर त्या दोन वर्गांकरितां बरोबर सगळे दोन शिक्षक. या पेक्षां थोड्या काटकसरीनें जेवढा सर्व एस्टाब्लिशमेंट खर्च आहे त्यांत दुसरी कडल्या काटकसरींतून थोडी शिल्लक घालून तीन शिक्षक नेमून एकेकावर नियमित विषय सोंपविल्यास किती फलप्रद होऊन सर्व वऱ्हाडकरांचा अतोनात फायदा होईल.

अभ्यास वाढविणें, शालोपयोगी आणि नीति व सदाचरण आणि मानवस्वभाव दर्शक पुस्तक सक्तीनें सुरु करणें कालेजामधून ज्याप्रमाणें इंग्रजी पुस्तकें सूक्ष्म रितीनें शिकवितात व कसून परीक्षा घेतात त्या प्रमाणें अभ्यास क्रमांत बदल करणें व परीक्षा नेमणें व अशा परिक्षा नेमल्यावर कार्यदक्ष योग्य शिक्षक नेमणें या सर्व गोष्टी मे० रा. ब. श्रीराम भिकाजी जठार बि. ए. यांणीं केल्यास सहज होण्या सारख्या असून असें केल्यास त्यांच्या कारकीर्दीचें अजरामर स्मारक येथें राहून सुमारें पन्नास वर्षांपुढें सर्व ज्ञातोरे कोनोरे त्यांस दुवाच देत रहातील.

हा लेख कदाचित मूर्ख लोकांस कंटाळवाणा वाटेल परंतु याच्या महत्वाच्या मानानें हा इतका थोडका झाला या बद्दल आह्मास फार आश्चर्य वाटतें. शिवाय ज्यांस उद्देशून हा लिहिला आहे त्यांस ईश्वर नेहमी सुखी ठेवो अशी प्रार्थना करून

## पुनः पण तेंच

लिहिण्याचा प्रसंग न येवो अशी आशा करितों.

---

## थोडक्यांत चुकलें

( शुद्धवऱ्हाडीस उत्तर )

थोडक्यांत चुकलें— मेहरबान लार्ड मेकाले यांनीं एज्युकेशनच्या कायद्याचा प्रसार करिते वेळीं जी आशा प्रदर्शित केली कीं मराठी भाषेचें अगर देशी भाषांचें ज्ञान इंग्रजींत निष्णात झालेल्या लोकांकडूनच देशांत वृद्धिगत पावेल ती आशा त्यांनीं कदापि प्रसिद्ध केली नसती मात्र त्यावेळीं "शुद्धवऱ्हाडीकार" अस्तित्वांत असावयास पाहिजे होते. खऱ्या मराठीचें ज्ञान अगर देशी भाषांचें ज्ञान हल्लींच्या अगर पूर्वीच्या विकास पावलेल्या भाषांशिवाय होत नाहीं. जेवढे ह्मणून मराठी अगर देशी भाषांत नांवाजलेले सर्वमान्य व लोकप्रिय ग्रंथकार होऊन गेले तेवढे सर्व इतर एखादे भाषेंत उत्तम प्रवीण असल्यामुळेंच झाले. मराठी भाषा तर फारच मागसलेली आहे. परंतु या गोष्टी शुद्धवऱ्हाडीकारांस कळल्या नाहींत अगर कळत नाहींत या बद्दल आह्मास चमत्कार वाटत नाहीं. हल्लीं ज्या प्रमाणें कम्पाउन्डरांचे डाक्टर येथें झाले आहेत व बहात्तर रोगांवर एक मात्रा काढण्या पर्यंत त्यांचें ज्ञान ही आलें आहे त्याच प्रमाणें वर्तमानपत्रकार ही सवंग होऊं लागले आहेत! पुण्याचीं प्रसिद्ध पत्रें, मुम्बईची प्रसिद्ध पत्रें व अन्य ठिकाणचीं व अन्य भाषेंत चालणारीं प्रसिद्ध पत्रें व प्रसिद्ध पुस्तकें वगैरे सर्व भाषांतरें उद्योग इंग्रजींत अगर संस्कृतात प्रवीण विद्वानांकडूनच होत आहेत. ग्राज्युएटांस नांवें ठेवणारास मराठी भाषेवर मुसलमानी व इंग्रजी भाषांचे कोणते सुपरिणाम व कुपरिणाम घडले आहेत हें तरी सांगतां येईल काय? म्याट्रीक्युलेशन परिक्षेस मराठी भाषा विद्यार्थ्यांच्या आवडीवर ठेविली आहे त्या भाषाविषयांत व येथील व्हर्न्याक्युलर स्कालरशिपचे वेळीं मराठींत विद्यार्थी तयार करण्यास हेडमास्तर साधारण शिक्षक नेमून संस्कृता करितां होता होईल तो ग्राज्युएटच कां नेमतात? याचें तरी कारण शुद्धवऱ्हाडीकारास सांगता येईल काय? मुंबई युनिव्हरसिटीच्या मुशींतून दरसाल पार होणाऱ्या वरिष्ठ प्रतीच्या विद्यार्थ्यांसाठीं देशीभाषा क्लासिकल भाषांच्या यादीच्या बाहेर कां ठेविल्या आहेत? व देशी भाषांना अजीबात टाळा कां मिळाला आहे हें तरी शुद्धवऱ्हाडीकारास अगर त्याचा 'ओळखीचपास' माहीत आहे काय? शेवटीं, या बाबतींत आपणास समजत नाहीं तर अव्यापारेषु व्यापार करण्याची आपल्या बंधूस जरूर नव्हती.

मुम्बई युनिव्हरसिटींतून सुशिक्षण घेऊन पार पडलो किंवा नाहीं हें आम्ही सांगावयास नकोच आहे. हें शुद्धवऱ्हाडीकारांपेक्षां फारच शहाण्या व विद्वान मंडळीनें १८९१ सालच्या सांवत्सरीक पदवी दानाच्या वेळीं मुम्बईच्या गव्हनर इन कौंउन्सिलनें सांगितलें आहे. हें विधान आमचें नसून त्या मूर्ख व अक्कलशून्य अधिकाऱ्याचें आहे! अर्थात त्यांतील एकानेंही कम्पाझिटरचें काम करून ज्ञानसंपादन केलें नाहीं. शुद्धवऱ्हाडीच्या "ओळखीच्यानें" वैदर्भ पत्राकडे धांव घेतली असती व तेथें "कवळिती निजबंधु बाष्पबिंदु गळाले" या न्यायानें त्यास स्वागत मिळालें असतें तर या पेक्षां उत्तरही निराळें देतां आलें असतें व तेथें त्याचा मानही योग्य राहिला असता. शुद्धवऱ्हाडींत ओळखीचा पडला शुद्धवऱ्हाडीपेक्षां कमी शहाणा, ह्मणून त्यास मिळाला अर्धचंद्र व फेर पांडित्य केलें शुद्धवऱ्हाडीनेंच! असो या प्रमाणें वाद वाढवीत बसण्याची आह्मास जरूर नाहीं. ग्राज्युएटांची योग्यता अधीक नसून ते आमच्या इतकेच किंवा आमच्याहूनही अप्रबुद्ध असतात असें ह्मणणारे शुद्धवऱ्हाडी व त्याच्यात्र "ओळखीचे" आहेत असें नाहीं दुसरे शेकडो आहेत. कालेजांत बरींच वर्षें राहून तेथील प्रथम परीक्षाही न झालेले परंतु सुवाचनानें अनेक बाबतींत पुढें गेलेले असे 'आज कालच्या गोष्टींच्या' कर्त्यां प्रमाणें ह्मणजे मि. हरी नारायण आपट्या प्रमाणें मि. सिताराम हरी चिपळूणकरादि अनेक विद्वत्पारिषद्रत्नें झालीं आहेत व होतील हेंही आह्मास कबूल आहे. रा. रा. निळकंठराव भट यांस निवळ म्याट्रिक्युलेशन पेक्षां ज्ञानगंध पुष्कळ अधिक आहे. मि. शेवडे वगैरेसही त्याच प्रमाणें आहे. मि. भट हे एफ्. इ. ए. पास झाल्यावरही कांहीं वर्षें शिकत होते. त्याच प्रमाणें कै. बाबा गोखले, कै. बजाबा प्रधान वगैरे मंडळी ग्राज्युएट नव्हती तरी त्यांच्या वेळचे पूना कालेज मध्यें जितकें उपलब्ध शिक्षण असे तें सर्व या व अशा लोकांस मिळालेलें होतें. याच कारणामूळें मि. विनायकराव गोरे प्रभृति पूना कालेज मधील निवळ म्याट्रिक्युलेट व इतर हायस्कुलांतील तत्कालीय म्याट्रिक्युलेट यां मध्यें सरकारनें एवढा जबर फरक केला आहे. मुंबईच्या शाळाखात्याचे डायरेक्टर मे. चाटफिल्ड साहेब यांस विद्येची खरी योग्यता शुद्धवऱ्हाडीकारांपेक्षा, ज्या अर्थीं शुद्धवऱ्हाडीकार राज्यभक्त आहेत व सरकारनें नेमलेले सर्व चतुष्पाद प्राणीही त्या त्या अधिकारास योग्य आहेत असें आपल्या मेंदूंतून विधान काढतात त्या अर्थीं, अधिक जाणणारे आहेत हें उघड आहे. तेथील शाळाखात्यांत बि. ए. शिवाय बढतीच होत नाहीं. हीच गोष्ट मद्रास, नागपूर, वगैरे ठिकाणच्या खात्यांसही लागू आहे. येथेंही रा.ब. दांडेकर यांच्या कारकीर्दींत तीच व्यवस्था होऊं पहात होती. पुनः अठराशे चवऱ्यांयशीं सालच्या मध्याच्या सुमारास हल्लींच्या रा.ब. जठारांनीं पाउणशे रुपये पगारावर सहा ग्राज्युएट डा. भांडाकर यांस मिळविण्याविषयीं लिहिलें होतें परतु तितके मिळेनात सबब त्यांच्या नेमणुका तशाच राहिल्या. तरी त्या वेळीं मि. पिटके, व लवकरच मि. डांगे आणि मि. दाते असे तीन ग्राज्युएट आलेच. त्या वेळीं मि. वैद्य यांना पाउणशेंही रुपये पगार नव्हता व पुढें १८९२ सालीं त्यांस पाउणशे रुपये झाले. मि. वैद्या संबंधानें आह्मास कांहीं लिहिणें नाहीं व नव्हतेंही. परंतु या प्रकरणांत ज्या प्रमाणें रावबहादूर विनाकारण ओढले जात आहेत त्याच प्रमाणें वैद्यही ओढले जात आहेत. जर ग्राज्युएटांकरितां योजलेल्या सहा जागांवर ग्राज्युएट आले नाहींत व ते मिळेनात ह्मणून त्या सहा जागा खात्यांतील खात्यांतच भरल्या तर ते वेळीं तरी मि. वैद्य यांस पाउणशे रुपये होणें जरूर होतें. तसेंच जर सर्व शाळा बिघडावेणें नाहीं तर थोडक्या काळाकरितां तेथल्या तेथेंच नेमणूक करून वेळ मारून नेणेंही रास्त आहे. परंतु या व्यवस्थेंत शेगांवच हेडमास्तर मि. वैद्य यांच्या इतक्याच परीक्षा पास झाले असतां व वैद्य यांचे अगोदर बरेच दिवस पाउणशे रुपये मिळवीत असतां शेगांवची शाळा बिघडवून आपल्या खालच्या दर्ज्याच्या नोकराच्या हाताखालीं त्यांस त्याच पगारावर आणिलें नाहीं काय? मि. नगरकर सहा महिन्यां करितांच शेगांव येथें बदलले गेले नाहींत काय? दोन दोनच महिन्यां करितां आजपर्यंत मास्तर एक जागेहून दुसरे ठिकाणीं बदलले जात नाहीं आहेत काय?

हल्लीं शिक्षक चांगले चांगले उपलब्ध असून, अनायासें कोणाचें नुकसान न करितां जागा खालीं झाली असून व तीही बऱ्याच मोठ्या मुदती करितां खाली झाली असल्या मुळें, या वेळीं नेमणुकी संबंधानें गवगवा झाला व प्रत्येक मनुष्यास आश्चर्य वाटलें. सहा महिने पचवीस रुपये प्रमाणें बढती म्हणजे दिडशे रुपयांची प्राप्ती ज्यांना हजार हजार रुपये पगार मिळत असेल त्यांना फार न वाटली तरी आम्ही कष्टार्जित द्रव्याचें महत्व जाणत असल्या मुळें आम्हांस ती फार वाटली. या बद्दल बऱ्याच मेहनती व योग्य लोकांच्या हक्कावर दुर्लक्ष झालें व तें होऊनही जो मोबदला मिळावा तो न मिळतां उलट असमाधानता झाली हें उघड करणें चुकीचें नसून रास्तच झालें अशी आमची "शुद्ध" कल्पना आहे. बाकी मि. वैद्य यांचा हक्क नसतां त्यांस कायम पाऊणशे मिळाले व मध्यें मोठमोठाल्या जागा मिळाल्या यां बद्दल आमचे कडे बराच पत्रव्यवहार जमला होता त्यास आम्ही स्थळ दिलें नाहीं इतकेंच नाहीं तर त्या बद्दल अवाक्षरही काढलें नाहीं. एखाद्या लेखकर्गाचा शामकर्ण बनविण्याचा एखाद्या पैसे खाऊ व लांचखाऊ नीतीचा पोकळ बाणा बाळगणाऱ्या प्रत्येक अधिपतीस अधिकार आहे हें आम्हास शुद्धवऱ्हाडीनें शिकविण्यास नको होतें. आम्ही दादाच आहो. वडील या नात्यानें अल्पसमजुतीनें आमची भलत्याच प्रसंगीं कानउघाडणी हट्टानें केल्यास पूर्वीच्या काव्यानें दोन मुखश्रींत देण्याचा आमचा अधिकार असूनही इसापनीतींतील गवानुकारी बेडका प्रमाणें मातृवात्सल्याच्या सन्निध फुगून फुटून आतां हा खास प्राणास मुकतो असा आम्हास धाक पडे पर्यंत आम्ही

☞ पुरवणी पहा

पार्थिया नांवाचें दोन हजार वर्षं पूर्वी एक मोठें राष्ट्र या पृथ्वीवर होऊन गेलें. या राष्ट्राचा इतिहास अलीकडे प्रोफेसर रालिन्सन साहेब यांनीं लिहून प्रसिद्ध केला आहे. ते ह्मणतात हें राष्ट्र आठ लक्ष चौरस मैल पसरलें होतें. फ्रान्स, जर्मनी, आस्ट्रिया आणि टर्की हें चारही देश एकत्र केल्यास प्राचीन राज्याबरोबर होईल. पार्थियन राज्याचा विस्तार पामर प्रदेशापासून युफ्राटिस पावेतों होता. इराण, अफगाणिस्थान व तुर्कस्थान आणि रशिया यांचा बराच भाग यांवर पार्थियन लोक राज्य करीत होते. येशू ख्रिस्ताच्या पूर्वी १५० वर्षांपासून तों येशूनंतर २२० वर्षे पावेतों हें राष्ट्र भरभराटीत होतें. रोमच्या खालोखाल याची गणणा होत असे. परंतु एवढें मोठें राष्ट्र केवळ तरवारीच्या जोरावर कमावलेलें असून तरवारीच्या जोरावर संभाळलें गेलें होतें यामुळें याचा अंतही लौकरच झाला हें प्रत्येक राज्यकर्त्यांनीं विशेष लक्षांत बाळगण्यासारखें आहे. राज्यांत असंतुष्टता उत्पन्न झाली, वरांतच कलह मातले मग राष्ट्र लयास लौकरच गेलें तर त्यांत विशेष नवल करण्यासारखें कांहीं नाहीं. पार्थियन लोकांपासून आमच्या राज्यकर्त्यांनीं शिकण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. ते लोक आपल्या दरबारांत परकीयास मोठमोठ्या जागा देत असत. आश्रय मागणाऱ्यास आश्रय देत, कैद्यास दयेनें वागवीत, वचनभंग कधीं करीत नसत, तहनामें प्रामाणिकपणानें पाळित वगैरे अनेक गुण त्यांच्या इतिहासावरून आपणास दिसतात. हे घेण्यासारखे आहेत.

जर्मनीच्या हल्लींच्या युवराजाच्या शिक्षणाकरितां एक किल्ला मि. क्रप यांनीं बांधून तो बादशाहास नजर केला आहे याला खर्च सुमारें ४ लक्ष रुपये लागला यांत कांहीं कांहीं गोष्टी मोठ्या गुप्त ठेवण्यांत आल्या आहेत. या किल्यांत हल्लींच्या युवराजाचें लष्करी शिक्षण व्हावयाचें आहे.

कांग्रेसच्या सुमारास, लाहोरमध्यें मुसलमानलोकांचा शिक्षणसंबंधीं एक मोठा कानफरन्स भरावयाचा आहे.

आगगाडींतून आजारी माणसाना विशेष सुखकर व सोयकर रीतीनें नेता येण्या करितां एक कल्पना काढली आहे व इच्या बद्दल सिमल्यास वाटाघाट होऊन ती सभेला पसंत पडली. सु. प.

खानदेशचे पोलिस इन्स्पेक्टर बापुराव व फौजदार यादवराव आणि तीन शिपायी यांणीं एका खुनाच्या कामांत एका पाटलास मारहाण केली व त्यामुळें पाटील मेला ह्मणून इन्स्पेक्टर व फौजदार यांस प्रत्येकीं २ वर्षे कैद व २०० रुपये दंड आणि तीन शिपायांस प्रत्येकीं ६ महिने अशा शिक्षा झाल्या. इतर पोलिसांनीं सावध राहावें.

गेल्याच्या मागच्या शुक्रवारीं भुसावळ येथें एका वृद्ध मारवाड्याचा भयंकर रीतीनें खून झाला. जमिनीचे तीन तुकडे मारवाड्यास कबज्यांत घ्यावयाचे होते व असे. कळे. कडे तें प्रकरण चालू होतें. तिन्ही तुकड्यांचा आपल्या नर्फे निकाल झाल्यास आफिसांतल्या एका शिपायास प्रत्येकीं वीस प्रमाणें साठ रुपये देण्याचें मारवाड्यानें कबूल केलें होतें. तिन्ही तुकड्यांचा निकाल झाला असें सांगून शिपायानें कागद मारवाड्यास दिला व साठ रुपये करारप्रमाणें घेतले तपासाअंतीं एका तुकड्याचाच निकाल झाला असें मारवाड्यास कळल्यावरून तो शिपायाजवळ ४० रुपये परत मागूं लागला. चल देतों असें ह्मणून शिपायानें मारवाड्यास शेतांत नेलें व तेथें त्याचा खून करून पुरून टाकला. लांबून एका बाईनें पाहिल्यावरून सर्व बाहेर आलें.

मुंबईची सालिसिटरची परिक्षा ता. ४ रोजीं सुरू झाली. उमेदवार ४ पार्शी व २ हिंदु आहेत.

चीनदेशांत एक कालवा आहे तो सगळ्या जगांत मोठा आहे. तो २१०० मैल लांब असून त्याच्या कांठीं ४१ शहरें आहेत. तो बांधण्याचें काम ६०० वर्षे चाललें होतें. तो इ० स० १३५० साली पुरा झाला.

सायाम समुद्रांतील खासमीट हें ठिकाण कोळशाचें ठिकाण करण्यास फ्रान्सानें रशियास देऊं केलें अशी बांकाक येथें बातमी आहे.

मशोनालांड येथील अदमासें सात हजार लोकांच्या टोळीनें विक्टोरिया किल्याच्या शेजारी चार्टर्ड कंपनीवर हल्ला केला व त्याच्यावर चाल करून जाण्यास कंपनीच्या फौजेस हुकूम झाला आहे.

मोरोको बंदरावरील मेलिला येथील स्पेनच्या छावणीवर पांच हजार मूर लोकांनीं हल्ला केला व कडक लढाई होऊन स्पेनचे ९० व ३ आफीसर असे ९३ लोक ठार झाले. स्पेनमधून जास्त फौज जात आहे.

इग्लंडच्या कोळशांच्या खाणीच्या मजुरांनीं कट करून खाणी बंद पडल्यामुळें अमेरिकन कोळसा इंग्लंडास आणण्याची सुरुवात झाली आहे.

डुरंड मिशन जें अमिराच्या भेटीस जात आहे त्यांत पुष्कळ गोष्टीचा विचार व्हावयाचा आहे व त्याबद्दल लार्ड लान्स्डन व स्टेट सेक्रेटरी हे अगदीं गप्प आहेत. चित्राळ व असमार या दोन प्रकरणांचा सर्व बाजूनीं विचार व्हावयाचा आहे व पेशावर पासून बलुचिस्थानापर्यंतच्या हद्दीचाही निकाल व्हावयाचा आहे गोमल, झोब व कुर्‍म यांच्या हद्दी कायम करण्याचें कामही आहेच पामीर प्रकरणांत अमिराच्या हिताकरितां इंग्लंड कसें काय जपणार आहे हेंही सर डुरंड हे अमिरास सांगतील व इंग्लंड व अफगाण या दोघांनीं एकत्रपणानें काय करतां येईल याबद्दलही बहुधा बोलणें निघेल असें एका विश्वसनीय पत्राचें ह्मणणें आहे. ठा. अ.

कुराणाची सक्त आज्ञा— इद सणा साठीं मुसलमान लोकांनीं मेंढे, बोकड, किंवा उंट मारावे पण गाय मारू नये असें मुसलमान लोकांचे धर्म पुस्तक जें कुराण त्यांत सांगितलें आहे असा कुराणांतील उतारे देऊन डाक्तर लिटनर यांणीं एशियाटिक क्वार्टर्ली रिव्ह्यू मध्यें एक मोठा निबंध प्रसिद्ध केला आहे. गाई मारून हिंदुस्थानची शांतता मोडूं नका अशी निबंधाचे शेवटीं डाक्टर मजकुरांनीं मुसलमानांस फारफार प्रार्थना केली आहे असें तारीख ?च्या लंडनच्या तारेवरून समजतें. ह्या व दुसऱ्या शतशः प्रमाणावरून ईद किंवा मोहरमच्या सणांत मुसलमानांस गाई मारण्याचें बिलकूल कारण नाहीं असें उघड दिसत असतां दुराग्रहानें मुसलमान लोक गाई मारितात, आणि हिंदू लोकांशीं वैर माजवितात हा मुसलमानांचा किती तरी वेडेपणा आहे ह्याचें अनुमान ही करवत नाहीं.

कुंभार व दारू गाळणार वानर— चिनांतील प्रख्यात प्रवासी डाक्तर म्याकगोवन हे चीनच्या तटा जवळील जंगली प्रदेशांत प्रवास करून नुकेतच टिथसिन येथें परत आले ते लिहितात कीं चीनच्या तटा जवळच्या जंगली प्रदेशांत एक जातीचें वानर आहे ते कुंभारासारखी गाडगी करितात, व करवंदा सारख्या वनफळापासून एक जातीची उत्तम दारू तयार करितात. ज्या भागांत हे वानर राहतात, त्या भागांत हिंवाळ्या मध्यें पाणी गोठतें, त्यामुळें वानरांस प्याव यास पाणी मिळत नाहीं, ह्मणून हिंवाळ्यांत पिण्यासाठीं ती वानरें हें मद्य तयार करून ते गाडग्यात भरून ठेवितात, आणि जेव्हां जेव्हां ते प्रवास करितात तेव्हां आपल्या बरोबर गाडगी नेतात. रस काढितात असतिकडेच शेकडों लोकांनीं पाहिलें आहे असें सांगतात.

१८००० शिया मुसलमानांचीं कुटुंबें गर्ली— अफगाणस्थानांतील हिरात येथील शिया मुसलमानांची अठरा हजार कुटुंबें अमिराच्या सुन्नी कामगारांच्या जुलमास त्रासून इराणांतील मश्त शहरीं राहण्यास जात आहेत असें हिरातच्या गव्हरनरानें अमिरास कळविलें असें सिव्हिल आणि मिलिटरी ग्याझेट कर्ता लिहितो ह्या मुसलमानांनीं मश्त येथें न जाता रशियन राज्यांत सारक आणि मर्व्ह येथें राहावें असा प्रयत्न रशियन सरकारचे मुनीम करीत आहेत.

मिशना बद्दल अफगाण लोकांचें मत— जलालाबाद येथील अफगाण लोकांचें असें ह्मणणें आहे कीं मिशनच्या कामगारांची व्यवस्था अमीर उत्तम प्रकारें ठेवील, त्यांचा मान सन्मान उत्तम राखील, पण अफगाण हद्दींत रेल्वे तारायंत्रें, व क्यांटोनमेंटस उर्फ छत्रण्या करण्यास अमीर कधींही परवानगी देणर नाहीं हिंदुस्थनची सरहद्द सुरक्षित ठेवण्यासाठीं हिंदुस्थान सरकारानें आपल्यास लाल तो पैशाची मदत करावी मगल्या बाजूनें येणाऱ्या शत्रू बद्दल हिंदुस्थान सरकारास आपण जबाबदार राहू असें अमिराचें ह्मणणें आहे. गु० सू०

## जाहिरात

संस्था सोंडूर, जिल्हा बळारी इलाखा मद्रास येथें श्री कार्तिक स्वामीचें महास्थान आहे तेथें चालूं सालांत ह्मणजे कार्तिक शु० पौर्णिमेस मयात्रा भरणार आहे तर यात्रेस येऊ इच्छिणाऱ्या मुमुक्षु लोकांच्या सोयी करितां खालीं लिहिल्या प्रमाणें टिकीटांचे दर ठेविले आत.

| | रुपये |
|---|---|
| पंचामृताभिषेक | २५ |
| सर्वांगाभिषेक | १५ |
| पादाभिषेक | १० |
| पादस्पर्श | ५ |
| दर्शन टिकीट | २ |
| बारावर्षांचे आंत मुलांस दर्शन टिकीट | १ |

कार्तिक शुद्ध १४शीं अभिषेक वगैरे बाबत टिकिटें देण्य सुरुवात होईल शु० १५चे दिवशीं सकाळीं ७ वाजता दर्शनास सुरवात होईल. सदरटिकीटें श्री कार्तिक स्वामीचे डोंगरावर विकत मिळतील ब्राह्मणा वांचून इतर लोकांनीं अभिषेक व पादस्पर्श वगैरे ब्राह्मणद्वारें करवावे.

यंदा देशकाल सुभिक्ष आहे संस्थान सोंडूर येथें येण्यास हासपेट स्टेशन ६ कोस, गादिनूर स्टेशन ४ कोस, तोरणगल्ल स्टेशन ४ कोस याप्रमाणें सोंडूरा पासून रेल्वे स्टेशनें आहेत. सोंडूराहून कार्तीक स्वामीचा डोंगर २ कोस आहे स्टेशनाहून सोंडुरास येण्यास गाड्या वगैरे मिळतात. यात्रेकरू लोकांस कोणत्याही गोष्टीची तसदी नाहीं. श्री स्वामीचें दर्शन घेण्यास योग कार्तीक शु० १५ दिवशीं संपूर्ण आहे.

भिमराव पोळ म्योनजर.

नोटीस.

रा. रा. यशवंतराव भिथमजी देशमुख राहणार गोळेगांव बुजरूख तालुके खामगांव जिल्हे अकोले यांस नोटीस देणार जानराव खुशालराव देशमुख राहणार गोळेगांव बुजरुख तालुके खामगांव जिल्हे अकोले नोटिशीनें असें कळविलें जातें की. लवाजम्या बद्दल निमे हीश्याचा पैसा सुरू सन १३०० व १३०१ चा असे मिळून दोन्ही सालचा पैसा रुपये ६१ तुम्हांस दिले व त्याजबद्दल रीतिप्रमाणें पावती आजपावेतो तुम्ही दिली नाहीं. सुरूं सन १२९८ व १२९९या दोन्ही सालचा लवाजम निमे हिशेचा तुम्हांस आम्ही दिला त्याज बद्दल रीती प्रमाणें तुम्ही पावती आह्मांस दिली आहे. त्या पावती प्रमाणें सुरु सन १३००।१३०१ या दोन्ही सालचा लवाजमा रु. ६१ आह्मी दिले व पावती मागितली तर तुह्मी पावती न देतां उलट तक्रार केली व करीत आहां तुह्मास १३०० व१३०१ या दोन सालचा पैसा ६१ रु० आह्मी दिलें. याजबद्दल साक्षीदार पुष्कळ आहेत परंतु त्याज पैकीं तूर्त चार जणाचीं नांवें प्रसिद्ध करून कळवितो तीं नांवें शामजी वल्लद भवानी मोरखेडे, गंगाराम वल्लद विठू तेली, नारायण लक्ष्मण गतमनें, राहणार गोळेगांव बुजरुख. रावजी भट चिमणभट जोशी हे आहेत. अतां तुह्मी पुढें मार्गे फिर्याद वगैरे केल्यास त्याजबद्दल कोणत्याही प्रकारचें आह्मी जबाबदार नाहीं. तुह्मी रु० (६१) घेऊन पावती दिली नाहीं. ह्मणून ही नोटीस देणें भाग पडलें तर या नोटिशीचा खर्च तुमच्या पैशांतून वजा करून आह्मी घेऊं हें तुह्मास कळावें. व रु० ६१ बद्दल नोटीस पावल्यापासून चार दिवसांत रितिप्रमाणें पावती द्यावी. पावती शिवाय तुह्मास पुढें एक पै सुद्धां मिळणार नाहीं विनाकारण तुह्मी कोणच्याही प्रकारचा त्रास वगैरे दिल्यास त्याज बदलची सर्वपरीची नुकसानी तुह्मापासून घेतली जाईल. ह्मणून दिली नोटीस तारीख १० माहे आक्टोबर सन १८९३ इ०

( सही )

जानराव खुशालराव देशमुख राहणार गोळेगांव बु॥ तालुके खामगांव जिल्हे अकोला दस्तुर खुद्द.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर " • " १८
किरकोळ अंकास ........................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढे दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०।

Six monthly............3 " 8 as.
Single copy.................................4 as

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over10... 4 as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII AKOLA MONDAY 23 OCTOBER 1893 NO 42

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २३ माहे आक्टोबर सन १८९३ इ० अंक ४२

NOTICE

Under the powers conferred on it by section 41(1) (B)of the Berar Municipal Law, the Municipal Committee having, in a special Committee held on the 16th September 1893, passed a resolution imposing the "Municipal tax" in substitution of the Town Fund Tax hitherto levied within the limits of this Municipality, notice is hereby given under section 44 (2) that any inhabitant objecting to the substituted Tax may within 30 days from the date of this notice submit his objection in writing to this Committee.

11th. October 1893. G. Subrayalu Naidu Chairman Municipal Committee Akote.

The Town Fund Tax hitherto levied within Municipal limits under rules framed under section 41 clause A *(b)* of the Berar Municipal Law of 1886 having been abolished with effect from 1st April 1894 by the order of the Governor General in Counil conveyed in ForeignDepartment Notification No 656 I Dated 23rd February 1893. The following tax which shall hereafter be called the "Municipal tax" is imposed within the Limits of the Akote Municipality with the sanction of the Resident and of the Governor General in Council under section 41 (1) *(B)* of the said Law.

The said Municipal Tax shall be levied from the 1st April 1894

The following rules are framed for the collection of the said Tax:

DRAFT RULES FOR THE COLLECTION OF THE MUNICIPAL TAx WITHIN MUNICIPAL LIMITS.

1 Persons assessable to the tax:

The Municipal tax shall, subject to the following provisos, be assessable on every person dwelling, or personally working for gain, or carrying on business within the limits of the Municipality, the whole or any part of whose income derived from any source other than agriculture, is not less than Rs. 100 per annum, at the rate of one per cent. on the taxable portion of his estimated income, derived from any source other than agriculture.

*Proviso I.* Provided that no person or firm shall be assessable to the said tax, at a sum exceeding Rs. 500 per annum, or less than annas 8.

Proviso 2.—Provided that no person or firm shall be assessable to the said tax for the whole of his income from his separate houses or branches, at a sum exceeding Rs.500 per annum. or less than annas 8.

Persons or firms with one or more residences or branches shall be assessed at the principal residence or firm in the Province, and the tax shall be divided between the different Municipalities or Districts in such manner as the Commissioner may direct.

Proviso3.—That in the computation of the income to be assessed, there shall be deducted from the full annual income of the assessee:

(*a*) The sum of ninenty nine rupees, the minimum non taxable-income under these rules; and

(*b*) subject to any conditions and restrictions which the Resident may prescribe in this behalf, such portion, if any, not exceeding one sixth of the full annual income, as is paid by the assessee, in respect of life-insurance, pension, or provident funds.

Proviso 4.—That when one per cent. on the assessable portion of the income involves a fractional part of a rupee, which is less than 8 annas, then 8 annas shall be the amount of the fractional part to be collected, and when one per cent. on such portion of the income involves a fractional part of a rupee, which is greater than 8 annas, then one rupee shall be collected.

II. Sub Committee to assess :

The assessment shall be made by a Sub-Committee specially appointed by the Municipal Committee, and shall be submitted for confirmation to a general meeting of the Municipal Committee.

III. List of assessment open to view:

The list of assessment shall be conspicuously posted in the town and shall be open to view at the Municipal Office. Notices of the assessment payable shall be issued to each person assessed to the tax.

IV. Objections to assessment :

Objections to assessment shall be received and considered by the Municipal Committee, if presented in writing, within one month of the receipt of the notice. Provided that if any person or manager of a firm be absent, and unrepresented by duly empowered agent, so that the notice cannot be served, the period for the filing of objections shall be extended to one month, from the date of the return of such person or manager, or the duly empowered agent of the same.

V. Municipal Committee's decision final:

The decision of the Municipal Committee on objections against assessments shall be final, except in cases where the Chairman of the Municipal Committee shall grant permission for a special appeal to the Commissioner of the Province.

VI. Collection of assessment :

The collection of the assessment shall be made by the Sub Committee (subject to the sanction of the General Committee), or by the Patel, if the Municipal Committee thinks fit to utilize his services, provided, that if his services be so utilized, he shall be remunerated at the same rate, and in the same manner as a Patel who receives remuneration for the collection of the Town Funds in towns and villages where Municipalities have not been constituted.

VII. Arrears of the tax how to be realized :

Arrears of Municipal tax shall be realized by the sale and attachment of property, in the manner in which arrears of land revenue are realized, under warrant issued on the application of the Municipal Committee by the Deputy Commissioner of the District or under his authority by the Tahsildar.

VIII. Meaning of the word "person"

In the above rules, the word 'person' shall mean and include a firm or a corporate or an incorporate company.

IX. Information regarding income to be given:

Every person residing in Municipal limits is bound to give such information as may be called for by the Municipal Committee, as to the amount of his income, to enable the Committee to correctly assess him to Mnnicipa Tax.

X. Persons assessed bound to pay the tax:

All persons assessed are bound to pay the full tax legally assessed on them, to the Committee within the jurisdiction of which they resided at the time of assessment.

XI. The tax due by Government or Railway servants, &c, how to be realized:

The Municipal tax due by Government or Railway servants, or the servants of any company, may be recovered either through the Múnicipal tax collector, or through the head of the department, or manager of the company to which the assessee belongs The head of the Department, or manager of the company shall recover the amount of assessment from the next salary due after the receipt of the requisition of the Committee.

XII. Payment of tax by monthly deductions from the salary:

In the case of Government or Railway servants, if the persons assessed to Municipal tax so desire, it shall be lawful for the Municipal Committee to accept payment of the tax by monthly deductions from the salary, during the time such Officer is serving In Berar. When such an assessment is agreed to by the Municipal Committee and the assessee, the fact of such agreement shall be certified to the official through whom such payment is disbursed, and it shall be incumbent on such official to make such deductions, and remit the amount so deducted to the Municipal Committee.

In this case the monthly deduction will be made in advance, instead of payments being levied at the close of the year.

*XIII.* Arrears of Town Fund tax levied under the rules framed under section 41 clause A (b) shall be recovered as if they were arrears under these rules.

G. Subrayalu Naidu
Chairman
Municipal Cōmmittee
Akote.

## शिक्षण पद्धति
## ( इतिहास )

( ४० अंकावरून पुढें चालूं )

गु०—मुलां, मागील खेपेस तुह्मां इतिहास ह्मणजे काय तें सांगितलें. त्यावरून कोणत्याही स्थळाचा इतिहास ह्मणजे त्या स्थळीं घडलेल्या वर्तमानांचें वर्णन, असें समजायवाचें.

वि०— गुरुजी, आपण आम्हाला महाराष्ट्र देशाचा इतिहास शिकविणार असें दिसतें. पण त्या पूर्वी अकोल्याचा इतिहास कां बरें नाहीं शिकवीत? अकोल्यास कांहींच गोष्टी घडल्या नाहींत काय?

गु० — अरे पृथ्वी उत्पन्न झाल्या पासून आज पर्यंत हजारों वर्षें लोटलीं आहेत. इतक्या अवकाशांत प्रत्येक स्थळीं अनेक गोष्टि घडल्या असतील परंतु कोणत्या स्थळीं केव्हां काय घडलें,याचा पुरावा कसचा सांपडतो! आणि जरी सांपडला, तरी बारीकसारीक गोष्टींचीं वर्णनें लिहून ठेविण्यांत वाचणारास काय बोध होणार! आमच्या या अकोलें शहरीं ज्या अनेक घडामोडी झाल्या असतील, व महत्वाच्या गोष्टी घडल्या असतील, त्यां पैकीं एक दोन गोष्टी मागील काळाची साक्ष देण्या सारख्या आज मितीस हयात आहेत. एक किल्ला आणि दुसरा परकोट. हा किल्ला व परकोट कोणी, केव्हां, कशा साठीं बांधिला याचा बारकाईनें शोध करितां पत्ता लागेल,परंतु असे किल्ले किंबहुना याच्याहून ही मजबूद व मोठाले किल्ले आणि सपिळी वऱ्हाडांत अनेक ठिकाणीं आहेत. त्या सर्वांचे बांधण्याचे काळ आणि बांधणारांचीं नांवें समजून आपल्या ज्ञानांत कोणती भर पडणार!

वि०—गुरुजी, वऱ्हाडांत अनेक ठिकाणीं किल्ले व सपिळीं आहेत ते सर्व आतां मोडकळीस आले आहेत, व त्यांच्या दुरुस्तीची कोणी वास्तपुस्तही करीत नाहींत. यावरून आपण काय समजावयाचें!

गु०—सपिळींची कोणी दुरुस्ती करीत नाहीं,

एकटेंच नाहीं तर त्या पाडण्याचे उद्योग चालले आहेत. या सपिलीं बांधल्या तेव्हां दंगेकार होत असत, दिवसा दरवडे पडत आणि जीविताची व वित्ताची शाश्वती क्षणभर देखील नसे. अशा काळीं आपापल्या गांवाच्या रक्षणार्थ पाटील व देशमुख यांणीं सपिली व कोट बांधविले. आतां इंग्रजी अमलांत चोहोंकडे बंदोबस्त झाल्या मुळें त्यांची जरूरी राहिली नाहीं. या सपिली वरून असें समजावयाचें कीं पूर्वी देशांत अव्यवस्था होती. श्रमाचा मोबदला श्रम करणाराला मिळेलच, असा भरंवसा नव्हता व तेणेंकरून लोक सुखी नव्हते. असो मुला, कोणताही विषय मी तुला शिकवूं लागलों, ह्मणजे तूं मधून मधून शंका घेऊन जे प्रश्न विचारतोस, त्यांनीं कधीं कधीं विषयांतर होतें खरें. परंतु त्यां पासून तुला अनेक गोष्टींची माहिती होते. हें कांहीं वाईट नाहीं.

वि०—इतःपर मी विषय सोडून इतर बाबतींत प्रश्न करून आपला वेळ घालविणार नाहीं. निरनिराळ्या देशांचे इतिहास वाचून आपणांस फायदा कोणता होईल? स्वदेशाचा इतिहास समजल्यानें स्वदेशाची माहिती होईल. परंतु इतर देशांची माहिती मिळवून आपणांस काय उपयोग!

गु०—अरे, इतिहास हें एक शास्त्र आहे. त्याच्या अभ्यासानें मनुष्याला शहाणपण येतें. इतिहासा पासून आपलें किती हित होतें हें तुला समण्या करितां वाफेच्या यंत्राचा थोडासा इतिहास सांगतों. इंग्लंड देशांत एक मुलगा एके दिवशीं चुलीपाशीं बसला होता. चहाकरितां चुलीवर आधण ठेविलें होतें. चहादाणींतुन वाफ जोरानें बाहेर पडतांना झांकण वर उडत होतें. तें पाहत असतां वाफेच्या अंगीं विलक्षण शक्ति आहे असें त्यांस आढळलें. त्या गृहस्थानें आपल्या सगळ्या आयुष्यांत वाफेच्या शक्तीचे अनेक प्रयोग करून पाहिले. त्या सर्व प्रयोगाचें वर्णन त्यानें लिहून ठेविलें होतें. त्या गृहस्थाचें सर्व आयुष्य वाफेच्या अंगीं अद्भुत शक्ति आहे एवढी एक गोष्ट सिद्ध करण्यांत गेलें. त्या नंतर दुसऱ्या एका गृहस्थानें त्या वाफेच्या शक्तीचा व्यवहारांत उपयोग करितां येतो, असें वाफेच्या यंत्रानें खोलांतलें पाणी वर काढून दाखवून सिद्ध केलें. अशा रीतीनें मागील लोकांनीं उद्योग करून ज्या गोष्टी सिद्ध केल्या व जे नवे शोध लाविले, त्यांचा फायदा पुढल्या लोकांस मिळून त्यांनीं मोठमोठाले कारखाने काढिले, आणि अनेक तऱ्हेनें लोकांचें सुख वाढविलें. मनुष्यांचें आयुष्य फार अल्प आहे. तितक्यांत प्रत्येकाला सर्व गोष्टींचें ज्ञान आणि अनुभव घेतां येणार नाहींत. या साठीं मागील लोकांचे अनुभव व त्यांनीं केलेले शोध यां विषयीं वर्णन वाचूनच आपलें ज्ञान वाढविलें पाहिजे अनेक देशांचे इतिहास वाचल्याने, त्यांची मुळची स्थिति होती कशी, कोणत्या कारणानें त्यांच्या स्थितींत कसे कसे फेरफार होत गेले, हल्लीं त्यांची स्थिती कशी आहे इत्यादि गोष्टी आपणांस कळून, आपल्या देशाची उन्नति होण्यास कांहीं उपाय करितां येण्या जोगे असल्यास, त्या रितीनें लोकांची प्रवृत्ति होईल असे लेख लिहून उद्योग करावा. दोन हजार वर्षांपूर्वी इग्लंद देशांत, लोक कातडीं पांघरून, व आंगांस चित्रविचित्र रंग लावून शिकारीवर आपला निर्वाह करीत असत. त्यांच्या पूर्वी पासून हिंदुस्थान देश सर्व कला आणि विद्या यांचें आदि पीठ होतें, आणि त्याला सुवर्णभूमि असें नांव प्राप्त झालें होतें, आतां सर्व पृथ्वीतील संपत्तीचा प्रवाह इंग्लंडाकडे वाहता आहे. आणि इंग्लंड देईल तेवढ्यावर आपला निर्वाह करून, त्याला दुवा देत स्वस्थ बसण्याचा प्रसंग हिंदुस्थानाला प्राप्त झाला आहे. असें कशानें झालें! याचें उत्तर द्यावयास इतिहासाचें ज्ञान आवश्यक आहे.

एखाद्या प्रान्ताचा, अथवा देशाचा इतिहास समजण्या करितां, त्या प्रान्ताचे अथवा देशाचे भुगोल विषयक ज्ञान अवश्य असलें पाहिजे; नसलें तर इतिहास चांगला समजणार नाहीं. तसेंच त्या इतिहासाचें कालज्ञानही पाहिजे. भुगोल आणि काल हे दोन इतिहासाचे नेत्र मानितात.

वि०— गुरुजी, इतिहास समजण्यास जर भूगोलाचें ज्ञान अवश्य आहे, तर आमच्या येथला महाराष्ट्रदेशाचा भूगोल न शिकवितां हिंदुस्थानचा भुगोल का शिकवितां?

गु०—महाराष्ट्रदेश हा हिंदुस्थानांतलाच एक प्रान्त आहे. हिंदुस्थानचा भूगोल समजला ह्मणजे महाराष्ट्रदेशाचा समजलाच ह्मणावयाचें. महाराष्ट्रदेश या नावाचा आतां प्रान्त किंवा देश भूगोलाच्या पुस्तकांत किंवा नकाशांत कोठें ही सांपडणार नाहीं कारण पूर्वी ज्याला महाराष्ट्र असें नांव होतें तो पूर्वी एक देश असून एका राजाच्या तब्यांत होता आतां त्याचे अनेक विभाग होऊन, प्रत्येक विभाग निरनिराळ्या नांवानें प्रसिद्ध आहे. महाराष्टदेशाचें सामान्य लक्षण ह्मटलें ह्मणजे, त्यांत मराठी भाषा बोलतात हें होय. या लक्षणा वरून "महाराष्ट्रदेश" याचा "मराठ्यांचा देश" असा अर्थ करितात. आपला हा वऱ्हाड- प्रांत महाराष्ट्र देशांतला एक भाग आहे.

वि०— नकाशावर महाराष्ट्रदेश कोणता तो मला दाखवा ह्मणजे माझ्या लक्षांत येईल.

गु०— हिंदुस्थानच्या नकाशावर प्रथम मी तुला आपला वऱ्हाड प्रान्त दाखवितों. हा पाहिला वऱ्हाडप्रान्त? याच्या उत्तरेस हा सातपुडा पर्वत, पूर्वेस ही वर्धा नदी, दक्षिणेस पेणगंगा नदी आणि पश्चिमेस खानदेश.

वि०— वऱ्हाडच्या नकाशांत हा प्रान्त या पेक्षां पुष्कळ मोठा काढिलेला आहे, याचें कारण हिंदुस्थानच्या नकाशाचें प्रमाण अगदीं वेगळें आहे. या दोन्ही नकाशातील प्रमाण जर सारखें असतें, तर दोन्ही नकाशांत हा सारखाच दिसला असता नाहीं बरें!

गु०— तुला वऱ्हाडचा भूगोल शिकविण्या पूर्वी नकाशा ह्मणजे काय? तो कसा काढितात व वगैरे माहिती सांगितली होती, ती तुझ्या लक्ष्यात आहे. असो. वऱ्हाडच्या उत्तरेस जो सातपुडा पर्वत आहे, तोच पर्वत पश्चिमेकडे सह्याद्रि पर्वता पर्यन्त लांब गेला आहे. हा सातपुडा पर्वत महाराष्ट्र देशाची उत्तरसीमा होय. वऱ्हाडाच्या पश्चिमेस व सातपुड्याच्या दक्षिणेस जो हा लहानसा प्रान्त आहे, त्याला खानदेश ह्मणतात. हा खानदेश महाराष्ट्रदेशांतील एक भाग आहे. महाराष्ट्रदेशाच्या पश्चिमेस समुद्र आहे, त्याचें नांव आरबी समुद्र. आरबी समुद्राला समान्तर अशी ही उत्तर कडून दक्षिणेकडे जी डोंगराची ओळ आहे, तिला सह्याद्रि पर्वत ह्मणतात. सह्याद्रि पर्वत आणि आरबी समुद्र यांच्या दरम्यान जी ही अरुंद डोंगराळ पट्टी दिसते, तिला कोंकण ह्मणतात.

वऱ्हाडसमाचार

मित्ती आश्विन शुद्ध १२ शके १८१५

## विजयादशमीचें सोनें.

कविता ही सर्व पशुपक्ष्यांसही फार प्रीय आहे. ज्या जना वर कसलाही संस्कार झालेला नाहीं अशांसही एकांतांत आपण आपल्या मनाशीच कुजबुजताना पहातों. कविता ही एक कला आहे. ही सत्य व सार्वत्रिक बोधतत्वें आणि आराम यांचें फार खुबीदार संमेलन करिते. ज्या प्रमाणानें कान न दुखवितां सुवर्णालंकाराची विभूषणजागा निर्माण करणाऱ्या सुवर्णकाराची योग्यता त्याच प्रमाणानें लोकांच्या मनाची सुमार्गी प्रवृत्ति त्यांचीं मनें न दुखवितां करणें हीच कवीची योग्यता. हें काम बजावण्यांत जितकें त्यास यश तितकी त्याची स्वकार्यपटुता. कवीनें अमुकच विषय घ्यावा किंवा अमूकच विषयांवर लिहावें असा बंध नाहीं. याची विशाल कल्पनाशक्ति सुचवील तो त्याचा विषय. भाषे संबंधानें मात्र त्यास बंध आहेत. परंतु यांचाही कवि वारंवार पाश तोडतात व वाटतील त्या छंदांत आणि लागतील त्या प्रासांत ते आपली मनाहर, क्लेशशामक, आरामजनक व सुबोध कृति जगा पुढें मांडतात.

आमच्या एका मित्रानें आमच्या वाचकाच्या मनोरंजनार्थ आह्मास बरेच दिवसांपूर्वी आपल्या कृतीचा आस्वाद देण्याचें अभिवचन दिलें आहे. वऱ्हाड सारख्या प्रांतांत स्थानिक चळवळींचे विषय बरेच कमी असतात. या मुळें वर्तमानपत्रांना वारंवार पत्रव्यवहारावर अगर दुसऱ्या अल्पस्वल्प पण उपयुक्त ह्मणून सर्व संग्रहीत पत्रांतील उताऱ्यांची द्विरुक्ती करून वर्गणीदारांची फसवणूक वारंवार करावी लागते. तर अशा प्रसंगा पासून आमची सुटका होऊन सर्वोत्तम बोधचा बोध होऊन मराठी कवितांची अभिरुचि लोकांत वाढून थोडी फार भाषेची सेवा आमच्या हातून परहस्तें होईल या हेतूनें आह्मी फार आयासानें हा योग घडवून आणिला. या कविता आमच्या आश्रयदात्यास रुचल्या तर आह्मी वेळोवेळीं प्रसिद्ध करणार आहों. नच रुचतील तर लोकरुचि वाढेपर्यंत त्या मुग्ध ठेवणें जरूर आहे. या कविता वर कोणीही आपले अभिप्राय पाठवीत गेल्यास त्यांचा आभारपूर्वक स्वीकार करू इतकेंच नाहीं तर कविताभिरुचि व तिचा प्रसार वाढत चालला याबद्दल आम्हास समाधान वाटून टीकाकारांनीं त्या अभरूचीचें या प्रांतांत प्रसारण केलें असें होईल इकडे विव्दान आश्रयदाते लक्ष पुरवितील अशी आम्ही उमेद बाळगतों.

अर्थातच या नवीन विषयास वेगळें स्थळ योजलें असून आमच्या आश्रयदात्यांस या काव्यांचा आस्वाद लागतो आहे किंवा नाहीं हें कळे पर्यंत मुळ कविता व त्याचें भाषांतर देण्याचें आह्मी योजिलें आहे. पुढें एकेक निवडक उताऱ्याचें पुस्तकच आमच्या वाचकांस खरेदी करावें लागेल. परंतु ही गोष्ट दिनावचीची आहे व एखाद्या अभिवचनावर फार वेळ घोंटाळत बसूं नये हें योग्य आहे.

ज्या ग्राज्युएटांच्या विद्वत्वेकदृष्टीवर नजर देऊन आह्मी आपला गेला अंक त्यांच्यासाठीं लिहून काढला व तसें करिताना अशांच्या विद्वत्वव्यंग्यांवर व त्यांच्यामध्यें जो तटस्थपणा येत चालला आहे तोही समूळ सांगितला आहे अशा एका ग्राज्युएट मित्रा कडून या कविता आल्या आहेत आणि येणार आहेत. "ग्राज्युएटांस मराठी येतच नाहीं" असें ह्मणणाऱ्यांनीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

मुम्बई इलाख्यांतील बहूतेक मासीक पुस्तकांत काव्यभरणा येऊं लागला आहे व अलीकडे तीन चार मासिक पुस्तकें निवळ काव्येंच प्रकाशित करीत असतात यावरून या वाढत्या कालमानांत काव्यरुचीचा जसा तिकडे काल आला हें स्पष्ट होतें तसा इकडे ही येवो ही आशा आहे. तसेंच पाश्चिमात्यांचे विचार पूर्वे कडील मराठी भाषेच्छूस व निवळ मराठी भाषाबांस अगर अर्धवट पाश्चिमात्य भाषाज्ञांस कळावे व त्यांना बोध व्हावा ह्मणून होता होईल तों समाचारांत भाषान्तरेंच येतील.

हा योग आह्मी मुद्दाम विजया दशमीच्या अंकांत प्रथमतः घडवू आणीत आहों व आपल्याच्या पानाचें सोनें ज्या प्रमाणें निष्कपट तिऱ्हाईतांत प्रेम वाढविण्यास साधनीभूत होतें व ते तसल्या पाल्याची खऱ्या सुवर्णा प्रमाणें योग्यता मानतात त्या प्रमाणें हें खरें खरें ज्ञान प्राप्तीचें व रंजनेकरीत्या बोध देणारें सोनें सहृदय वाचकास आनन्दप्रद होवो व इतरांचीं मनें आपल्याकडे ओढून घेवो.

ON FIRST LOOKING 1NTO
CHAPMAN'S HOMER

Much have I travell'd in the realms of gold
And many goodly states and kingdoms seen;
Round many western islands have I been
Which bards in fealty to Appolo hold.
Oft of one wide expanse had I been told
That deep brow'd Homer ruled as his demesne:

lower limbs were then saturated with oil; the platform also was dipped in oil. The space beneath was filled with combustibles, and the whole was covered with oil, and fire simultaneously set to his scathed feet and stack below.

Fathers, men of social and business standing had brought their children to learn how fallen men were to be disposed of. The boasted of, and kind white mothers were there. Even women whose culture entitles them to be among the social and intellectual leaders of the town were there. But these tortures though common there are not deemed a proper lesson to their children to pick up how far revenge should be carried and how human beings should be treated provided they be weak and fallen.

This horrible revenge naturally calls to our mind several past instances of equally horrible atrocity. Kaye's Sepoy War in India shows to us to what extent our own rulers are susceptible of revenge. Might is right. The barbarities of the time can not be heard or recounted without exciting bitterest horrors!

Some four years ago when Theba was deposed the Burmese fighting for their liberty and freedom could not be reduced to obedience. They were tortured and their struggles were portrayed in photographs! But these are political persecutions and troubled times might furnish numerous and other equally atrocious revenges.

Of isolated individual instances every one can call to his mind numerous ones. It would be difficult to select all and still more so to select some. It is better therefore to forget them.

Is such dire revenge the outcome of flesh—eating? If so we disclaim it. If we want Native rulers it is because natives are peculiarly more generous, keen, and forgiving.

## वऱ्हाड.

हवामान—थंडी चांगली पडूं लागली आहे. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं. यंदा एकंदर २४ इंच पाऊस पडला. पीकें चांगल्या स्थितींत आहेत.

रा. रा. विठूजी नारायण तहशिलदार केळापूर यांस चालू महिन्या पासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

पातुर शेखबाबू येथील कांहीं गृहस्थांनीं १८० रुपये वर्गणी सरकारांत भरली आणि पांचव्या इयत्ते करितां इंग्रजी शिक्षक मागितला आहे.

प्रो० गोपाळ कृष्ण गोखले यांस येथील क्लबानें परवा पानसुपारी देऊन त्यांचा गौरव केला. हल्लीं पानसुपारी अगदीं साधारण समारंभ झाला आहे. पण तें गौणत्व कक्षांत न घेतां आकोलकरांनीं अपरिचित गोखले यांचा हा बहुमान राखला या बद्दल क्लबच्या सूत्रधारांचे व चिटणीसांचे आम्ही भरपूर आभार मानतों.

रा. रा. रघुपत मोहनराव यांस मंगरूळपीरास तहशीलदार नेमून त्यांच्या जागीं यो नरेश्या कमिशनरचे आफिसांतील सेकंड क्लार्कचे १५० रुपये पगारावर त्यांचे बंधु रा० रा० मारुती मोहनराव यांस शंभरच्या जागेवरून बदली दिली.

येथील डायरेक्टर ल्यांड रेकार्ड आफिसांतील क्लार्क रा० रा० हणमंत वीरेश्वर यांस यवतमाळचे सर्व्हे आफिसचे हेड क्लार्कचे जागीं बदलले.

या आठवड्यांत येथें तीन दिवस घोड्याच्या शर्यती झाल्या शर्यती पाहण्यासाठीं प्रेक्षकसमूह बराच जमत होता. एक शर्यत येथील डेपुटी कमिशनर क्याप्टन मारिस यांनीं जिंकली त्या वेळची शर्यत जिंकणारी घोडी राजश्री उगवेकर देशमुख यांची होती.

मेसर्स हालडेन व मार्टीन एक्स्ट्रा असि. कानसरव्हेटर यांस अनुक्रमें वाशिम व आकोला येथें नेमण्यांत आलें.

रावसाहेब देवराव विनायक वकील व रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर एक्स्ट्रा असि.कमिशनर यांनीं फर्ग्युसन कालेज फंडाला अनुक्रमें एक सहस्र व दोनशे रुपये वर्गणी दिली.

नोटीस

तिर्थरूप रा० रा० आमराजा बा रामजी माहानंकार राहणार तुळंगे खुर्द तालुके बाळापूर यांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमची मातुश्री नांवे जानबाई इज बरोबर गंधर्व केला त्यास अजमासे आज तेरा वर्षें झालीं. गंधर्व करते वेळीं तुह्मी करार करून दिला. तो लिहिले प्रमाणें. उदेभान वलद पामाजी याचे लग्न करून देऊं. व सरवे नंबर ४२ एकर २१ एकवीस गुंठे १२ सरकारी आकार रुपये ३४ चे शेताचे निमें भाग खातें उदेभान वलद पामाजी यांचे नांवे करून देणेचें ठरलें व यास प्रमाणें एक बैलाची जोडी दाहामण जवारी.व राहण्यास घर बारा खांबी यांचें बांधून देऊं अशा करारानें तुम्ही गंधर्व करून घेतला. करारा पैकीं लग्न मात्र तुम्ही करून दिलें.बाकी च्यार कलमें सदरी लिहिलेली पुरीं करून देणेचीं आहेत.तर नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांत राहिलेली च्यार कामें पुरीं करून द्यावीत. नाहीं तर तुम्हावर रिती प्रमाणें काम चालवून ह्या नोटीशीच्या खर्चा सह सर्व नुकसान निकाल होई पर्यंत होईल ते भरून घेतले जाईल म्हणून दिली नोटीस तारीख २३ १०।९३ इ०

( सही )

उदेभान वलद पामाजी आंबळकार राहणार तुळंग खुर्द याच्या हातची निशाणी नांगर असे

नोटीस

किरकोळ दि० मु० नं० ३ सन१८९३

वि० दिपुटी कमिशनर साहेब बहादूर जि० उमरावती यांचे कोर्टांत.

मैनाबाई नवजे हरलाल पागमुक जात परवार राहणार उमरावती. } मेत.

ज्या अर्थीं ओंकारदास वलद कालचंद व फत्तेचंद वा० मूळचंद राहणार आकोट यांनीं ह्या कोर्टांस सदरहू मेताचे इस्टेटीबद्दल व मालमिळकती बद्दल सन१८८१चा आक्ट नं. १९ अन्वयें अर्ज दिल्या वरून सदरहू मेताचे जे वारस व ज्यांचा विशेष संबंध आहे असे लोकांस ह्या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, ही नोटीस वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्या तारखे पासून एक महिन्याचे आंत जे कोणी त्या इस्टेटीचे संबंधानें वारस असतील त्यांनीं आपला हक्क संबंध दाखविण्या करितां मे० निकाल्ट साहेब बहादूर जि० जडज्य कोर्ट उमरावती यांचे कोर्टांत हजर व्हावें.

कोर्टाचे सही शिक्यानिशी ही नोटीस दिली असे. आज तारीख १४माहे आक्टोबर सन १८९३ इ०

W. V. Chandekar.
Clerk of Court

नोटीस

वि० दिपटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे उमरावती यांचे कोर्टांतः—

कि० दिवाणी मु० नं० ४ सन १८९३

सन १८८१ चा आक्ट नंबर ५ यांतील कलम १९ अन्वयें

नैनाबाई नवजे हरलाल प्राणसुक जात परवार राहणार उमरावती. } मेत.

ज्या अर्थीं चुनियाबाई नवजे रामचंद्र परवार राहणार उमरावती इनें ह्या कोर्टांस सदरहू मेताचे इस्टेटी बद्दल व माल मिळकती बद्दल सन १८८१ चा आक्ट नंबर ५ कलम १२ अन्वयें अर्ज दिल्यावरून सदरहू मेताचे जे वारस व ज्यांचा विशेष संबंध आहे असे लोकांस ह्या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, ही नोटीस वर्तमान पत्रांत प्रसिद्ध झाल्या पासून एक महिन्याचे आंत जे कोणी त्या इस्टेटीचे संबंधानें वारसदार असतील त्यांनीं आपला हक्कसंबंध दाखविण्या करितां मे० निकाल्ट साहेब बहादूर जिल्हा जडज्य कोर्ट उमरावती यांचे कोर्टांत हजर व्हावें.

कोर्टाचे सही शिक्यानिशी ही नोटीस दिली असे. आज तारीख १४ माहे आक्टोबर सन १८९३ इ०

W. V. Chandekar.
Clerk of Court.

## वर्तमानसार

lower limbs were then saturated with oil; the platform also was dipped in oil. The space beneath was filled with combustibles, and the whole was covered with oil, and fire simultaneously set to his scathed feet and stack below.

Fathers, men of social and business standing had brought their children to learn how fallen men were to be disposed of. The boasted of, and kind white mothers were there. Even women whose culture entitles them to be among the social and intellectual leaders of the town were there. But these tortures though common there are not deemed a proper lesson to their children to pick up how far revenge should be carried and how human beings should be treated provided they be weak and fallen.

This horrible revenge naturally calls to our mind several past instances of equally horrible atrocity. Kaye's Sepoy War in India shows to us to what extent our own rulers are susceptible of revenge. Might is right. The barbarities of the time can not be heard or recounted without exciting bitterest horrors!

Some four years ago when Theba was deposed the Burmese fighting for their liberty and freedom could not be reduced to obedience. They were tortured and their struggles were portrayed in photographs! But these are political persecutions and troubled times might furnish numerous and other equally atrocious revenges.

Of isolated individual instances every one can call to his mind numerous ones. It would be difficult to select all and still more so to select some. It is better therefore to forget them.

Is such dire revenge the outcome of flesh—eating? If so we disclaim it. If we want Native rulers it is because natives are peculiarly more generous, keen, and forgiving.

## वऱ्हाड.

हवामान—थंडी चांगली पडूं लागली आहे. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं. यंदा एकंदर २४ इंच पाऊस पडला. पीकें चांगल्या स्थितींत आहेत.

रा. रा. विठूजी नारायण तहशिलदार केळापूर यांस चालू महिन्या पासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

पातुर शेखबाबू येथील कांहीं गृहस्थांनीं १८० रुपये वर्गणी सरकारांत भरली आणि पांचव्या इयत्ते करितां इंग्रजी शिक्षक मागितला आहे.

प्रो० गोपाळ कृष्ण गोखले यांस येथील क्लबानें परवा पानसुपारी देऊन त्यांचा गौरव केला. हल्लीं पानसुपारी अगदीं साधारण समारंभ झाला आहे. पण तें गौणत्व क-

क्षांत न घेतां आकोलिकरांनीं अल्पपरिचित गोखले यांचा हा बहुमान राखला या बद्दल क्लबच्या सूत्रधारांचे व चिटणीसांचे आम्ही भरपूर आभार मानतों.

रा. रा. रघुपत मोहनराव यांस मंगरूळपीरास तहशीलदार नेमून त्यांच्या जागीं योजलेल्या कमिशनरचे आफिसांतील सेकंडक्लार्कचे १५० रुपये पगारावर त्यांचे बंधु रा० रा० मारुती मोहनराव यांस शंभरच्या जागेवरून बदली दिली.

येथील डायरेक्टर ल्यांड रेकार्ड आफीसांतील क्लार्क रा० रा० हणमंत वीरेश्वर यांस यवतमाळचे सर्व्हे आफिसचे हेड क्लार्कचे जागीं बदललें.

या आठवड्यांत येथें तीन दिवस घोड्याच्या शर्यती झाल्या शर्यती पाहण्यासाठीं प्रेक्षकसमूह बराच जमत होता. एक शर्यत येथील डेपुटी कमिशनर क्याप्टन मारिस यांनीं जिंकली त्या वेळची शर्यत जिंकणारी घोडी राजश्री उगवेकर देशमुख यांची होती.

मेसर्स हालडेन व मार्टीन एक्स्ट्रा असि. कानसरव्हेटर यांस अनुक्रमें वाशिम व आकोला येथें नेमण्यात आलें.

रावसाहेब देवराव विनायक वकील व रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर एक्स्ट्रा असि. कमिशनर यांनीं फर्ग्युसन कालेज फंडाला अनुक्रमें एक सहस्र व दोनशे रुपये वर्गणी दिली.

### नोटीस

तिर्थरूप रा० रा० आमराजा वा रामजी माहानंकार राहणार तुळंगे खुर्द तालुके बाळापूर यांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमची मातःश्री नांवे जानाई इज बरोबर गंधर्व केला त्यास अजमासे आज तेरा वर्षें झालीं. गंधर्व करते वेळी तुह्मी करार करून दिला. तो लिहिले प्रमाणें. उदेभान वल्लद पामाजी याचे लग्न करून देऊ. व सरवे नंबर ४२ एकर २१ एकवीस गुंठे १२ सरकारी आकार रुपये ३४ चे शेताचे निमें भाग खातें उदेभान वल्लद पामाजी यांचे नांवे करून देणेचे ठरले व यान प्रमाणें एक बैलाची जोडी दाहामण जवारी. व राहण्यास घर बारा खांबी बांधून देऊ अशा करारानें तुम्ही गंधर्व करून घेतला. करारा पैकीं लग्न मात्र तुम्ही करून दिलें. बाकी च्यार कलमे सदरी लिहिलेली पुरी करून देणेची आहेत. तर नोटीस पावल्या पासुन पंधरा दिवसात राहिलेली च्यार कामे पुरी करून द्यावीत. नाहीं तर तुम्हावर रिती प्रमाणें काम चालवून ह्या नोटीसीच्या खरचा सह सर्व नुकसान निकाल होई पर्यंत होईल ते भरून घेतले जाईल म्हणून दिली नोटीस तारीख २३ १०।९३ इ०

( सही )

उदेभान वल्लद पामाजी आंबळकार राहणार तुळंगे खुर्द याच्या हातची निशाणी
बखर असे

### नोटीस

किरकोळ दि० मु० न० ३ सन१८९३
वि० डिपुटी कमिशनर साहेब बहादूर
जि० उमरावती यांचे कोर्टांत.

मैनाबाई नवजे इच्छाळ पागमुक } मेत.
जात परवार राहणार उमरावती. }

ज्या अर्थीं ओंकारदास वल्लद लालचंद व फत्तेचंद वा। लालचंद राहणार आकोट यांनीं ह्या कोर्टास सदरहू मेताचे इस्टेटीबद्दल व मालमिळकती बद्दल सन१८८१चा आक्ट नं. १९ अन्वयें अर्ज दिल्या वरून सदरहू मेताचे जे वारस व ज्यांचा विशेष संबंध आहे असे लोकांस ह्या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, ही नोटीस वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्या तारखे पासून एक महिन्याचे आंत जे कोणी त्या इस्टेटीचे संबंधानें वारस असतील त्यांनीं आपला हक्क संबंध दाखविण्या करितां मे० निकालेट साहेब बहादूर जि० ज्यडज्य कोर्ट उमरावती यांचे कोर्टांत हजर व्हावें.

कोर्टाचे सही शिक्यानिशी ही नोटीस दिली असे. आज तारीख १४माहे आक्टंबर सन १८९३ इ०

W. V. Chandekar.
Clerk of Court

### नोटीस

वि० डिपटी कमिशनर साहेब बहादूर
जिल्हे उमरावती यांचे कोर्टांतः—

कि० दिवाणी मु० नं० ४ सन १८९३
सन १८८१ चा आक्ट नंबर ५ यांतील कलम १९ अन्वयें

नैनाबाई नवजे हरश्चाल प्राणसुक } मेत.
जात परवार राहणार उमरावती. }

ज्या अर्थीं चुनियाबाई नवजे रामचंद्र परवार राहणार उमरावती हिनें ह्या कोर्टास सदरहू मेताचे इस्टेटी बद्दल व माल मिळकती बद्दल सन १८८१ चा आक्ट नंबर ५ कलम १२ अन्वयें अर्ज दिल्यावरून सदरहू मेताचे जे. वारस व ज्यांचा विशेष संबंध आहे असे लोकांस ह्या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, ही नोटीस वर्तमान पत्रांत प्रसिद्ध झाल्या पासून एक महिन्याचे आंत जे कोणी त्या इस्टेटीचे संबंधानें वारसदार असतील त्यांनीं आपला हक्कसंबंध दाखविण्या करितां मे० निकोलेट साहेब बहादूर जिल्हा जडज्य कोर्ट उमरावती याचे कोर्टांत हजर व्हावें.

कोर्टाचे सही शिक्यानिशी ही नोटीस दिली असें. आज तारीख १४ माहे आक्टंबर सन १८९३ इ०

W. V. Chandekar.
Clerk of Court.

## वर्तमानसार

करें यश संपादन करोत. वकीला सारख्यांस अल्प श्रमानें बहु लाभ होतो हें प्रसिद्धच आहे सबब त्यांनीं उदारहस्तानें मदत देऊन आपल्या कुळांस फी शिवाय आणखी हा वर्गणीचा भागही देण्यास लावावें. असें केल्यानें उपयुक्त कार्यास वेळेवर मदत होईल.

---

यंदा सिमला येथें हिंदुस्थानांतील सर्व रेलवे अधिकाऱ्यांची मोठी सभा होणार आहे व त्यांत पुष्कळ प्रश्नांचा व सुचनांचा निकाल होणार आहे. त्या सभेस बंगाल्यांतील एकानें असा अर्ज केला आहे कीं, तिसरे क्लासचे भाडें कमी करावें. भाड्याचे दर कमी करावे हें तर पाहिजेच आहे पण त्या खेरीज आणखी पुष्कळ गैरसोई आहेत. त्याही दूर केल्या जाणें जरूर आहे. त्या अशा कीं, प्रथम तिसरे क्लासचे उतारू स्टेशनवर आल्यास त्यांस उभे रहाण्यास अगर बसण्यास पुरेशी जागा नसते. कित्येक ठिकाणीं तर मुळींच नसते. पुढें तिकटें घतेवेळीं ह्या त्यास फार त्रास होतो तो असा कीं ज्या जागीं तिकिटें मिळतात ती जागा ह्मणजे एखादी लहान खिडकी अथवा खिडकी मोठी असल्यास अर्धी खिडकी मोकळी किंवा तारेनें बेष्टिलेलें एका लहानशा कोनाड्या एवढें भोंक असतें. या ठिकाणीं इतकी गर्दी होते कीं, स्वताचे पैसे खर्च होऊन धर्मधक्के व धर्मलाथा तिकिटा बरोबर मिळतात. येथून सुटल्यावर तरी संपतें कां तर नाहीं. या जागेंतून गाडीकडे प्लाटफार्मवर जातांना अशीच तऱ्हा असते ह्मणजे तेथेंही एक फाटक असून त्याचें एकच द्वार मोकळें ठेऊन त्यांतून एक एक मनुष्यास सोडण्याचा बंदोबस्त असतो. प्रत्येक उतारूस आपण पुढें जाऊन गाडींत आधीं बसण्याची इच्छा असल्यामुळें जो तो पुढें जाण्यास होईल तितका प्रयत्न करतो व असें होतांना बहुधा मुलांची व कुळस्त्रियांची फार फजिती उडते.

गाडीजवळ गेल्यावर ह्यांना कोणी गाडीचें द्वार सुद्धां उघडून देत नाहींत. बिचारे या डब्या पासून त्या डब्या कडे पळत असतात. इतकें करून गाडींत गेल्यावर जशी जागा असेल तशी ते आपली सोय करितात उभे तर उभेच राहतात. एक पाय ठेवण्यास जागा मिळाली तर तेवढ्यावर खुष असतात. परंतु इतकेंच भाडें देऊन एखादा टोपीवाला असला तर त्यापुढें सतरा शिपाई व पोर्टर त्यांची थुंकी झेलण्यास तयार असतात. आंत बसलेल्या अथवा निजलेल्यांस मारून शिव्या देऊन उठवितात इतकेंच नाहीं तर त्यास तेथून काढून लावतात. गाडींतील बसणारांस पिण्याचे पाण्या करिता ही त्रास होतच असतो. कित्येक ठिकाणीं तर मुळींच मिळत नाहीं. कित्येक ठिकाणीं सोय असली तर पाणीवाला मनुष्य एक पोहरा हातांत घेऊन अर्धे पोहरा पाणी असलेंच तर असतें. व तितकें पाणी सर्व गाडींतील लोकांस देऊन पुन्हा दुसऱ्या गाडींतील लोकांस देण्या करितां उरविण्याची त्याची तयारी असते. प्रत्येक गाडींत पायखाने नसल्यानें दूर दूरचे प्रवासांत बराच त्रास होतो. गाडींत दिवे पुष्कळ नसतात व असतात ते ही चांगले जळत नसतात. स्टेशनावर गाडी येऊन उभी राहिल्यावर गाडींत पुरेशी जागा नवताही कित्येक लोकांस हे शिपाई कोंबून दाबून कसे तरी भरतात व मागून गाडीचें द्वार इतकें जोरानें लावतात कीं आंत बसणारांचें हातापायास कित्येक वेळीं बरीच दुखापत होते. या व अशाच गैरसोयी शेवटील वर्गाच्या उतारूस प्रत्यहीं होत असतात. त्यांचा विचार या नव्या सभेंत होईल तर दगडाला पान्हा फुटला ह्मणावयाचा!

---

**The Berar Samachar**

MONDAY OCTOBER, 23, 1893

## HUMAN NATURE IS ALWAYS SELFSAME OR EUROPEAN REVENGE!

The Arena for April comments strongly upon the brutality with which the negroes are treated by their most civilized, enlightened and intellectually developed white neighbours of the Nineteenth century. In some cases white men have deliberately mutilated and mangled them! In some they have flayed them alive. Burning is a very common punishment the whites, benignly and with singular munificence characteristic of them only, inflict upon the negroes. But we cull one instance from the Review of Reviews to show how relentless Europeans turn and how ghastly horrible they become when they have the power to take revenge upon their fellow creatures! The more so when they have a free and unrestrained scope to indulge in their ideas of revenge. Only facilities are wanted, and the ready contempt particularly for lost grandeur and fallen greatness are sure to do their pleasing work.

A case of the worst horror occurred in Northern Texas. A few months ago, a negro of the name of Smith under the influence of a very strong liquor, the father of more crime than aught else, the great redeemer of European soldiers here murdering, insulting, and outraging poor and innocent Indian farmer's wife, killed a little three years-old girl of Vance a town in Northern Texas. Of the dead he had in fact hardly any recollection. He was however more unfortunate than several other fellow creatures of his. He was guilty of being born of a race which, among many others, is the object of the white Man's contempt. If he had been a white the excuse of his being fast drunk would have been ingeniously invented even if he had not been.

After four days the man was arrested and taken to Paris in Northern Texas. When the train bearing the poor negro arrived, not only every member of the community was in waiting at the Depot, to receive him and attend his execution but thousands of men had gathered from all towns within a radius of a hundred miles from Paris. Smith was greeted with cheers. A slow lingering death awaited him. He was placed in a wagon, trembling and livid with fear. Even the archfiend of hell would have deemed the mental agonies of the negro during that long interval a horrible and more than adequate torture for any crimes however atrocious. On a large cotton float a box had been placed: on its top a chair. The criminal was driven slowly to the public square, around it, and out to the place of his death. When he reached the place where he was to be tortured, he was placed on the chair and most securely bound. When the wagon approached Vance the father of the little girl murdered by Smith appeared on the platform and asked the crowd, now densely packing for hundreds of yards away, and numbering to thousands of men to be quiet; after a pause which would have made even a heavy breath audible he assured the people assembled that he wanted for a while to get his revenge, and then he would turn the prisoner over to any one that wanted him. Smith's legs, arms, and body were securely corded to a stake to render any motion on his part utterly impossible. He was then delivered over to Vance's vengeance to expiate his crime.

A tinner's furnace was brought on fillled with irons heated white. Taking one Vance thrust it under one and then the other side of Smith's feet. He helplessly writhed and the flesh seared and peeled from the bones. Vance took up to his assistence, his brother-in-law and his own heroic son a boy fifteen years of age. By turns they went on thrusting the white hot iron into such parts of his body as would keep life and yet torture him. The more delicate parts however it must be remembered were only scorched and scalded. For if the vitals were thrust into it would have been no game to the infinite spectators and the gentlemen indulging in revenge. When Smith's face was reached, they silenced by fire—thrusts. his tongue, which had so long screamed, prayed, begged, and cursed. his merciful torturers was Henceforth he only moaned or wailed a cry that echoed like the wail of a wild animal. Then his eyes were put out and not a finger's breadth of his body was unscathed. His executioners gave way. Smith and the clothing about his

Yet did I never breathe its pure serene
Till I heard Chapman speak out loud and bold:
—Then felt I like some watcher of the sikes
When a new plant swims into his ken,
Or like stout Cortez—when with eagle eyes
He stared at the Pacific, and all his men
Look'd at each other with a wild surmise
Silent, upon a peak in Darien.

होमर कवि सम दुजा कवी या जगीं नाहीं पाहिलीं ।
या पुढें इतर कवी भाजला ॥ ध्रु ॥
सुवर्ण भूमि प्रदेश फिरलों राज्यें बहु पाहिलीं ।
व्यवस्थित पाहुनि मति लोभली ॥ १ ॥
पश्चिम ककुभीं द्वीप समूहीं फिरलीं यत्कवि किंदा ।
अपोलो देवावरि सर्वदा ॥ २ ॥
ऐकत होतो अफाट एक प्रदेश होमर कवी ।
जेथलें राज्य करीं वागवी ॥ ३ ॥
च्यापम्यन् कविकृत विशदार्थातें सेवुनिया माधुरी ।
चाखिली अमृत रसाचे परी ॥ ४ ॥
अह नव दृष्टिस पडता उठते ज्योतिर्विद चेतसीं ।
लहरी आनंदाची जसी ॥ ५ ॥

चाल

बाल्बोआ वीर जसा हर्षला ।
पर्वता वरुनि जयीं देखिला ।
दृष्टिनें सूक्ष्म जलधि दूरला ॥
तत्सैनिक गण अद्भुत विस्मय चकितचि भांबावला ।
कविकृतिनें मोद तसा दाटला ॥ ६ ॥
होमर कविसम....॥

---

## पिशवी सोडा

( प्रोफेसर गोपाळ कृष्ण गोखले यांचा दवरा )

पुण्यास आठ दहा वर्षां पूर्वी एक विद्यासंपन्न गृहस्थांची मंडळी विद्याप्रसारा साठीं स्थापित झाली हें महशूरच आहे. या मंडळीची दृष्टी निखालस देशसेवेकडे आहे इतकेंच नाहीं तर ही मंडळी आत्महिताकडे व प्रचूर द्रव्यार्जना कडे दुर्लक्ष करितात. देशसेवेंत नाणवलेल्या या मंडळी पैकीं प्रसिद्ध प्रोफेसर गोखले यांची स्वारी वऱ्हाडप्रांतीं फर्ग्युसन कालेजच्या इमारती– फंडाला वर्गणी गोळा करण्या साठीं आली आहे. पुण्याच्या 'सुधारक' पत्राचे हे एक एडिटर आहेत. या विद्वान गृहस्थाचें येथें व्याख्यान होणें इष्ट होतें परंतु वर्गणी जमा करण्या खालीं हेलपाटे मारण्या मुळें त्यांस आपल्या व्याख्यानाचा लाभ अकोलेकरांस देतां आला नाहीं. ला.– प्रोफेसर बाळ गंगाधर टिळक याचा नामनिर्देश पूर्वी १८८३-८४ च्या सुमारास प्रो. आगरकर आकोल्यास आले होते त्या वेळीं वन्यतेनें व जयघोषानें होत असे. परंतु हल्लीं 'सुधारक' पत्रांतून प्रो. टिळकांचें गुणवर्णन येत असतें तेवढ्यावरच तृप्ती न झाल्या मुळें प्रो. गोखले यांस भेटणाऱ्या गृहस्थांना त्यांच्या रसाळवाणीनें टिळकांचा परिचय करून घ्यावा लागला व झालाही.

'फर्ग्युसन कालेज' ही संस्था सुमारें १३ वर्षांपूर्वी निघालेल्या न्यूइंग्लिश स्कूलाचा भव्य व रमणीय विस्तार होय. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रो. टिळक आदिकरून विद्वान गृहस्थांनी सरकारी नोकरीची व द्रव्यलाभाची अपेक्षा न करितां न्यू. इंग्लिश स्कूल आरंभीं स्थापिलें त्या वेळीं प्रत्येकीं तीस तीस रुपये दरमहा मोठ्या पराकाष्ठेनें पडत असत. पुढें लवकरच कै० आपटे व प्रो. आगरकर या मंडळींत शिरले. १८८० साला च्या अखेर अखेर शिरलेल्या नवीन मंडळींत मतभेद पडूं लागला व शास्त्री बुआ. मृत्युंगत झाले आणि होतां होतां नवीन प्रो. गोखल्या सारखी तरतरीत मंडळी शिरूं लागली. द्रव्यन्यूनता भरून काढणारी समाधानता विलयास जात चालली आणि ग्रंथप्रकाशनानें द्रव्यार्जन करणें या मंडळी पैकीं इतरांस साधत नव्हतें. देशसेवेची पताका घेऊन वर्गण्या मिळविणें वरील दोन्ही गोष्टी पेक्षां पुष्कळांस आवडतें 'सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः' हाच न्याय सार्वत्रिक आहे. न्यू इंग्लिश स्कूल ही संस्था ओघाओघानें ' डेकन एजुकेशन सोसायटी ' या भपकेदार संज्ञेखाली समाविष्ट होऊं लागली किंबहुना कै. शास्त्री बुवांनीं काढलेल्या शाळा, केसरी वर्तमान वगैरे संस्था एज्युकेशन सोसायटीच्या सेवगणामध्यें लोक मोडूं लागले बरेच विद्वान् एतद्देशीय गृहस्थ ह्मणजे कै० तेलंग, डा. वेलि, मि. शिताराम विश्वनाथ पटवर्धन, रा. ब. रानडे, भिडे वगैरे 'केसरी पत्राच्या टाइपांच्या दांषविस्फोटनांतून पार पडले इतकेंच नाहीं तर मुख्य मुख्य नांवाजलेले सरकारी अधिकारी एजुकेशन सोसयटीच्या प्रधान मंडळांत असल्यामुळें या देश सेवेचा बाणा बाळगणाऱ्या मंडळीचे कित्येक राव बहादूर साक्षात दरवेशीही बनले. शाळेचाही या दास्यत्वानें लाभ झाला कांकीं सोसोयटीच्याच शाळांना मिळणारी क्यापिटेशन ग्रांट मुलांच्या सरासरीच्या हजिरीच्या मानानें मिळूं लागली. उत्तरोत्तर द्रव्यप्राप्ति वाढली आनि या मंडळीचें कालेज नामदार गव्हरनर फर्ग्युसन यांच्या नांवावर निघालें तेव्हां नाममहिमा व धनण्णा हीं चांगलीं कळून आलीं. सरकारी नौकरींतील प्राप्तीची उणीव भरून येते असें बाहेर कळत चाललें तेव्हां वयातीत, सरकारी चाकरीस अयोग्य अगर कंटाळलेले, चाकरी मिळवितांना होणारी उपहास्यता टाळणोर व बरेच वेळां वाऱ्या करून थकत थकत पार पडलेले विद्वान पदवीवाले व बिनपदवीवाले गृहस्थ अलिकडे अलिकडे या संस्थेंत शिरूं लागले आहेत. या व अशा अनेक कारणामुळें शाळा व कालेज या संस्था चांगल्या भरभराटीस येत चालल्या आहेत त्या अशाच येत जातील इतकेंच नव्हे पण या पेक्षाही त्यांची अभिवृद्धि होईल असें आम्हांस वाटलें होतें! पण सध्याचा उत्कर्ष देखील अभिनंदनीयच आहे. व परनिंदातत्पर व परोत्कर्षासहिष्णु मंडळीचे यवेच्या यवे बाहेर पडतील अशी उमेद आहे.

एज्युकेशन सोसायटीचा द्रव्यार्जनाचा उद्योग कित्येक वर्षां पासून सपाट्यानें सुरू आहे. प्रो. गोखले यांची या प्रांताकडील स्वारी सुपीक प्रदेशांतच आहे. कांहीं भूमींत कांहीं विवक्षित पिकांना विशेष योग्य असतात. खरेंच आहे कीं द्राक्षभूमि अनिराचें पीक देत नाहीं. तंदुलोत्पादक भूमींत गहूं पिकत नाहीं. मध्य प्रदेशा प्रमाणें सरकारी नोकरीला वऱ्हाड प्रांत जरी हितावह नाहीं तरीं वकिलांस व त्यांच्या पिकांस फार योग्य आहे. व्यापारासही तसाच फलदायक आहे. स्पेनेस नेरीस आणारे व्यापारी व त्यांचे मदतनीस वकील या उभयतांस एक विचारानेंच रहावें लागतें. प्रो गोखले यांनीं स्वग्राम सोडल्यावर येथें एका प्रसिद्ध वकिलाच्या येथेंच जानासा दिला आहे तेव्हां त्यांचा कार्यभाग नीट शेवटास जावो अशी आमची मनःपूर्वक इच्छा आहे. राष्ट्रीय सभेला वकील लोक स्वहस्तें मदत करितात आणि शिवाय आपल्या हस्तक आशिलांस गळ घालून परहस्तें पैसा गोळा करितात तेव्हां आतां इकडील लोकांचा नाममहिमा फर्ग्युसन कालेजा संबंधानें पाहणें आहे. विद्यादानाकडे या वर्गण्यांचा उपयोग होणार आहे तेव्हां तो पैसा स्थानिक विद्याप्रसारासाठीं न जमतां बाह्य ठिकाणीं खर्चला गेला तरी त्याचा विषाद कोणी मानूं नये; इतकेंच नाहीं तर कांहीं प्रवीण पारधी आपल्या जाळ्यांत धनाढ्य सावजें पकडून उधळपट्टी व पैसेलूट करितील तरी देखील आह्मांस तात्पर्यदृष्टीनें समाधानच वाटेल.

न्यू इंग्लिश स्कुलच्या लायब्ररीला वऱ्हाडांतून कांहीं दिवसापूर्वी मोठी देणगी मिळालेली आहे आणि त्याच सहाय्याच्या व आप्त स्नेहाच्या जोरावर प्रो. गोखले यांनीं ही सफर काढोली असावी. प्रो. गोखले यांस उमरावती, वर्धा, नागपूर वगैरे ठिकाणीं जाणें आहे सबब त्यांची फार खोटी न करितां त्यांस लवकर पुढें जाऊं देणें जरूर आहे. यांस मदत इतक्या दुरून व्हावी या बदल आमचा पक्का आग्रह आहे आणि तो असण्याचीं कारणें बहुत आहेत त्या पैकीं मुख्य मुख्य येथें देणें गैरवाजवी होणार नाहीं.

पहिलें कारण असें कीं यांचा छापखाना व सून यांच्या पत्रांत इकडील चळवळीची चर्चा आश्रय दात्यांच्या हितास व विचारांस अनुरूप अशाच लेखानें येतील व यांना मदत न दिली तर हे या प्रांताची टेर तेव्हांच उडवून देऊन या प्रांतास इंडियांतील सुधारक वर्गांतून वैदर्भकारासारख्या लोकांस न जुमानतां अर्जा फाटा देतील.

दुसरें कारण, एक आतां मोठा वादाचा प्रश्न निघावयाचा आहे. त्या बदल मुंबई इलाख्यांतील एतद्देशीय पत्रें अनकूल करून घेण्यास सुरू झालेल्या खटपटीस अनायासें भर पडेल.

तिसरें कारण, प्रतिवर्षीं कांहीं विद्यार्थी पैशाच्या टंचाईमुळें नाइलाजास्तव फर्ग्युसन कालजांत जातात. त्यांस अप्रत्यक्ष मदत केली असा मोठेपणा मिरवितां येईल.

चवथें कारण, डेकन कालेजाची फी वाढविल्या बरोबर वेतन वाढविण्यास फर्ग्युसन कालेजवाल्यास संधि मिळाली तशा संधि त्यांनीं पुन्हा दवडाव्यात असें ह्मणण्यास हल्लींच्या वर्गणीदारांस सवडी होतील.

पाचवें कारण, 'फर्ग्युसन कालेज' हें नांव माजी गव्हनरांस खुष करून जाणा व आश्रय उपटण्या करितां हल्लींच्या कालेजाला दिलें तसें चांगली मदत देणाऱ्याच्या नांवानें कालेजांतील पुस्तकांच्या कपाटास वगैरे एखाद्याचें नांव मिळेल.

सहावें कारण, लोकल फंड स्थेतेच्या अनेक सुखा करितां जमा होतो. त्यांत विद्यादान हा एक मुख्य उद्देश आहे. शाळा खाजगी लोकांनीं काढिल्या आणि दर खेड्या मागें खाजगी संस्थेच्या शाळा निघाल्या तर सरकारचा खर्च कमी होऊन लोकल फंडाची अवशिष्ट रक्कम इतर उपयुक्त बाबीकडे सरकारास देतां येईल! सरकार बसवेलेला कर कमी करणार नाहींच तरी सरकारानें शिल्लक राहिलेली रक्कम दुसऱ्या उपयुक्त खर्चांत पाडली तरी पुष्कळ आहे. सरकारच्या सद्दीचा जोर असा विलक्षण आहे कीं देशसेवच्या मिषानें सरकारी गुलाम गिरीवर लाथ मारणाऱ्या लोकां कडून कांहींही गोष्ट झाल्यास तीही सरकारास अनुकूल असते व परिणामीं त्यांसच हितावह!

सातवें कारण, वऱ्हाडांत पी. ई. चा क्लास काढण्या विषयीं अलिकडे प्रश्न निघाला आहे आणि दोन्ही हायस्कुलांतील शिक्षक चांगले विद्वान असून इतर कालेजांतील नोटस् जमा करून फर्ग्युसन कालेजा पेक्षां ही ज्यास्त यशानें विद्यार्थी पी ई. च्या परीक्षेंत पसार करितील असे आहेत तेव्हां येथें अगर उमरावतीस पी. ई. चा क्लास जोडतां येण्या सारखा आहे. परंतु पुण्यग्रामाच्या शीतहवेंत राहणाऱ्या मंडळींचीही उणीव भरून काढिली पाहिजे सबब ही गोष्ट देशाभिमानी वकील मंडळीस कळत नाहीं असें आहे तो पर्यंत तरी अशी मदत होईल तितकी बरीच! या साठीं कांहीं लोकांच्या एकमेकांच्या अप्रत्यक्ष वजनाचा होत असलेला उपयोग स्तुत्य आहे असें ह्मणावें लागतें

आठवें कारण, थोडे दिवसा पूर्वी या मंडळीस डेकनकालेज इमारत, सामान पुस्तक संग्रह दोन जाड्या प्रोफेसरांचा तनखा वगैरे सहित सरकार देत होतें त्यावेळीं ती गोष्ट मंडळीनें नाकारली आणि सरकारी ग्रांटें करितां ओरड चालवून पुणे शहरच्या दुसऱ्या बाजूला शोभायमान इमारत बांधण्यास सुरुवात केली आहे ही गोष्टी सर्वांनीं लक्षांत ठेऊन आश्रय दिलाच पाहिजे. द्रव्याश्रयोपार्जनाच्या मोहिमेवर प्रो. गोखल्या सारख्या तरतरीत विद्वानांची योजना या प्रांता संबंधानें झाली आहे या बद्दल आम्हा वऱ्हाडस्थांवर या मंडळीचे महदुपकार झाले आहेत कारण कांग्रेस करितां नागपुरास जातांना जे गोखले आपल्या जुन्या सहाध्यायीस रावबहादुर रानड्याच्या सान्निध्यामुळें फुरुग नुसते पाहीनात ही तेच परही येऊन आपल्या बरोबर त्याच मित्राच्या घरीं हेलपाटे मारूं लागले. हा त्यांच्यातील फरक लक्षात आल्या नसता. या शिवाय दुसरी अनेक कारणें आहेत त्यांचा विचार होऊन प्रो. गोखले यांचा प्रवासहेतु सिद्धीस जाऊन शारदासदनादि पर्यंत संस्थांस हातभर अगर बागाश्रयभर तरी देण्याची त्यास उमेद येवो. सार्वजनिक सभेचे हे तरतरीत पगारी सेक्रेटरी नागपुरा

( पुरवणी पहा )

बचुनाळांड येथें लढाई सुरू होण्याचा रंग आहे.

सिडनी येथील बागेंत सोडन येथून आणलेलें एक माकड आहे व त्याकरतां ३७,००,००,००० रुपये खर्च झालेले आहेत असें सांगतात.

डा. हर्टस नांवाच्या एका युरोपियनानें लोकांचा एकोपा करण्याची एक नवी युक्ती काढली आहे. लोकांची अशी एक वसाहत करावी कीं, तेथील सर्व लोक सारखे असून एका कुटुंबासारखे असावेत व त्यांची माल मिळकत, पैसा अडका, वगैरे सर्व एकाच ठिकाणीं समाईक असें असावें या आपल्या युक्तीचा कसा काय परिणाम होतो याचा अनुभव पाहाण्याकरतां आफ्रिकेंत एके ठिकाणी तशी वस्ती करण्याचें त्याणे योजून त्याकरतां तशा समजुतीचे लोकही जमा केले आहेत व त्या वस्तीस आमच्याकडून योग्य ती मदत मिळेल असें इंग्रजसरकारानें त्यास वचनही दिलें आहे असें सांगतात. उद्योग चांगला आहे व युरोपियन लोकांच्या अशा कित्येक उद्योगांवरून तें आतां हळूं हळूं हिंदुस्थानच्या पूर्वीच्या स्थितीचें अनुकरण करण्याच्या मार्गाकडे वळूं लागले आहेत असें दिसतें. हिंदूची एकत्र कुटुंबाची जुनी पद्धत अशाच मुद्यावर होती, इजिप्त–मिश्र देशाची पहिली वसाहत हिंदुस्थानच्या जुन्या राजांनी अशाच तत्वावर केली होती, व आफगाणिस्थानांत त्याच तत्वावर झालेली एक वसाहत अजूनही कायम आहे. इंग्रजांच्या सहवासानें मात्र आतां आमचीं एकत्र कुटुंबें विभक्त होऊं लागलीं आहेत.

कलकत्ता हायकोर्टांत १९ मुसलमानांवर गर्दी केल्याचा, अन्यायानें कैदेंत ठेवल्याचा व घर फोडीचा, खटला होता. कज्यांत जी हकिकत बाहेर आली त्यावरून समजतें कीं, त्या कैद्यांतील एकाचें मूल परनिया येथें मेलें व त्यास पुरण्यांत आलें. पण त्याच खेड्यांतल्या चौघी हिंदु स्त्रियांनीं जादु करून त्या मुलास मारलें असा मेलेल्या मुलाचा बाप व त्याचे मित्र यांस संशय आला. त्यावरून ते त्या स्त्रियांच्या घरीं गेले व त्या चौघी स्त्रियांस मसणवटींत घेऊन आले व दोन दिवसांपूर्वी पुरलेले मुलाचें प्रेत बाहेर काढलें आणि त्या चौघींच्या पदरांत घालून जिवंत जिवंत करीत ते जवळ उभे राहून ह्मणत होते. त्या स्त्रिया मनांत आणतील तर त्या मुलास जिवंत करातील अशी त्या मुसलमानांची समजूत असल्यामुळें त्याणी त्या स्त्रियांस ती सगळी रात्र व दुसऱ्या दिवशीं दुपारपर्यंत स्मशानांतच ठेवून तो क्रम चालला होता. ही गोष्ट सांगून इंग्रज लोक ह्मणतात कीं, इंग्रजी विद्या व इंग्रजी विचार यांचा हिंदुस्थानांत जरी इतका फैलाव झाला आहे तरी लोकांच्या असल्या समजुती अजून कायमच आहेत हें मोठें नवल आहे. नवल खरेंच, पण असलें नवल दुसऱ्याही पुष्कळ बाबतींत आहेच हिंदुस्थानांतलीं माणसें इंग्रजमाणसांसारखींच आहेत अशी दोनशें वर्षांच्या सहवासानें खात्री झाली असतांही तीं सर्व्हीस नोकऱ्यांस लायक नाहींत असें जें अजून ही प्रतिपादन करण्यांत येतें तेंही एक नवलच आहे.

तुह्मी शहाणे झाला ह्मणजे तुह्मास मोठाल्या जागा देऊं असें सांगण्यांत येत असून व त्यांस शहाणे करण्याचा १०० वर्षें सारखा उद्योग चालूं असून अजूनही ते शहाणे झाले ह्मणण्याचें धैर्य होत नाहीं हें काय लहान नवल आहे. ठा. ब

काबूल मिशन.— ता. ६ मिनहू रोजीं सर ड्यूरंड यांची अमिराची पहिली मुलाखत झाली. त्यांनीं प्रथम अमीर यांचे चिरंजीवाची भेट घेतली. नंतर त्यांनीं ड्यूरंड यांस अमीर यांजकडे नेलें. अमिरानीं थोडेसे पुढें येऊन शेकह्यांड करून मंडळीचे स्वागत केलें अमिराच्या समोर उजवे बाजूस अफगाणसरदार व डावे बाजूस इंग्रज मंडळी बसली. प्रथम कुशल प्रश्न वगैरे केल्या नंतर अमीर ह्मणाले "लालपुरा येथें व्हाईसराय साहेबांची भेट घेण्याचें माझ्या मनात फार होतें, परंतु त्यावेळीं माझी प्रकृति नादुरस्त असल्यामुळें मला तसें करतां आलें नाहीं. हिंदुस्थानांत येण्याचा व विलायतेस प्रवास करण्याचा बेत मला माझ्या प्रकृतिमुळेंच मागें ठेवावा लागला. तथापि आतां व्हाईसराय साहेबांनीं आपल्या सारख्या हुशार कामगारांस मुद्दाम मजकडे पाठविलें ह्या गोष्टीचा मला मोठा आनंद वाटतो. आजपर्यंत जे ब्रिटिश कामगार अफगाणिस्थानामध्यें आले ते लढाई करण्याकरितां आले होते. परंतु हल्लीं तुह्मी जे येथें आला आहा ते फार निराळ्या उद्देशानें आलेले आहा. ब्रिटिश सरकार व आफगाणीस्थान ह्यांतील स्नेहभाव वृद्धिंगत करण्याकरतां तुह्मी आज येथें आला आहांत. तुमच्या ह्या मिशनानें सर्व लोकांस असें कळून येईल कीं, महाराणी सरकार आणि अमीर ह्यांच्या दरम्यान असलेला स्नेहभाव अगदीं निर्व्याज आणि खरा आहे." ह्या प्रमाणें अर्धा पाउण तास बोलणें झाल्यानंतर सर मार्टिम ड्यूरंड हे सर्व कामगारांसह आपल्या राहण्याच्या ठिकाणीं परत आले. मिशनच्या मुख्य कामाचें बोलणें अद्यापि निघालें नाहीं. क० त०

इंदुर येथील एका वैद्यानें पिसाळलेल्या कुत्र्याच्या दंशावर एक औषध शोधून काढिलें आहे असें पुणेवैभवावरून समजतें. ते औषध असें:–पिकलेल्या केळ्याचे ३ भाग करून प्रत्येकांत केस काढलेली सिंव्हाची कातडी एकेक रतीभर घालून ते ३ भाग एकेक तासाच्या अंतरावर कुत्रें चावलेल्या मनुष्यास खावयास द्यावे ह्मणजे तावडतोब विष उतरतें. वैद्यानीं स्वतः अनुभव घेतला आहे. लोकांनीं घ्यावा.

बहार हेरल्डमध्यें प्रसिद्ध झालें आहे कीं समेरिया घाटावरील एका सन्याशाच्या आश्रमाला दोन युरोपियनानीं आग लावून दिली. हें खरें असेल तर याची चौकशी होऊन गुन्हेगारांस कडक शिक्षा झाल्या पाहिजेत. न्या० सु०

पोलिसास फांशीची शिक्षा— खानदेश जिल्ह्यांतील येशू वल्द गहिनाजी पोलिस कान्स्टेबल ह्याचा गाजी नांवाच्या औरतेशी वाईट संबंध होता. नवऱ्यानें तीस आपल्या गांवीं पाचोरें येथें नेल्यामुळें वाईट वाटून ह्या पोलिस शिपायानें गोजी व तुळशी ह्या दोन औरतेस सुऱ्यानें भयंकर जखमा केल्या त्यात गोजी तात्काळ मेली व तुळशी पुढें पाच दिवसानीं मेली. ह्या भयंकर अपराधा बद्दल येसूस सेसन्स जड्जानें फांशीची शिक्षा दिली ती हायकोर्टानें मंजूर केली. शु० सू०

"ॲडव्होकेट" पत्रावरून ही पुढील हकीकत आह्मी कळवितो. सिलापूर येथील लष्करी छावणींतील सदर बाजारांत शामलाल नांवाच्या एका दुकानदारानें लष्करी अम्मलदारांची परवानगी मिळवून एक वर्षा पूर्वी एक देऊळ बांधलें; परंतु सदर बाजारांतील कांहीं लोकांच्या कुरकुरीमुळें देवांची पूजा अर्चा, सांज सकाळ होण्यास हरकत होऊं लागली. पुढें तो एकदां बाहेर गांवीं गेला असतां त्याचे पाठीमागें देऊळ भ्रष्ट केलें. परंतु हें दुष्कृत्य करणाऱ्यांचा मुळींच पत्ता लागला नाहीं. शेवटीं या सर्व गोष्टीबद्दल वर्तमान पत्रांतून बोभाटा होऊन लेफटेनंट गव्हरनरसाहेब यांच्या कानावर जाऊन त्यांनीं देऊळ शामलाल यांच्या स्वाधीन करून यथास्थितपणें पूजा, अर्चा वगैरे होऊं देण्याविषयीं हुकूम फर्माविला. त्याप्रमाणें निमूटपणें लेफटेनंट गव्हरनरसाहेब यांच्या हुकूमाप्रमाणें चालू केलें. परंतु आतां पुन्हा शामलाल व त्याचे देवालय यांजवर दुःखकारक प्रसंग गुदरला आहे. तेथील कँनटुनमेंट माजिस्ट्रेट यांनीं चालू महिन्याच्या ४ थे तारखेस शामलाल यांस बोलावून नेऊन तुमचें देवालय ७२ तासाच्या आंत येथून काढून दुसरीकडे न्यावें असा एकदम लेखी हुकूम फर्माविला. तसें तुह्मीं न केल्यास आह्मीं देऊळ वरिष्ट अधिकाऱ्याकडून हुकूम आल्याप्रमाणें मोडून टाकू. सदर बाजारांत दुसरीकडे नेणें असल्यास ती जागा हिंदु व मुसलमान यांनीं मान्य केली पाहिजे व तेथें हें देऊळ बांधण्याबद्दल खर्च तुह्मास सरकारी अम्मलदार ठरवितील तितका दिला जाईल. माजिस्ट्रेट साहेबांनीं पुष्कळ प्रकारें धाक दडप घालून शामलाल यास सांगितलें व त्यांनें आपल्याकडून करवल्या तेवढ्या विनवण्या केल्या तरी ते ऐकेनात; परंतु शेवटीं तो असें बोलला कीं माझा प्राण गेला तरी हें मी करणार नाहीं असें ते पत्रकर्ते लिहितात. याजवरून त्या गरिब मनुष्यावर हा केवढा गहजब गुदरत आहे व तोही धर्म संबंधाच्या बाबतींत हें पाहून सिलापुरचे लोकांची मनें अगदीं अस्वस्थ होऊन गेलीं आहेत. याचा विचार सरकारानें तावडतोब करणें अवश्य आहे असें आह्मास वाटतें.

एक इंग्लिश शिपायांची पलटण शिकंदराबादेस जाण्या करितां गुडकल येथें उतरली होती. या पलटणींतील सहा शिपाई एके दिवशीं फिरावयास गेले तेव्हां त्यांच्या नजरेस २ बाया शेतांत काम करतांनां पडल्या. यांच्यावर जुलूम करण्याच्या हेतूनें हे त्यांच्याकडे धांवत गेले; परंतु हे आपल्याकडे धांवत येत आहेत असें जेव्हां त्यांनीं पाहिलें तेव्हां जवळच्या स्टेशनाजवळील एका झोपडींत त्या शिरल्या व झोपडीचें दार लावलें. इतक्यांत आरडाओरड होतांच कांहीं माणसें जमा झालीं. आपल्या हातांतून या बाया निसटल्या हें जेव्हां या नरपशूंनीं पाहिलें तेव्हां त्यांनीं आपल्या बंदुकी झाडल्या व एका माणसाला इजा झाली व तो मनुष्य मेला व अद्याप यांचा पत्ता व चवकशी नाहीं. मद्रासमध्यें या मनुष्यानें दोन निरपराधी बायांचें संरक्षण करण्याच्या कामीं आपला जीव खर्ची घातला ह्मणून मंडळी फंड जमा करीत आहे. मद्रास सरकारनें असल्या प्रकारचे गुन्हेगार पकडून त्यांना जबर शिक्षा देऊनये व मुकाट्यानें गप्प बसावें हें मोठें लज्जास्पद आहे व एकंदरीनें दूरवर विचार केल्यास असलेच खटले इंग्रजी राज्याच्या घातास मोठे कारणीभूत होण्याचा संभव आहे. अशाच प्रकारचे भयंकर नीच व अमानुष कृत्यें राजरोस मणिपूर मध्यें चालली आहेत व त्या बद्दल कलकत्ता येथील पत्रांत चर्चा होत आहे असें समजतें. याही गोष्टीकडे सरकारी अंमलदारानीं योग्य वेळीं लक्ष पुरविल्यास बरें होईल.

मसलीपटण येथें दंगा होण्याची भीति आहे ह्मणून तेथील डि. माजि. नें खर्चा बद्दल १ लक्ष रुपये दंगा झाल्यास लोकांकडून घेतले जातील. असें कळविलें. सु. प.


## जाहिरात.

संस्थान सोंडूर, जिल्हा बळारी इलाखा मद्रास येथें श्री कार्तिक स्वामीचें महास्थान आहे तेथें चालूं सालांत ह्मणजे कार्तिक शु० पौर्णिमेस महापात्रा भरणार आहे तर यात्रेस येऊ इच्छिणाऱ्या मुमुक्षु लोकांच्या सोयी करितां खालीं लिहिल्या प्रमाणें टिकीटांचे दर ठेविले आहेत.

| | रुपये |
|---|---|
| पंचामृताभिषेक | २५ |
| सर्वांगाभिषेक | १५ |
| पादाभिषेक | १० |
| पादस्पर्श | ५ |
| दर्शन टिकीट | २ |
| बारावर्षांचे आंतील मुलांस दर्शन टिकीट | १ |

कार्तिक शुद्ध १४ रोजीं अभिषेक वगैरे बाबत टिकिटें देण्यास सुरुवात होईल शु० १५चे दिवशीं सकाळीं ७ वाजता दर्शनास सुरवात होईल. सदर टिकिटें श्री कार्तिक स्वामीचे डोंगरावर विकत मिळतील. ब्राह्मणावांचून इतर लोकांनीं अभिषेक व पादस्पर्श वगैरे ब्राह्मणद्वारें करवावे.

यंदा देशकाल सुभिक्ष आहे. संस्थान सोंडूर येथें येण्यास हांसपेट स्टेशन ६ कोस, गादिनूर स्टेशन ४ कोस, तोरणगल्ल स्टेशन ४ कोस याप्रमाणें सोंडुरा पासून रेल्वे स्टेशनें आहेत. सोंडूराहून कार्तीक स्वामीचा डोंगर ९ कोस आहे स्टेशनाहून सोंडूरास येण्यास गाड्या वगैरे मिळतात. यात्रेकरू लोकांस कोणत्याही गोष्टीची तसदी नाहीं. श्री स्वामीचें दर्शन घेण्यास योग कार्तीक शु० १५ दिवशीं संपूर्ण आहे.

भिमराव पोळ म्योनजर


☞ हें पत्र आकोलें येथें कें० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

बचुनाळांड येथें लढाई सुरू होण्याचा रंग आहे.

सिडनी येथील बागेंत सीडन येथून आणलेलें एक माकड आहे व त्याकरतां ३७,००,००,००० रुपये खर्च झालेले आहेत असें सांगतात.

डा. हर्टस नांवाच्या एका युरोपियननें लोकांना एकोपा करण्याची एक नवी युक्ती काढली आहे. लोकांची अशी एक वसाहत करावी कीं, तेथील सर्व लोक सारखे असून एका कुटुंबासारखे असावेत व त्यांची माल मिळकत, पैसा अडका, वगैरे सर्व एकाच ठिकाणीं समाईक असें असावें या आपल्या युक्तीचा कसा काय परिणाम होतो याचा अनुभव पाहाण्याकरतां आफ्रिकेंत एके ठिकाणी तशी वस्ती करण्याचें त्याणे योजून त्याकरतां तशा समजुतीचे लोकही जमा केले आहेत व त्या व्यवस्थेस आमच्याकडून योग्य ती मदत मिळेल असें इंग्रजसरकारानें त्यास वचनही दिलें आहे असें सांगतात. उद्योग चांगला आहे व युरोपियन लोकांच्या अशा कित्येक उद्योगांवरून तें आतां हळूं हळूं हिंदुस्थानच्या पूर्वीच्या स्थितीचें अनुकरण करण्याच्या मार्गांकडे वळूं लागले आहेत असें दिसतें. हिंदूची एकत्र कुटुंबाची जुनी पद्धत अशाच मुद्यावर होती, इजिप्त–मिश्र देशाची पहिली वसाहत हिंदुस्थानच्या जुन्या राजांनी अशाच तत्वावर केली होती, व आफगाणिस्थानांत त्याच तत्वावर झालेली एकें वसाहत अजूनही कायम आहे. इंग्रजांच्या सहवासानें मात्र आतां आमचीं एकत्र कुटुंबें विभक्त होऊं लागलीं आहेत.

कलकत्ता हायकोर्टांत १९ मुसलमानांवर गर्दी केल्याचा, अन्यायानें कैदेंत ठेवल्याचा व घर फोडीचा, खटला होता. कज्यांत जी हकिकत बाहेर आली त्यावरून समजतें कीं, त्या कैद्यांतील एकाचें मूल परनिया येथें मेलें व त्यास पुरण्यांत आलें. पण त्याच खेड्यांतल्या चौघी हिंदु स्त्रियांनीं जादु करून त्या मुलास मारलें असा मेलेल्या मुलाचा बाप व त्याचे मित्र यांस संशय आला. त्यावरून ते त्या स्त्रियांच्या घरीं गेले व त्या चौघी स्त्रियांस मसणवटींत घेऊन आले व दोन दिवसांपूर्वीं पुरलेले मुलाचें प्रेत बाहेर काढलें आणि त्या चौघींच्या पदरांत घालून चिलाव चिलाव करीत ते जवळ उभे राहून म्हणत होते. त्या स्त्रिया मनांत आणतील तर त्या मुलास जिवंत करातील अशी त्या मुसलमानांची समजूत असल्यामुळें त्याणी त्या स्त्रियांस तो सगळी रात्र व दुसऱ्या दिवशीं दुपारपर्यंत स्मशानांतच ठेवून तो क्रम चालला होता. ही गोष्ट सांगून इंग्रज लोक म्हणतात कीं, इंग्रजी विद्या व इंग्रजी विचार यांचा हिंदुस्थानांत जरी इतका फैलाव झाला आहे तरी लोकांच्या असल्या समजुती अजून कायमच आहेत हें मोठें नवल आहे. नवल खरेंच, पण असलें नवल दुसऱ्याही पुष्कळ बाबतींत आहेच हिंदुस्थानांतलीं माणसें इंग्रजमाणसांप्रमाणेंच आहेत अशी दोनशें वर्षांच्या सहवासानें खात्री झाली असतांही तीं सन्दी नोकऱ्यांस लायक नाहींत असें जें अजून हे प्रतिपादन करण्यांत येतें तेंही एक नवलच आहे.

तुम्ही शहाणें झाला म्हणजे तुम्हास मोठाल्या जागा देऊं असें सांगण्यांत येत असून व त्यांस शहाणे करण्याचा १०० वर्षें सारखा उद्योग चालूं असून अजूनही ते शहाणे झाले म्हणण्याचें धैर्य होत नाहीं हें काय लहान नवल आहे. ठा. भ

काबूल मिशन.— ता. ६ मिनहू रोजीं सर ड्यूरंड यांची अमिराची पहिली मुलाखत झाली. त्यांनीं प्रथम अमीर यांचे चिरंजीवाची भेट घेतली. नंतर त्यांनीं ड्यूरंड यांस अमीर यांजकडे नेलें. अमिरानीं थोडेसे पुढें येऊन शेकह्यांड करून मंडळींचे स्वागत केलें अमिराच्या समोर उजवे बाजूस अफगाणसरदार व डावे बाजूस इंग्रज मंडळी बसली. प्रथम कुशल प्रश्न वगैरे केल्या नंतर अमीर म्हणाले "लालपुरा येथें व्हाईसराय साहेबांची भेट घेण्याचें माझ्या मनात फार होतें, परंतु त्यावेळीं माझी प्रकृति नादुरस्त असल्यामुळें मला तसें करतां आलें नाहीं. हिंदुस्थानांत येण्याचा व विलायतेस प्रवास करण्याचा बेत मला माझ्या प्रकृतिमुळेंच मागें ठेवावा लागला. तथापि आतां व्हाईसराय साहेबांनीं आपल्या सारख्या हुशार कामगारांस मुद्दाम मजकडे पाठविलें ह्या गोष्टीचा मला मोठा आनंद वाटतो. आजपर्यंत जे ब्रिटिश कामगार अफगाणिस्थानामध्यें आलें ते लढाई करण्याकरितां आले होते. परंतु हल्लीं तुम्ही जे येथें आला आहा ते फार निराळ्या उद्देशानें आलेले आहा. ब्रिटिश सरकार व आफगाणीस्थान ह्यांतील स्नेहभाव वृद्धिगत करण्याकरतां तुम्ही आज येथें आला आहांत. तुमच्या ह्या मिशनानें सर्व लोकांस असें कळून येईल कीं, महाराणी सरकार आणि अमीर ह्यांच्या दरम्यान असलेला स्नेहभाव अगदीं निर्व्याज आणि खरा आहे." ह्या प्रमाणें अर्धा पाउण तास बोलणें झाल्यानंतर सर मार्टिम ड्यूरंड हे सर्व कामगारासह आपल्या राहण्याच्या ठिकाणीं परत आले. मिशनच्या मुख्य कामाचें बोलणें अद्यापि निघालें नाहीं. क० त०

इंदुर येथील एका वैद्यानें पिसाळलेल्या कुत्र्याच्या दंशावर एक औषध शोधून काढिलें आहे असें पुणेवैभवावरून समजतें. ते औषध असें:–पिकलेल्या केळ्याचे ३ भाग करून प्रत्येकांत केस काढलेली सिंव्हाची कातडी एकेक रतीभर घालून ते ३ भाग एकेक तासाच्या अंतरावर कुत्रें चावलेल्या मनुष्यास खावयास द्यावें म्हणजे ताबडतोब विष उतरतें. वैद्यांनीं स्वतः अनुभव घेतला आहे. लोकांनीं घ्यावा.

बहार हेरल्डमध्यें प्रसिद्ध झालें आहे कीं समेरिया घाटावरील एका सन्याशाच्या आश्रमाला दोन युरोपियनांनीं आग लावून दिली. हें खरें असेल तर याचा चौकशी होऊन गुन्हेगारांस कडक शिक्षा झाल्या पाहिजेत. न्या० सु०

पोलिसास फांशीची शिक्षा— खानदेश जिल्ह्यांतील येशू वल्द गहिनाजी पोलिस कान्स्टेबल ह्याचा गजी नांवाच्या औरतेशी वाईट संबंध होता. नवऱ्यानें तीस आपल्या गांवीं पांचोरें येथें नेल्यामुळें वाईट वाटून ह्या पोलिस शिपायानें गोजी व तुळशी ह्या दोन औरतेस सुऱ्यानें भयंकर जखमा केल्या त्यात गोजी तात्काळ मेली व तुळशीं पुढें पाच दिवसांनीं मेली. ह्या भयंकर अपराधा बद्दल येसूस सेसन्स जज्जानें फांशीची शिक्षा दिली ती हायकोर्टानें मंजूर केली. शु० सू०

"ॲडव्होकेट" पत्रावरून ही पुढील हकीकत आम्ही कळवितों. सिलापूर येथील लष्करी छावणीतील सदर बाजारांत शामलाल नांवाच्या एका दुकानदारानें लष्करी अम्मलदारांची परवानगी मिळवून एक वर्षा पूर्वीं एक देऊळ बांधलें; परंतु सदर बाजारांतील कांहीं लोकांच्या कुरकुरीमुळें देवांची पूजा अर्चा, सांज सकाळ होण्यास हरकत होऊं लागली. पुढें तो एकदां बाहेर गांवीं गेला असतां त्याचे पाठिमागें देऊळ भ्रष्ट केलें. परंतु हें दुष्कृत्य करणाऱ्यांचा मुळींच पत्ता लागला नाहीं. शेवटीं या सर्व गोष्टीबद्दल वर्तमान पत्रातून बोभाटा होऊन लेफटेनंट गव्हरनरसाहेब यांच्या कानावर जाऊन त्यांनीं देऊळ शामलाल यांच्या स्वाधीन करून यथास्थितपणें पूजा, अर्चा वगैरे होऊं देण्याविषयीं हुकूम फर्माविला. त्याप्रमाणें निमूटपणें लेफटेनंट गव्हरनरसाहेब यांच्या हुकूमाप्रमाणें चालू केलें. परंतु आतां पुन्हा शामलाल व त्याचे देवालय यांजवर दुःखकारक प्रसंग गुदरला आहे. तेथील कॅनटुनमेंट माजिस्ट्रेट यांनीं चालू महिन्याच्या ४ थे तारखेस शामलाल यांस बोलावून नेऊन तुमचें देवालय ७२ तासाच्या आंत येथून काढून दुसरीकडे न्यावें असा एकदम लेखी हुकूम फर्माविला. तसें तुम्ही न केल्यास आम्ही देऊळ वरिष्ट अधिकाऱ्याकडून हुकूम आल्याप्रमाणें मोडून टाकू. सदर बाजारांत दुसरीकडे नेणें असल्यास ती जागा हिंदु व मुसलमान यांनीं मान्य केली पाहिजे व तेथें हें देऊळ बांधण्याबद्दल खर्च तुम्हास सरकारी अम्मलदार ठरवितील तितका दिला जाईल. माजिस्ट्रेट साहेबांनीं पुष्कळ प्रकारें धाक दडप घालून शामलाल यास सांगितलें व त्यांनें आपल्याकडून करवल्या तेवढ्या विनवण्या केल्या तरी ते ऐकेनात; परंतु शेवटीं तो असें बोलला कीं माझा प्राण गेला तरी हें मी करणार नाहीं असें ते पत्रकर्ते लिहितात. यावरून त्या गरिब मनुष्यावर हा केवढा गहजब गुदरत आहे व तेही धर्म संबंधाच्या बाबतींत हें पाहून सिमपूरचे लोकांचीं मनें अगदीं अस्वस्थ होऊन गेलीं आहेत. याचा विचार सरकारानें ताबडतोब करणें अवश्य आहे असें आम्हास वाटतें.

एक इंग्लिश शिपायांची पलटण सिकंदराबादेस जाण्या करितां गुडकल येथें उतरली होती. या पलटणींतील सहा शिपाई एके दिवशीं फिरावयास गेले तेव्हां त्यांच्या नजरेस २ बाया शेतांत काम करतांनां पडल्या. यांच्यावर जुलूम करण्याच्या हेतूनें हे त्यांच्याकडे धांवत गेले; परंतु हे आपल्याकडे धांवत येत आहेत असें जेव्हां त्यांनीं पाहिलें तेव्हां जवळच्या स्टेशनाजवळील एका झोपडींत त्या शिरल्या व झोपडीचें दार लावलें. इतक्यांत आरडाओरड होतांच कांहीं माणसें जमा झालीं. आपल्या हातांतून या बाया निसटल्या हें जेव्हां या नरपशूंनीं पाहिलें तेव्हां त्यांनीं आपल्या बंदुकी झाडल्या व एका माणसाला इजा झाली व तो मनुष्य मेला व अद्याप यांचा पत्ता व चवकशी नाहीं. मद्रासमध्यें या मनुष्यानें दोन निरपराधी बायांचें संरक्षण करण्याच्या कामीं आपला जीव खर्ची घातला म्हणून मंडळी फंड जमा करीत आहे. मद्रास सरकारनें असल्या प्रकारचे गुन्हेगार पकडून त्यांना जबर शिक्षा देऊंनये व मुकाट्यानें गप्प बसावें हें मोठें लज्जास्पद आहे व एकंदरीनें दूरवर विचार केल्यास असलेंच खटले इंग्रजी राज्याच्या घातास मोठें कारणीभूत होण्याचा संभव आहे. अशाच प्रकारचे भयंकर नीच व अमानुष कृत्यें राजरोस मणिपूर मध्यें चालली आहेत व त्या बद्दल कलकत्ता येथील पत्रांत चर्चा होत आहे असें समजतें. याही गोष्टीकडे सरकारी अंमलदारानीं योग्य वेळीं लक्ष पुरविल्यास बरें होईल.

मसलीपटण येथें दंगा होण्याची भीति आहे म्हणून तेथील डि. माजि. नें खर्चाबद्दल १ लक्ष रुपये दंगा झाल्यास लोकांकडून घेतले जातील. असें कळविलें. सु. प.

---

## जाहिरात.

संस्थान सोंडूर, जिल्हा बळारी इलाखा मद्रास येथें श्री कार्तिक स्वामीचें महास्थान आहे तेथें चालूं सालांत म्हणजे कार्तिक शु० पौर्णिमेस महायात्रा भरणार आहे तर यात्रेस येऊ इच्छिणाऱ्या मुमुक्षु लोकांच्या सोयी करितां खालीं लिहिल्या प्रमाणें टिकीटांचे दर ठेविले आहेत.

| | रुपये |
|---|---|
| पंचामृताभिषेक | २५ |
| सर्वांगाभिषेक | १५ |
| पादाभिषेक | १० |
| पादस्पर्श | ५ |
| दर्शन टिकीट | २ |
| बारावर्षांचे आंतील मुलांस दर्शन टिकीट | १ |

कार्तिक शुद्ध १४ रोजीं अभिषेक वगैरे बाबत टिकिटें देण्यास सुरुवात होईल शु० १५ चे दिवशीं सकाळीं ७ वाजता दर्शनास सुरवात होईल. सदर टिकीटें श्री कार्तिक स्वामीचे डोंगरावर विकत मिळतील. ब्राह्मणावांचून इतर लोकांनीं अभिषेक व पादस्पर्श वगैरे ब्राह्मणद्वारें करवावे.

यंदा देशकाल सुभिक्ष आहे. संस्थान सोंडूर येथें येण्यास हॉसपेट स्टेशन ६ कोस, गादिनूर स्टेशन ४ कोस, तोरणगल्लु स्टेशन ४ कोस याप्रमाणें सोंडुरा पासून रेल्वे स्टेशनें आहेत. सोंडूराहून कार्तीक स्वामीचा डोंगर ९ कोस आहे स्टेशनाहून सोंडूरास येण्यास गाड्या वगैरे मिळतात. यात्रेकरू लोकांस कोणत्याही गोष्टीचो तसदी नाहीं. श्री स्वामीचें दर्शन घेण्यास योग कार्तीक शु० १५ दिवशीं संपूर्ण आहे.

भिमराव पोळ म्योनजर

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ,, ७ ,, ८९
किरकोळ अंकास ........................ ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........

Single copy............................ 4 as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over10... 4 ase
Repetition per line 3as

VOL XXVII | AKOLA MONDAY 30 OCTOBER 1893 | NO 43

वर्ष २७ | आकोला सोमवार तारीख ३० माहे आक्टोबर सन १८९३ इ० | अंक ४३

## नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटी चे सर्टिफिकिट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याच्या मालमिळतीचा कबजा करण्यालायक मनुष्य नेमण्या विषयीं.

सन १८९० चा आक्ट ८
कलम १९ प्रमाणें
अर्जीचा नंबर. ३/१८९३

क्लास. १३

वि० सिविल जडज्य साहेब बहादुर जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार—जानकीबाई
मर्द—रामशेट आप्पा
जात— वाणी
राहणार—अडगांव तालुके आकोट जिल्हा अकोला

( वरील अज्ञान ) काशिनाथ आप्पा. वा शंकर आप्पा जात लिंगाईत वाणी, राहणार अडगांव ता॥ अकोट जिल्हा अकोला. यानें त्यचें पालन व मालमिळकतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचें आधारें किंवा दस्तऐवजावरून किंवा अगर्दी जवळेंचं नातलगपणाचें कारणा वरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदहू आज्ञानाचें मालमिळतीवर सांभाळकर्ता या नात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारिख १४ माहे नवेंबर सन १८९३ ह्या रोजीं वरील अर्जीची चौकशी होणार आहे ते वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकीकत दाखल करावी.

ता० २४ माहे आक्टोबर सन १८९३ इ०

V. N. Dandekar
शिक्का. सिविल जडज्य

---

वि० सि० जड्ज्य साहेब बहादूर कोर्ट अकोलें.

दि. कि. क्लास १३ मिसल नंबर १३/१८९३

जानकी बाई मर्द रामशेट आप्पा वाणी राहणार अडगांव ता० अकोट जि० अकोलें
अर्जदार

अज्ञानाचें पालन करण्या विषयीं सरटिफिकीट मिळणें ह्मणून अर्ज.

मी जानकी बाई मर्द रामशेट्या वाणी राहणार अडगांव ता० अकोट जि. अकोलें काशिनाथ अप्पा शंकर अप्पा यांचे जिनगीचो व स्वतांचें शरीराचें पालन करणार नेमून घेण्या विषयीं अर्ज करितें तो खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१ अज्ञान पुरुष काशिनाथ अप्पा व. शंकर आप्पा जात लिंगायत वाणी याचा जन्म सुमार सन १२८९-९० फसली सालांत पौष शुद्ध ९ मु० तारीख ८ माहे जानेवारी सन १८८१ रोजीं झाला असोन अज्ञान हा हमेशा अडगांव येथें रहात आहे.

२ अज्ञानाचो स्थावरजंगम जिनगी घरें शेती व देवघेव अशी ह्याच कोर्टाचे स्थल सोमेंत आहे. शेती सरासरी ५०० रुपये साऱ्याची असोन घरदार व इतर देवघेव वगैरे जिनगी पंधरा सोळा हजार रुपयाची आहे.

३ अज्ञान व अज्ञानाची वर लिहिलेली जिनगी अर्जदारीण जानकी बाई मर्द रामशेट अप्पा इचे ताब्यांत व देखरेखी खालीं आहे.

४ अज्ञानास जवळचे आप्त आहेत तें खालीं लिहिल्या प्रमाणें:–

(१) अर्जदारीण जानकी बाई मर्द रामशेठ अप्पा वाणी राहणार अडगांव ही मैत शंकर अप्पा याची प्रत्यक्ष मूलगी असल्या मुळें हल्लीं अज्ञानाची वहीण झाली आहे. पहिलें नात्यानी अर्जदारीण ही अर्जदाराची सावत्र आई आहे.

(२) रामशेट अप्पा राहणार उमर ता० खामगांव हा अज्ञानाचे पोरीचा बाप आहे हल्लीं अज्ञान यांस मैत शंकर अप्पा याजला दत्तक दिले आहे दत्तविधान पूर्ण शाबीत होऊन कित्येक वेळां अज्ञानानीं आपल्या नांवानीं फिर्यादी करून हुकूमनामे मिळविले आहेत व आज पर्यंत सर्व देवघेव अज्ञानाचे नांवानी वर सरस्वती बाई ही चालवीत होती.

(३) सावीत्री बाई मर्द राम शेट अप्पा अज्ञानाची सख्खी आई ही उमर ता० खामगांव येथें रहात आहे.

५ ह्या पूर्वी अज्ञाना करितां अगर त्याचे जिंदगी करितां कोणी पालन करणार नेमिला गेला नाहीं.

६ अज्ञाना तर्फे किंवा त्याचे जिंदगी करितां पालन करणार नेमून घेण्या विषयीं अ ज पर्यंत दुसरें ठिकाणीं कोठें अर्ज वगैरे केला नाहीं.

७ हल्लींचा अर्ज अज्ञानाची व त्याची जिंदगीची व्यवस्था करण्या करितां पालन करणार नेमून घेण्या विषयीं आहे.

८ अर्जदारीण ही अज्ञानाची बहीण असोन तिचे शिवाय जवळची दुसरें कोणी नातलग नाहीं.

९ मैत सरस्वती बाई आज्ञानाची दत्तक आई इनेंही अज्ञानास दत्तक घेते वेळेस अर्जदार इजला तिचे पश्चात पालन करण्यास व्हावें ह्मणून दत्तक पत्रांत लिहून ठेविलें आहे. व या प्रमाणें तिची इच्छा हमेशा होतें.

१० वर अज्ञानाचे नांवाणे देवघेवीच्या फिर्यादी कराव्या लागतात व पालन करणार याजबद्दल हमेशा तक्रारी निघू नयेत ह्मणून अर्ज केला आहे. व त्या प्रमाणें अर्जदारीण ही पालन करणार या नात्यानी सर्व काम करण्यास तयार आहे. सबब अर्जदारीण इची विनंती आहे कीं, अज्ञानाचे व त्याचे जिंदगीचें पालन करणार मनुश नेमण्याविषयीं हुकूम व्हावा दाखल ता० ७-१०-९३

सही
जानकी बाई मर्द रामशेट अप्पा वाणी राहणार अडगांव नि. दस्तुर हातची बांगडी.

मी अर्जदार अशी प्रतिज्ञा करितें कीं, सदरहू अर्जांत लिहिला मजकूर माझे माहिती प्रमाणें आणि समजुती प्रमाणें सर्व खरा आहे कळोंव तारिख मजकूर.

सही
जानकी बाई मर्द रामशेट अप्पा वाणी राहणार अडगांव नि. दस्तुर हातची बांगडी.

यादी काशिनाथ अपा वल्लद शंकर अपा वाणी राहणार अडगांव तालुके अकोट याचे स्थावर मालाचे वर्णन.

१ मौजे अडगांव तालुके अकोट येथील शेत. १ शेत सर्वे नंबर १२४ पैकीं एकर १०३९ आकार रुपये ११ सालीम शेत झाडें अळ्यांचे १८, १ शेत सर्वे नंबर २५७ एकर ३४०३ अकार रुपये ६० यांतील १/३ हिस्सा. १ शेत सर्वे नंबर २५६ एकर ९०२४ आकार रुपये १३ यांतील १/३ हिस्सा. १ शेत सरवे नबर ५९ एकर १८०१ आकार रुपये ३३ यांतील ।= आण्याचा हिस्सा. १ शेत सरवे नबर ३०१ एकर २९०२९ आकर ५० यांतील १/२ हिसा. १ शेत सरवे नंबर ५६ एकर २००४ आकार रुपये ३६ हे शेत सालीम. १ शेत सरवे नंबर १३५ एकर १५०२ आकार रुपये ३० हे शेत सालीम. १ शेत सरवे नंबर १९ एकर ५०१२ आकार रुपये २६ हे शेत सालीम. १ शेत सरवे नंबर २७४ एकर ३०५ आकार रुपये ५॥ हे शेत सालीम
९

तालुके अकोट

१ मौजे निजामपूर प्रगणे अडगांव येथील शेत. १ शेत सरवे नंबर ७४ एकर १८०१० आकार रुपये ३३ हे शेत सालीम
१

मौजे १ मालठाण खुर्द येथील शेत. १ शेत सरवे नंबर ८५ पैकीं एकर ४०११ आकार ६॥ हे शेत सालीम. १ शेत सरवे नंबर ८६ एकर ११०२१ आकर रुपये ४१ हे शेत सालीम.
२

तालुके अकोट

१ मौजे वरूड येथील शेत. १ शेत सरवे नंबर २४ एकर २००३८ आकार रुपये ४२ यांतील १/६ हिस्सा. १ शेत सरवे नंबर २५ एकर १७०२१ आकार रुपये ३५ यांतील १/६ हिस्सा.
३

तालुके अकोट.

१ मौजे पिंपरी खुर्द येथील शेत. १ शेत स. नं. १८ पैकीं एकर १००३६ आकार रुपये १३॥ हें शेत सालीम. १ शेत स. नं. ४० पैकीं एकर ४०७ आकार रु. ७ हें शेत सालीम. १ शेत स. नं. ३७ एकर ९०२९ आकार रु. १४ यांतील ॥=०८ पै चा हिस्सा.
३

१ मौजे पिपरी जैनपूर ता० अकोट येथील १ शेत स. नं. ८४ एकर ५०२८ आकार रु. १८॥ हें शेत सालीम माहारुकाळी. १ शेत स. नं. ६१ एकर ५०२६ आकार रु. ६ हे शेत सालीम. १ शेत स. नं. ६६ एकर २५०२४ आकार रु. ४१ यांतील एक त्रितियांश हिस्सा.
३

१ अडगांव खुर्द ता० अकोट येथील शेत स. नं. १३८ एकर २९०२ आकार रु. ५३ यांतील एक षष्ठमांश हिस्सा.

मोजे गोंदी ता० अकोट येथील शेत. १ शेत स. नं. २४ एकर २६०२७ आकार रु. ४२ यांतील एक चतुर्थांश हिस्सा. १ शेत स. नं. २५ एकर २३०२७ आकार रु. २७ यातील एक अष्टमांश हिस्सा. १ शेत स. नं. ११ एकर १८०१० आकार रु. ३५ यांतील बारावा हिसा.
३

मौजे नेजूरी बुदरुख ता० अकोट येथील शेत. १ शेत स. नं. २६ एकर २०८६ आकार रु. ३५ हें शेत सालीम. १ शेत स. नं. ९ एकर १८०१३ आकार रु. ३४ यांतील १ चतुर्थांश हिस्सा. १ शेत स. नं. १० एकर २००३३ आकार रु. ३८ यांतील एक चतुर्थांश हिस्सा.
३

मौजे नेजूरी खुर्द ता० आकोट येथील शेत. १ शेत स. नं २४ एकर ३२०३६ आकार रु. ६४ यांतील एक तृतिअंश हिस्सा. १ शेत स. नं. ९ एकर २७०१३ आकार रु. ५२ यांतील ।=०४ पैं चा हिस्सा.
२

मौजे काळेगांव ता० अकोट येथील शेत. १ शेत स. नं. २८ एकर २३०३ आकार रु. ४१ यांतील १/३ हिस्सा. १ शेत स. नं. ३५ एकर ३६०८ आकार रु. ७२ यांतील बारावा हिस्सा.
३६ २३०? ४० यांतील बारावा हिसा. १ शेत स. नं. ५२ एकर १९०१४ आकार रु. ३५ यांतील ॥।–०४ पै चा हिस्सा. १ शेत स. नं. ५७ पैकीं एकर ७०१ आकार रु. १३ हे शेत सालीम.
३

मौजे दाउतपूर ता० अकोट येथील शेत. १ शेत स. नं. २२ एकर ४०३३ आकार रु. २७ यांतील एक द्वितियांश हिस्सा. १ शेत स. नं. २४ एकर ३०३४ आकार रु. १५ हे शेत सालीम. १ शेत स. नं. ३० एकर ११०२ आकार रु. २२ हे शेत सालीम.

मौजे चोरवाडा बु॥ ता० अकोट येथील १ शेत स. नं. ३३ एकर ७०१७ आकार रु. ११॥ हे शेत सालीम. १ शेत स. नं.

४० एकर १८०२९ आकार रु. ३४ यांतील अकरावा हिस्सा. १ शेत स. नं. ४३ एकर २३८७आकार रु. ३९ यांतील बारावा हिस्सा. १ शेत स. नं. ४९ एकर ८०३९ आकार रु. १६ हे शेत साबीम. १ शेत स. नं. १८ पैकीं एकर ४०२४ आकार रु. ६॥ यांतील निमे हिस्सा.

---

५

१ मौजे पाडसूळ ता० अकोट येथील शेत १ स. नं. १४ एकर ६०२३ आकार रु. ११ यांतील ॥=८८ पैचा हिसा. १ शेत स. नं. २६ एकर ६०१३ आकार रु. १० यांती ल ॥=८८ पैचा हिसा. १ शेत स. नं. १३ एकर १८०१ आकार रु. ३० यांतील निमे हिसा.

---

२

तालुके अकोट

१ शेत चितलवाडी स. नं. १२ एकर ४ आकार रु. ६ शेत साबीम. १ शेत चोरवड खुर्द स. नं. २९ एकर ४०२१ आकार रु. ७ साबीम.

मौजे वेडिगांव येथील शेत १ शेत स.नं. १०९ एकर ९०३५ आकार रुपये १७ हे शेत साबीम. १ शेत स. नं. १ एकर २२ ०१९ आकार रु. ४७ हें शेत साबीम. १ शेत स. नं. १३१ एकर ३४०१० आकार रु. ६२ यांतील ॥=८८ चा हिस्सा

कजबे अडगांव ता० अकोट येथील जागा धाब्याच्या ४ तपशील खालीं लिहिल्या प्रमाणें.

१ रहातें घर खांब ४० तीन मजला पू. कृष्णाप्पा यांचें घर प. रस्ता सडक द. वेपट पलीकडेस जितमलचें दुकान उ. कुंजीलाल मारवाडी.

२ दुकान खांब६ वर माडी कवेलूची पू० सडक प० विठु अप्पा वाणी द० पनालाल मारवाडी उ० तुळशीराम मारवाडी.

३ दुकान खांब २० दोन मजला वर कवेलू पू० सडक प० तुळसी बारीन. द० तुळसी बारिन. उ. रस्ता वेपट

४ गायवाडा ७० खांब वर माडी कवेलूची पू० कुंजीलाल मारवाडी. प० सडक द० तुकाराम बारी उ० अमेदीराम मारवाडी.

येणें प्रमाणें स्थावरमालाची यादी असे. ता० १६—१०—९३

( सही ) अर्जदारीण इची.

मी अर्जदारीण अशी प्रतिज्ञा करिते कीं, वरील मजकूर माझे माहिती प्रमाणें आणि समजुती प्रमाणें सर्व खरा आहे कळावें ता० मजकूर.

( सही ) अर्जदारीण इची.

---

दिवाणी नमुना नंबर ४४

हुकूम– भागीदारी मोडण्या विषयीं आक्ट नंबर १० सन १८७७ इ० यांतील कलम २११ प्रमाणें.

दिवाणी दावा नंबर १२ सन १८८९ वि० सिव्हिल जडज्य साहेब बहादूर जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

हरसुकदास रतनचंद वस्ती अंत्री ता० बाळापूर वादी

श्रीराम खेडसीदास व कस्तुरचंद भीकमचंद राहणार अंत्री ता० बाळापूर प्रतीवादी

दावा ५०००

असें ठरविण्यांत येत आहे कीं, वादी प्रतीवादींचे दरम्यान भागीदारी असल्याचे फिर्याद अर्जीत लिहिले आहे ती तारीख २१ माहे दिसेंबर सन १८८९ पासून मोडली असें समजलें पाहिजे व असा हुकूम होत आहे कीं, त्या दिवसां पासून ती भागीदारी मोडली म्हणून वऱ्हाड समाचार छापखान्यांत जाहिरात द्यावी.

आणखी असा हुकूम होत आहे कीं, या दाव्यांतील भागीदारीची इस्टेट व चीज वस्त याची प्रतीवादी नंबर १ श्रीराम खेडसीदास वस्ती अंत्री ता० बाळापूर जिल्हा अकोला यानें रिसिवर या नात्यानें वहिवाट करावी व विकत दिलेले मालांच्या किमती बद्दल भागीदारीच्या हिशेबी मांडून ठेवलेलीं कर्जें वसूल करावयाचीं असतील तीं व लोकांकडेस येणें असेल तें सर्व वसूल करावें.

व असा हुकूम होत आहे कीं, मिस्तर जेकृष्ण बगाजी नाईक वस्ती अकोलें यांस कमिशनर नेमण्यांत आलें आहे. त्यानीं खालीं लिहिल्याप्रमाणें भागीदारी मोडलेल्या दुकानाचें हिशेब घ्यावेत.

सदरहू भागीदारीचा हल्लीं जो पैका येणें असेल, मिळत असेल व चीजवस्त असेल त्याचा हिशेब.

२ सदरहू भागीदारीचे कर्जाबद्दल व जबाबदाऱ्यांचा हिशेब.

३ पुरा झालेला हिशेब या दाव्यांत दाखल केला आहे व त्यांजवर अ. निशाणी घातली आहे त्याच्या शेवटा पासून व पुढील एखादे हिशेब पुरे झाले असतील त्यांत गडबड न करितां वादी व प्रतिवादी यांचें दरम्यान जे सर्व देवघेव व व्यवहार याचा हिशेब.

आणखी असा हुकूम देण्यात येत आहे कीं, फिर्याद अर्जीत लिहिल्याप्रमाणें वादी व प्रतिवादी हे आज पर्यंत जो धंदा चालवीत आहेत त्या धंद्याचा गुड उइल व व्यापाराचे पाहवळ व्यापाराचे जागीर विकावें असें उभयतां पक्षकारांच्या दरम्यान अपसांत लिलाव करून त्याचा हिश्यानें वादीचा ०६चा प. वादीचा ०१० चा हिशा प्रमाणें त्यांना हिरसेदारीनें वाटून दिलें जावें व पक्षकारा पैकीं कोणा पक्षकारानें अर्ज केल्यावर सदरहू विक्रीच्या वेळीं गटा पैकीं सर्व किंवा कोणत ही टाची कमी किंमत द्यावयाची ही किंमत कमिशनर यांनीं ठरवावी व त्या विक्रीत विकत मागण्याची पक्षकारां पैकीं कोणास ही परवानगी आहे.

आणि असा हुकूम करण्यांत येत आहे कीं, तारीख ६ माहे नवेंबर सन १८९३ चे पूर्वी सदरहू हिशेब द्यावे व जीं दुसरीं कामें केलीं पाहिजेत तीं पुरीं करावीं व हिशेबांत काय निष्पन्न होईल तें लिहून बाकीं सर्व कृत्यें पुरीं झालीं म्हणून कमिशनर यांनीं दाखल्यांत कळवावें. व या मालाचा हा दाखला तारीख१३ माहे नवंबर सन १८९३ रोजीं पक्षकारांस पहाण्या साठीं तयार ठेवावा.

व शेवटचा असा हुकूम होत आहे कीं, अखेर हुकूम नामा करण्या साठीं तारीख १३ माहे नवंबर सन १८९३ पर्यंत हा दावा तहकूब ठेवा.

आज तारीख १४ माहे आक्टोबर सन १८९३ रोजीं आमचे सहीनिशीं व कोर्टाच्या सिक्यानिशीं दिला.

V. N. Dandekar.
सिविल जडज्य.

---

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य ६ शके १८१५

---

## बादरायण संबंध

गोरक्षण सभा व हल्लींचे दंगे यांचा कार्यकारणभाव संबंध दाखविण्याची राजकीय युक्ति निघाली आहे. गोरक्षणाचा दंग्यांशीं जो संबंध जुळतो त्यास आह्मी बादरायण संबंध समजतों. कारण या न्यायानें वाटेल त्या गोष्टीचा वाटेल त्या गोष्टींशीं संबंध लावून दाखविता येतो. असल्या विश्वव्यापक संबंधास कोणी शहाणा महत्व देणार नाहीं असें वाटलें होतें पण अशा जुळवाजुळवीची कल्पना प्रांतिक व इंडिया सरकार यांच्या खलबतांत निघाली आहे आणि तिचा प्रवेश स्टेटसेक्रेटरी मार्फत पार्लमेंटांत होणार आहे असे ध्वनी बाहेर निघूं लागले आहेत पायोनिअर वर्तमानपत्र ह्मणजे सरकारी बातम्यांची टांकसाळ आहे. निदान त्या पत्रकाराचे जे तार तुटतात ते बहुतेक गुप्तस्फोट असतात. सरकारी बातम्यांस कुलूप जेटिव पत्रवाल्या साठीं लाविलीं असतात आणि तीं बंद द्वारें इंग्रजी पत्रवाल्या साठीं द्वारपाळांनींच फोडलें असतां चालतें. पायोनिअर पत्रांत असा लेख आला आहे कीं गोरक्षण मुळें दंगे झाले आणि त्यांचे रिपोर्ट प्रांतिक सरकारा कडून वरिष्ठाकडे गेले आहेत. त्यांवर खुद इंडिया सरकार काय लिहिणार आहे हें कळविलें वेळीं ते पत्रकार ह्मणतात कीं नामदार दादाभाई, वुलियम वेडरबर्न वगैरे लोक राज्यकर्त्यांवर तुटून पडतात आणि हिंदू विरुद्ध मुसलमान व मुसलमाना विरुद्ध हिंदू अशा आपसांत लढाया मांजवून राज्य चालवितात असा दोषारोप करितात; पण हा आरोप खोटा व लबाडीचा आहे हें दाखविण्यास सबळ गोष्टी राज्यकर्त्यां पाशीं आतां उपलब्ध आहेत. गोरक्षण सभांच्या व्दारे हिंदूनीं दंगे उसळून दिले आणि त्या पासून सार्वजनिक शांततेस व स्वस्थतेस धक्का पोंचला एवढेंच नाहीं तर ब्रिटिश राज्यासही हा मोठा अपाय आहे.

पायोनिअर पत्रकर्त्यांची ही फडणीशी येट अंतर्गृहांतला विचार असावा असें वाटतें कारण त्या पत्राचें असेंच गुप्त हेर व लेखक असतात. वरील आशयाचा मजकूर पार्लमेंटास विदित करण्यांची खटपट इंडिया सरकारनें खरोखर केलीच तर हिंदु लोकांवर हें एक मोठें अरिष्ट ओढवत आहे असें ह्मटलें पाहिजे. ज्या गोष्टी क्षुल्लक, भिन्नभिन्न व असंबद्ध असतात त्यांस कारस्थानी आंग्लो इंडियन व्देषबुद्धीनें कसें भयंकर स्वरूप आणितात याचे हें उदाहरण होय. लंडन स्पेक्टटर मध्यें व विलायती पत्रामध्यें ही गोरक्षणाची ओरड पूर्वींच झाली आणि ती ओरड खरी करणारा आतां सरकारी रिपोर्ट जात आहे ही राजकीय कल्पना अजब आहे. या बादरायण संबंधा पासून आह्मांस मोठी भिती वाटते तरी त्यांत नवीनपणा नसल्या मुळें कौतुक वाटत नाहीं पण आंग्लो-इंडियनाच्या शहाणपणाचें हांसू येतें.

नुकतांच येवल्यास जो दंगा झाला, मच्छलीपट्टणास जी मोठी धुमाकूळ माजली आहे, वायव्य प्रांतांसच काय पण हिंदुस्थानभर जे हिंदूमुसलमानांमध्यें दंगे उसळतात त्यां सर्वांच्या हकिकती वाचल्या ह्मणजे लक्षांत येईल कीं हे दंगे पालख्या निघते वेळीं व बकरी-इदी सारख्या सणामध्यें घरोघर किंवा भर रस्त्यावर गाई कापते वेळीं होत असतात. त्यांचा गोरक्षणाशी किंवा गोरक्षणवाल्या सभांशीं कांहीं संबंध नसतो. खाटिकगृहांतून गोहत्या चालल्या असतां त्या वधशाळा मधून, ज्या हिंदूच्या घरीं गायी आहेत त्या घरांमधून किंवा ज्या गोरक्षणशाळा आहेत त्या शाळा मधून अद्याप पावेतों एकही दंगा झाला नाहीं. हिंदू व मुसलमान या उभयता मधील सामाजिक व धर्म प्रकरणीं कांहीं बाबा आहेत त्या संबंधानें हे दंगे होतात आणि कांहीं आंग्लो इंडियनांच्या कृतीनें होत असलेल्या दुफळ्या पुष्कळ अंशीं दंग्यास कारण आहेत.

गोरक्षणा मुळें दंगे झाले हें विधान खरें मानलें तरी त्या मध्यें हिंदूचा कांहीं अपराध नाहीं. राज्यकर्त्यांनीं गोरक्षण करणाऱ्या हिंदूचें संरक्षण केलेंच पाहिजे. संरक्षणाचा मार्ग म्हणजे दंगेवाल्यांचा काटच केला पाहिजे. गोरक्षण कायद्याला अनुसरूनच आहे. प्रजेचा हक्क आहे कीं प्रजेनें सशास्त्र गोष्टी सुखेनैव कराव्यात. सरकारचें काम आहे कीं त्यांनीं त्या यथायोग्य चालविल्या पाहिजेत. तात्पर्य एवढेंच कीं हिंदूच्या व मुसलमानांच्या स्वप्नीं देखील ज्या गोष्टी नसतील त्या खोच्यानाऱ्या उत्पन्न करण्याचा सरकारी अंमलदारांनीं मक्ता घेतला आहे. त्यांच्या त्या कृती मुळें जर एखादी क्रांती झाली तर प्रजाजनांची पायमल्ली होऊन राज्यकर्त्यांनाच पश्चात्ताप होईल.

---

कालमहिमा विचित्र आहे! प्रतापशाली महाराज रणजितसिंग 'पंजाबाचे सिंह' या नांवानें अजरामर झाले पण त्याच थोर पुरुषाचे चिरंजीव धुलीपसिंग पारिस शहरच्या एका भटारखान्यांत मरण पावले. ही बातमी ऐकून त्या शिखराजाचें वैभव, पराक्रम व दिगंत कीर्ती यांच्या आठवणीनें सर्व एतद्देशीय लोक अश्रु ढाळतील. महाराज धुलीपसिंग जन्मले आणि मेले यांत विशेष

वाईट वाटलें नसतें. पण त्या पंजाबा-च्या सिंहाचा छावा असा मानीमोल झाला ह्मणून उद्वेग वाटतो.

पंजाबचे लेफ्टनंट गव्हरनर सरडेनिस फिटझ प्याट्रीक यांनीं 'राष्ट्रीय सभे' संबंधानें सरकारी बंदोबस्त फारच विलक्षण केला आहे! सरकारी नोकरावर जी गदा उचलली तिचा प्रहार कालेजें व हायस्कुलें यांतील विद्यार्थ्यांवरही त्यांनीं केला आहे. राष्ट्रीय सभेच्या इतर बातबेतांत व व्यवस्थेत प्रौढ व तरुण विद्यार्थी रार्जीखुषीनें कलकत्ता व नागपूर इत्यादि ठिकाणीं येत असत. पण तसें त्यांनीं पंजाबांत करितां कामा नये असा हुकूम नवीन निघाला आहे! राजकीय प्रकरणांत विद्यार्थी शिरतील ह्मणून अशी बंदी करणें वेडेपण नव्हे काय!

देशाभिमान हा एक अजब गूण आहे. तो अमुक कृतींत किंवा अमूक स्थळीं असतो असें कांहीं नाहीं. जो आपल्या कुटुंबा विषयीं, ज्ञातीविषयीं, गांवकऱ्या विषयीं व आपल्या देशाविषयीं खराखरा अभिमानी तोच नरमणि देशाभिमानी खरा. देशाभिमानाचा ओनामा घरच्या वागणुकींतच असतो. आणि त्याच गृहवर्तनाचा पूर्णविलास देशकार्यामधून दृष्टीस पडला ह्मणजे मनुष्य देशाभिमानी पुरुषाच्या मालिकेंत गणला जातो आज आह्मास एक देशाभिमानाचें ठळक उदाहरण नामदार दिनशा माणिकजी पेटीट यांच्या एका उदार कृत्यावरून दाखवावयाचें आहे. नामदार मशारनिल्हे यांनीं पार्शी धर्माच्या लोकांसाठीं धर्मार्थ दवाखाना उभारण्या करितां तीन लाख रुपयाची मोठी देणगी दिली आहे. कर्णा प्रमाणें दानशूर शेट दिनशा हे आपल्या धर्मबांधवा विषयीं जी अप्रतिम गोष्ट करीत आहेत तेच व त्यांच्या सारखे गृहस्थ आपल्या देशबांधवाविषयीं सत्कार्यें करण्यास खरे लायक असून तेच देशाभिमानी खरे. स्वार्थबुद्धीनें, धर्मवेडानें, अगर छांदिष्टपणानें कांहीं लोक चांगलीं कृत्यें कधीं कधीं करितात पण ज्यांच्या वर्तनांत वर दर्शविलेली आपलेपणाची सांखळी दिसत नाहीं ते 'देशाभिमानी' या थोर पदवीला पोंचलेले नसतात.

# The Berar Samachar

MONDAY OCTOBER, 30, 1893

## THE PRESENT SITUTATION OF THE HOUSE OF LORDS.

It can scarcely be doubted by any who have observed the events of the late session, that the question of the House of Lords is one which will soon assume a prominent position in English politics. Nothing can be more anomalous and more unsatisfactory than the relations between the two Houses. A liberal majority in the Commons is always liable to be neutralised by a Conservative majority in the Lords, and the wishes of the majority of those who are represented in the Commons may at any moment be set at naught by an irresponsible legislature, the greater part of whose members have inherited a right to exercise Government over others irrespective of merit or any other qualification. The subject also admits another point of view. The strongest Conservative should be no less dissatisfied with the present state than the most advanced Radical. The House of Lords is a constant encouragement to violent agitation both moral and political. Measure after measure is rejected by them. They proclaim virtually by this act that they object to certain measures till their resistance has produced a strong popular feeling of resentment. Then they may vote against their conscientious convictions rather than be responsible for a revolution. The most powerful inducements are thus offered to the people to make threatening proposals and to urge violent demands.

There is also another way in which the House of Lords acts most prejudicially upon the highest interests of true Conservatism. Some of the ablest Conservative politicians are to be found in the House of Lords. A few can be placed in such an unfortunate position as that of the Lords. Lord Cranborne now Lord Salisbury was the most influential man in the kingdom. He had a full opportunity for the exercise of his intellectual powers. In open political conflict where all can contend according to their deserts and where people can select whom they pleased to champian their cause, he was preeminently triumphant. He was raised to the peerage and he at once found his political life surrounded by numberless fetters. If such men vote according to the dictates of their conscience they are deemed unreasonable and headstrong. If they do not smother their conscience they will precipitate a revolution, and cause the abolition of the House to which they belong.

Thus the House of Lords is not only detrimental to the interests of the Commons but to the interest of the Conservatives themselves. Suppose the two or rather the three orders were blended into one. They can return to the Commons. There they can influence far greater influence; can have a far greater field for their energy; and can at least be spared the humiliation of being constantly obliged to refraim from opposing measures they disapprove.

Again the Conservative party in the House of Commons recruited by these new allies would soon occupy an entirely new position. What might not its fortunes have been during the recent session, if the avowed discontent of many members of the Opposition with their leaders had not protected the Ministry from the just and natural consequence of their errors and misfortunes? If, therefore the subject is simply considered from a narrow party point of view, the abolition of the House of Lords will not prove so anti-Conservative a measure as is usually supposed.

Those who can go as far back as 1871 and watch since that year, to the present date the the doings of the Houses and their mutual attitudes with regard to the University Tests Bill, Army Bill, Royal Warrant and numerous others will be convinced that the relations between the two Houses are most unsatisfactory. Opinions differ as to the wisdom and justice of these relations. Owing to such relations the usefulness of great measures is ever diminished and a precedent is set which would prove fatal to Parliamentary independence and which would enable a minister with a mejority at his back to deprive a minority of one of their most valuable weapons of defence.

If such be the relations between the two Houses, the most pertinent question that would suggest itself is whether the entire abolition of the House of Lords would be a simple and complete remedy.

If the present system of representation is to remain unchanged a second Chamber so constituted as to give effect to it is necessary.

This probably will be the position of the Parliament when it comes to "end" or "mend" the Upper House.

## वऱ्हाड.

आह्मास लिहिण्यास आनंद वाटतो कीं, अकोलेंकरांनीं व उमरावतीकरांनीं फर्ग्युसन कालेजाच्या इमारती साठीं आपापली 'पिशवी सोडली' विद्याप्रसारा साठीं वर्गण्या जमा करण्यास आलेले प्रोफेसर गोखले यांचा कार्यभाग या प्रांतांत उत्कृष्ठ सफळ झाला हें कळवितें वेळीं ठळक ठळक वर्गणीदारांचीं नांवें नमूद करणें अवश्य आहे.

| राजमान्य राजश्री | वर्गणी |
|---|---|
| देवराव विनायक वकील | १००० |
| गणेश श्रीकृष्ण खापर्डे | १५०० |
| रंगनाथ नरसिंह मुधोळकर | १५०० |
| प्रल्हाद नारायण जोग | १००० |
| मोरो विश्वनाथ जोशी | १००० |
| बळवंत रामचंद्र अनगळ | ५०० |
| वासुदेव नारायण जोग | ५०० |
| पांडुरंग गोविंद | ४०० |
| राव बहादूर जठार | ३०० |
| विश्वनाथ नारायण दांडेकर | २०० |

या शिवाय विष्णु मोरेश्वर महाजनी, भागवत इत्यादि बरीच वर्गणी देणार असल्याचें कळतें. हाच उदारहस्त प्रांतिक संस्था साठीं पुढें सरसावेल तरच मात्र यांत चीज मानतां येईल.

अलिशान रेसिडेंट मि. ग्लोडन यांनीं एक उत्तम सरक्युलर काढलें आहे कीं डेपुटी कमिशनरांनीं वर्षांतून फक्त दोन महिने दवरा करावा आणि बाकीचे दिवस सदरच्या ठिकाणीं रहावें आणि प्रत्येक दवऱ्यांत तहशिलीच्या ठिकाणीं चार दिवस मुकाम केलाच पाहिजे.

नोवेंबर तारीख ८ रोजीं उमरावतीस हायर लोअरची परीक्षा होणार आहे. दीप वाळीच्या सुट्टीत हा परिक्षेचा सुयोग आणून हिंदुच्या सणांची अशी अवहेलना होणें रास्तच आहे!

कर्नल मेकंझी लवकरच पेनशनदार होतील किंवा पोलिटिकल खात्यांत शिरतील तेव्हां ते या प्रांतास रामराम ठोकणार असल्या मुळें त्यांचें स्मारक इलिचपूरवाल्यांनीं लायब्ररीच्या नामाभिधानानें करण्याचें योजिलें हें पाहून प्रमोदसिंधु कोंत विस्मयानें उमरावती कराचे मेत्सा कवित आहेत.

क्याप्टन मारिस डेपुटी कमिशनर, अकोला हे सहा महिन्यांच्या रजेवर गेल्या मुळें त्यांचे जागीं मि. हेअर डेपुटी कमिशनर यांस वाशिमाहून अकोल्यास बदललें. मे० हेअर साहेब अकोल्यास आल्यामुळें त्यांच्या विद्वत्तेला, कार्यकर्तृत्वाला, व लोकहितबुद्धीला सर्वजण माना डोलवून आनंद मानीत आहेत.

क्याप्टन मारिस साहेब शर्यती निमित्त शहरोंशहरीं फिरणार असून नंतर त्यांचा बेत दुसऱ्या एखाद्या प्रांतांत जागा मिळविण्याचा आहे असें लोक बोलतात.

क्याप्टन वारन हेस्तिंगस हे रजेवरून इलिचपुरास परत आले आणि आक्टिं. डेपुटी कमिशनर खान बहादूर शमसुद्दीन अलीखान यांस वाशीम जिल्ह्याचे डेपुटी कमिशनर नेमल्या अन्वयें ते वाशिमास रुजूं झाले.

खान बहादूर शमसुद्दीन अलीखान यांची इलिचपूरची कारकीर्द लोकप्रिय झाली हें लिहिण्यास मोठा आनंद वाटतो. तेथील लायब्ररीच्या इमारतीचा पाया बसविण्याचा समारंभ खान साहेबांच्या हातून गेल्या दसऱ्यास झाली. 'कर्नल मेकंझी लायब्ररी' असें नांव या लायब्ररीस देण्याचा लोकांचा विचार आहे.

## नोटीस.

नोटीस बेशमी लछी बल्लद किसन गुजराथी मोहबतपूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मौजे मोहबतपूर येथील शेत सर्वे नंबर ४६ एकर गुंठे १७-२९ आकार रुपये १४ याचें खातें तुमचें नांवें असून त्यांत ०५०४ चा हिस्सेदार माणक गुजराथी आहे त्याचा हिस्सा खरेदी घेतला आहेच बाकी ०१००८ चा हिस्सा असलेला तुमचा साक्षांत भाऊ बुलचंद यानें मालकी बद्दल रु. ३०० घेऊन खरेदीखत तारीख १७ मे सन १८८६ इ. रोजीं लिहून दिलें आहे कारण तें शेत त्याचे हिशांतच आलें होतें व कबुली बद्दल तुह्मी दस्तऐवजावर साक्षही घातली आहे खरेदी पासून जमीन माझे ताब्यांतच आहे परंतु खातें तुमचें नांवें आहे तें मात्र बदललें गेलें नाहीं. तरी ही नोटीस देऊन तुम्हास कळवितों कीं, ही नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांचे आंत तो० कचेरींत माझें नांवें खातें करून द्यावें तसें न केल्यास रीती प्रमाणें दिवाणींत फिर्याद करून खातें बदलून घेईन व फिर्यादीचा खर्च ही तुह्मास द्यावा लागेल कळावें. तारीख २७ माहे आक्टोबर सन १८९३

(सही)

भिवाजी वा॥ मेसाजी माळी राहणार अंजनगांव याची निशाणी.

## वर्तमानसार

अत्यंत श्रीमान विश्वविद्यालय— कालिफोर्निया ( अमेरिका ) तील स्त्यान फोर्ड युनिव्हर्सिटी एवढा श्रीमान युनिव्हर्सिटी पृथ्वींत कोठेंही नाहीं. ह्या युनिव्हर्सिटीचें सालीना उत्पन्न २२०००००० पौंड आहे. यूरोपांतील एकंदर युनिव्हर्सिट्यांचें उत्पन्न एकत्र केलें तरी तें ह्या युनिव्हर्सिटीच्या उत्पन्ना बरोबर नाहीं. ही युनिव्हर्सिटी तिकडील श्रीमान लोकांच्या औदार्याची अति मोठीं निशाणी आहे. शु. सू.

रशियन लोकांनीं पामीरकडे पुन्हा कांहीं गडबड चालविली आहे. १९ वी तार सांगत्ये कीं, बदकशानच्या उत्तरेस आक्सस नदीच्या कांसळांत दरबार ह्मणून एक ठिकाण असून तेथें मुरगबी येथून शिगनन रोशनवरून जाण्याची मेजर वानस्की याची इच्छा आहे व याकरतां त्याणे तेथील अफगाण आफिसराजवळ परवानगी मागितली; पण त्याणें तसा पास देण्यास नाकारलें. नंतर त्यानें कोकेसाक फौजेस बरोबर घेऊन जाण्याचें ठरविलें. अशा रीतीनें अफगाण हद्दीत आल्यावर आपणास पुढें जाण्यास एका अती अरुंद वाटेनेंच गेलें पाहिजे व त्या वाटेनें आपणास जातां येण्यासारखें नाहीं असें त्यास आढळलें. इतक्यांत तुह्मी आमच्या हद्दींतून निघून जा अशी त्या अफगाण लोकांनीं ताकीद केली व ती त्यानें नाकारली ह्मणून अफगाण लोकांनीं त्यांच्यावर गोळी सुरू केली. तेव्हां त्यांनीं माघारी घेतली व एकदाचे परत मुरगबी येथें येऊन पोंचले. डुरंड मिशनास रशियाचा जबाब आहे आणि क्पा. यंगहसबंड यांस रोनाई येथें जें वाईट रितीनें वागविण्यात आलें व सोमटाश येथें अफगाण फौजेवर जो हल्ला झाला त्या खेळा पैकींच हाही एक भाग आहे. शिगनन रोशन हें ठिकाण आपल्या मालकीचें आहे असें रशियाचें ह्मणणें आहे, पण तें ताब्यांत घेण्याचें त्याच्या हातून अजून झालें नाहीं हल्लीं अफगाणच्या ताब्यांत असलेल्या त्या लहान लहान संस्थानास आपल्या ताब्यांत घेण्यास फौजेचा उपयोग करण्यास रशिया अजून तयार नाहीं व त्या करतां मे. वानस्कीचा हा उद्योग रहित झाला हा जरी असा प्रकार झाला तरी रशियाचा पुन्हा हल्ला होण्याचा संभव आहे व तसें झालें ह्मणजे रशियाचा हेतु अखेरीस चांगला कळूनही येईल.

रशियन कोसाक व अफगाणलोक यांच्या दरम्यान धारवाज प्रांतांत एक मोठा सामना झाल्याची बातमी सिमल्यास आली आहे असें विलायतच्या टाइम्स पत्राचा बातमीदार सांगतो. काय गंमत आहे पहा. हिंदुस्थानच्या सरहद्दीवर ज्या गोष्टी होतात त्या विलायतचे पाच हजार कोसावरचे लोक हिंदुस्थानच्या लोकांस सांगतात.

हुनी लोकांच्या जुलमास त्रसून हिरातची १८,००० शिया कुटुंबें हेरात सोडून मेशेद येथें गेलीं आहेत व त्याणीं आपल्या ताब्यांत सारक मर्व्ह या हद्दींत वस्ती करून राहावें अशी रशियाची खटपट आहे असें सांगतात.

पामीरकडे खटपट करीत असलेला रशियन कामदार मे. वानपकी हा रशियन सरकारच्या लढाऊ खात्याच्या मुख्य प्रधानाचा मुलगा आहे असें सांगतात.

बांकीपूर येथील पोष्टांतल्या एका गोऱ्या कामदारानें एका नेटिवास गोळ्या घालून ठार केलें!

लढाईच्या वेळीं चिटी चपाटी इकडून तिकडे नेण्याकरतां व लढाईंत घायाळ होऊन पडलेल्यांचा शोध लावण्याच्या कामाकरतां कुत्र्यांचा उपयोग करण्यांचा प्रयोग सुरू आहे व त्या कामाकरतां उपयोगी पडण्यासाठीं कांहीं दिवस शिकवून त्यांची नुकतीच परीक्षाहीं घेण्यांत आली व फार उपयोगाचे ठरले. ते चिटी चपाटी रात्रीं इकडून तिकडे नेमकी नेतात व ३॥ मिनिटांत एक मैल प्रमाणें जातात. ठा० अ०

लढाईच्या प्रसंगी सैन्य नेण्यास उपयोगी पडेल अशी एक रेल्वे रशियन सरकारानें आपल्या देशाच्या आस्ट्रियाकडील सरहद्दीवर बांधण्यास आरंभ केला आहे

त्रिनेत्रधारी तरुण स्त्री— प्यारिस आणि लंडन येथें एक त्रिनेत्रधारी स्त्री लोकांना दाखविण्यांत आली. ही तरुण आणि सुंदर आहे फक्त तिला एक डोळा अधिक आहे येवढेंच वैगुण्य आहे ही आमच्या इकडच्या त्रिनेत्रधारी शंकराची बहिणच दिसते. न्या० सु०

मोगलाईंत आज पावेतो उत्पन्नावर कर बसविण्यांत आला नव्हता, तो यानंतर बसविण्यांत येणार आहे असें कुलबर्गा समाचार कर्ते लिहितात.

औरंगाबाद गिरणींत निघालेला माल इंग्रजींत गेल्यास त्यावर इतके दिवस करोडगिरी नव्हती, ती आता घेण्याचा ठराव झाल्याचे समजतें. क० त०

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें.
दि. कि. क्लास १९ मिसल. नंबर ८

१८९३

वि. सिव्हिलज्यडज्य साहेब बहादूर जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

नांव— रमाई
मर्द हंबीरजी कुणबी
राहणार— पनज ता० अकोट
जिल्हा— आकोला यांस मयत

हंबीरजी बापाचें नांव सोनाजी राहणार पनज तालुके आकोट जिल्हा आकोला यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनी ता. १४ माहे नवंबर सन १८९३ इ० रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल. त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी. ता. २१ माहे आक्टोबर सन १८९३ इ०

V. N. Dandekar
शिक्का सिव्हिलजडज्य

---

नोटीस

नोटीस हरदयाल गोविंदराम मालक गुरू प्रताप सुरजमल मारवाडी दुकान अकोलें यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मौजे नवथळे ता० अकोलें येथील सर्वे नंबर ७ एकर १९ ( गुंठे टाऊक नाहींत ) आकार रु. ३० हें शेत माझ्या बापा पासून माझें वहिवाटींत असून माझा बाप मेल्या पासून सदरहू शेताचें खातें ही माझें नांवानीं लागलें परंतु शेत मजकूर हे तुह्मी ताब्यांत घेऊन पीकही घेतां आहा. सरासरी हें सहावें पीक असावें तेव्हां असें तुह्मी कोणाच्या अधिकारानें करितां? तुमचे जवळ माझा किंवा माझ्या बापाचा किंवा आणखी कोणाचा दस्तऐवज किंवा एखादा लेख किंवा कांहीं देवघेव झाली आहे कीं काय? ही सर्व हकीगत ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत मजला किंवा माझे वकील रंगो रामचंद्र यांजकडेस कळवावी. न कळविल्यास तुमचेवर बेहकानें उपभोग घेतल्या बद्दल हक्का सुद्धां दिवाणींत दावा करूं. कळावें ता० २९–१०—९३

[ सही ] विठोबा वलद रामजी वस्ती खेकडी निशाणी खुद्द.

---

नोटीस.

नोटीस बेशमी गजराई मर्द रामजी पाटील व पुंजाजी वा। लक्ष्मण पाटील राहणार सांगवी खुर्द ता. आकोले यास नोटीस देण्यांत येते कीं तुमची नोटीस पावची तिचे उत्तरी कळविण्यांत येतें कीं तुह्मीं आह्मास गाहाणखत रुपये १०००चे करून दिलें त्या वेळीं तुह्मीं आपले खात्याचा मागील हिशोब सर्व समजून घेऊन आमची बाकी ३४९ रुपये तुमचे कडेस निघाली ती तुह्मीं कबूल केली असोन आतां हिशेबाची तकरार दाखवितां हे बरोबर नाहीं रुपये ६९९ तुह्मीं आमचे पासून सबरजिस्टर याचे समोर नगदी घेऊन नंतर दस्ताऐवज रजिस्टर करून दिला सुरजमल गिरधारीलाल साहू दुकान केलीवेळी यास देण्या करितां तुह्मीं आमचे पाशी रुपये ५०० अनामत ठेविले आहेत तें आह्मी तुमचे सांगण्यावरून आमचे मनुष्याकडून केलीवेलीस पाठविले असता साहू मजकूर याणी रुपये न घेतां असा जबाब दिला कीं ज्या असामी कडून रुपये घेणें आहेत त्याच्याशी आम्ही निकाल करून घेऊन त्याजला गाहाणखत देऊ तुमचा आमचा कांहीं संबंध नाहीं. ही गोष्ट तुह्मास कळविल्यावरून तुह्मीं दस्ताऐवज काढून आणण्याचे कबूल केले असून अद्याप पावेतो आणला नाहीं हल्लीं तुमची नोटीस आल्यावरून रुपये ५०० अकोलें येथें मेहेरबान मोलवी महमद हाकीमुद्दीन साहेब वकील याचे पाशीं ठेविले आहेत. तें तुह्मीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत रुपये घेऊन मोलवी हाकीमुद्दीन साहेब वकील याचे मनुष्याचे हाती सुरजमल गिरधारीलाल याजपासून गाहाणखत काढून घेऊन द्यावें तसें न केल्यास आह्मी कोणतेही प्रकारें तुमचे नुकसानी वगैरेचे जबाबदार नाहीं. व जें गाहाणखत तुह्मीं आह्मास लिहून दिले आहे त्याचे रुपये करारा प्रमाणें व शर्तीं प्रमाणें तुमचे पासून नोटीसीचे खर्चासह घेतले जातील. कळावें तारीख २९ आक्टोबर सन १८९३ इ०

सही.
हरदयाल गोविंदराम दुकान
सांगवी तर्फे मु. पांडुरंग
रामचंद्र वस्तूर
खुद्द.

---

नोटीस

किरकोळ दि० मु० नं० ३ सन १८९३
वि० दिपुटी कमिशनर साहेब बहादूर
जि० उमरावती यांचे कोर्टांत.

मैनाबाई जवजे इरलाल प्राणसुक
जात परवार राहणार उमरावती. } मैत.

ज्या अर्थीं ओंकारदास वलद लालचंद व फत्तेचंद वा। लालचंद राहणार आकोट यांनीं ह्या कोर्टास सदरहू मैताचे इस्टेटीबद्दल व मालमिळकती बद्दल सन १८४१ चा आक्ट नं. १९ अन्वयें अर्ज दिल्या वरून सदरहू मैताचे जे वारस व ज्यांचा विशेष संबंध आहे असे लोकांस ह्या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, ही नोटीस वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्या तारखे पासून एक महिन्याचे आंत जे कोणी त्या इस्टेटीचे संबंधानें वारस असतील त्यांनीं आपला हक्क संबंध दाखविण्या करिता मे० निकालेट साहेब बहादूर जि० ज्यडज्य कोर्ट उमरावती यांचे कोर्टांत हजर व्हावें.

कोर्टाचे सही शिक्यानिशीं ही नोटीस दिली असे. आज तारीख १४ माहे आक्टोबर सन १८९३ इ०

W. V. Chandekar.
Clerk of Court

---

नोटीस

वि० दिपुटी कमिशनर साहेब बहादूर
जिल्हे उमरावती यांचे कोर्टांतः—
कि० दिवाणी मु० नं० ४ सन १८९३
सन १८८१ चा आक्ट नंबर ५ यांतील
कलम ६९ अन्वयें

मैनाबाई जवजे हरलाल प्राणसुक
जात परवार राहणार उमरावती. } मैत.

ज्या अर्थीं चुनियाबाई जवजे रामचंद्र परवार राहणार उमरावती इनें ह्या कोर्टास सदरहू मैताचे इस्टेटी बद्दल व माल मिळकतीबद्दल सन १८८१ चा आक्ट नंबर ५ कलम ६२ अन्वयें अर्ज दिल्यावरून सदरहू मैताचे जे वारस व ज्यांचा विशेष संबंध आहे असे लोकांस ह्या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस वर्तमान पत्रांत प्रसिद्ध झाल्या पासून एक महिन्याचे आंत जे कोणी त्या इस्टेटीचे संबंधानें वारसदार असतील त्यांनीं आपला हक्कसंबंध दाखविण्या करितां मे० निकालेट साहेब बहादूर जिल्हा जडज्य कोर्ट उमरावती याचे कोर्टांत हजर व्हावें.

कोर्टाचे सही शिक्यानिशी ही नोटीस दिली असे. आज तारीख १४ माहे आक्टोबर सन १८९३ इ०

W. V. Chandekar.
Clerk of Court.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.